नं १५

म. ग्रं. सं. ठाणें

| | |
|---|---|
| विषय<br>कादंबरी | लेखक बाळकृष्ण दिनकर<br>वैद्य. |
| लय क्रमांक<br>१६<br>१५२२ | पुस्तकाचें नांव अमोलिक वैद्याचि चातुर्यं |

सन
१८७६

१६
कादं.

# अमोलिक वैद्यक चातुर्य.

( बोधपर गोष्टी. )

हें

पुस्तक,

**बाळकृष्ण दिनकर वैद्य कंनडकर**

मुक्काम कल्याण,

यांनीं केलें.

तें

रा. पांडुरंग गोपाळ डाक्तर जी. जी. एम: सी.
यांच्या करितां त्यांच्या संमतीनें फकीर हरी
श्रीधनकर यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदलें आहे. )

मुंबई येथें:

आंग्लो-वर्न्याक्युलर छापखान्यांत छापविलें.

सन १८७६ इ.
शके १७९८ शा.
किम्मत रुपया १|.

31

हें लहानसें पुस्तक
कर्त्यानें
आयुर्वेद-शोधक मंडळी'चे आयुर्वृद्धि
व आरोग्यरक्षण या विषयांच्या
शोधाविषयीं उत्सुकता व
उद्योग हीं पाहून तीस
परम उत्साहानें
नजर केलें
असे.

# प्रस्तावना.

—:o:—

प्रसंगावधान व सुयुक्तिक कल्पना यांजपासून कोणत्या प्रसंगीं कोणास कसा उपयोग होईल ह्याचें वास्तविक अनुमान करवत नाहीं. कित्येक वेळां ह्या दोन गुणांपासून लोक महत् संकटापासून सुटले आहेत. तसेंच यांजपासून मोठमोठाले अलभ्य लाभही झाले आहेत. फार काय सांगूं? कित्येक वेळां तर सर्वांत अति मूल्यवान जो प्राण तोही वांचला गेला आहे, असे दृष्टांत शेंकडों आहेत, हें निर्विवाद आहे.

हे दोन अमोलिक गुण चतुर विद्वानांच्या संगतीनें, नेहमी सुयुक्तिक कल्पना लढविल्यानें, सवयीनें, व तसल्या गोष्टी पुष्कळ ऐकल्यानें व पाहिल्यानें येतात; परंतु अशा गुणांनीं युक्त असणारे लोक थोडे अढळतात, व असे प्रसंगही विरळाच दृष्टीस पडतात.

अस्तु. प्रस्तुत जें मीं लहानसें पुस्तक केलें आहे यांत बहुतेक हाच विषय आहे. आतां, या पुस्तकांत असा विषय असून ह्याचें नांव "अमोलिक वैद्यक चातुर्य" हें कां? असी शंका मनांत येते, तर याचें हें नांव ठेवण्याचें कारण असें आहे कीं, या पुस्तकांतील प्रत्येक गोष्टींतील आलेला अतिशय विकट प्रसंग कोणत्या तरी वैद्यानें टाळला आहे व बहुतेक प्रसंग वैद्यकाचेच आहेत. आतां जर या पुस्तकाचा विषय असा आहे तर हें वैद्यलोकांच्याच उपयोगी आहे असें होईल. पण तसें नाहीं. ज्या ज्या वेळेस वैद्यानें हे

दुर्घट प्रसंग युक्तीनें निभावले आहेत, त्या त्या वेळची ती ती युक्ती ज्यानें वैद्यशास्त्र मुळींच पाहिलें नाहीं पण केवळ चतुर, काल्पनिक व धूर्त असा मनुष्यही योजूं शकेल, अशी आहे. प्रसंगवशात् असल्या युक्ति मोठमोठ्या वैद्यांसही ग्रहण कराव्या लागतील.

ह्या पुस्तकाची रचना कल्पित, मनोरंजक गोष्टींच्या रूपानें केली आहे. यांत प्रसंगीं वैद्यकाचे शास्त्रार्थ दर्शविले आहेत आणि ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यांतील आलेले बहुतेक मोठमोठे भयंकर प्रसंग, औषधाच्या जोरानें नाहीं; तर केवळ युक्तीच्याच बळानें निभावले आहेत. क्वचित् एखादे प्रसंगीं मात्र थोडीशी औषधाची मदत घेतली आहे; अशाविषयीं दाखला आहे.

मी आपल्याकडून हें पुस्तक केवळ वैद्यांच्याच नव्हे तर सर्वांच्या उपयोगीं पडावें अशा हेतूनें मेहनत घेऊन रचलें आहे. आतां, हा यत्न कीती सिद्धीस गेला आहे याविषयीं विद्वान वाचक विचार करतीलच. जगांत ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे प्रसंगांपैकीं गद्यरूपी माझा यत्न हा पहिलाच आहे, याकरितां हें पुस्तक सर्व प्रकारें निर्दोष असेल असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. तथापि हें तयार झाल्यावर मीं ज्या ज्या विद्वान गृहस्थांस दाखविलें त्यांनीं त्याची रचना व शैली पसंत केल्यावरून, मला हें छापविण्याविषयीं विशेष भरवसा आला. व यामुळें हें मी पुण्यांतील 'दक्षिणाप्रैझ कमिटी'कडे पाठविलें. त्यांनींही तें पसंत करून मला मेहनतीबद्दल बक्षीस दिलें, यास्तव मी त्यांचा व सदरील गृहस्थांचा आभारी आहें.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वीं डाक्तर पांडुरंग गोपाळ यांनीं मुद्याच्या गोष्टींत कांहीं ठिकाणीं अवश्य वाटलें तें फेरफार केलें.

बाळकृष्ण दिनकर वैद्य कंनडकर
पुस्तक कर्ता.

---

संमति पत्र (सरटिफिकिट.)

"अमोलिक वैद्यक चातुर्य" या नांवाचें पुस्तक मी समग्र पाहिलें. मराठींत अशा प्रकारचें झालेलें पुस्तक माझ्या पाहण्यांत आलें नाहीं. हें पुस्तक एतद्देशीय वैद्यानें केलेलें आहे तथापि त्यांत पश्चिमखंडीय वैद्यकांस विरोध येईल अशा, किंवा असंभवनीय अशा गोष्टी नाहींत. या पुस्तकांत दुर्घट प्रसंगीं जी जी युक्ती योजिली आहे; ती ती युक्ती तो प्रसंग निरसन करण्यास मोठी विलक्षण चातुर्याची व चमत्कारिक अशी आहे. आणि तिनें तिनें ते विवक्षित रोग नाहींसे होण्याजोगे आहेत. या युक्ती ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. एकंदरींत पाहतां सुयुक्तिक कल्पनेचा हा जुडगा आहे, असें ह्मटलें असतां चालेल. मनोरंजकताही बरी आहे. ह्या पुस्तकाचा उपयोग वैद्याचा धंदा करणाऱ्यांस चांगला होईल. प्रसंगावधान व सुयुक्तिक कल्पना यांची आवश्यकता सर्वांस आहे. व हे गुण आंगीं असावे असें इच्छिणाऱ्यांस हें पुस्तक एक साधन होईल.

ता० ८ माहे मे १८७४.
मुंबई. } सखाराम अर्जुन डाक्तर.
एल्. एम्. वैद्यविद्याशिक्षक.

## शिफारस.

राजश्री बाळकृष्ण दिनकर वैद्य कंनडकर यांनीं रचलेलें "अमोलिक वैद्यक चातुर्य" या नांवाचें पुस्तक मी आज वाचलें. त्यांतील गोष्टी चांगल्या आहेत. ग्रंथाच्या नांवाप्रमाणें सर्व ठिकाणीं चातुर्य आढळतें. आश्रय देण्याजोगे गुण पुस्तकांत आहेत.

वैशाख वद्य ७
शके १७९६
मुंबई.

अण्णा मोरेश्वर कुंटे.
बीए. एल्. एम्.

---

## OPINION.

I HAVE read a considerable portion of the work submitted to me for perusal by Mr. Balkrishna Dinkar Waidya. The work is a collection of stories intended to illustrate the influence of imagination on the morbidly affected mind, and the almost miraculous cure of certain diseases by devices of wit. In my opinion, the author has, on the whole, succeeded in carrying out the object of his work pretty remarkably. The author's intention of broaching the relation of the different feats of wit and devices of art in the form of narratives, seems to be to show to the student of medicine the manner in which the art of cure is on many occasions very beneficially aided by his acting on the imagination and idiosyncrasies of certain patients.

This work is evidently one of its own kind. It is entirely new in its features, and therefore deserves to be amply supported and widely circulated.

PANDURANG GOPAL,
G. G. M. C.

16th May 1874.

*P. S.* Since the above was written, the whole work was submitted to me for revision, during which the orthography and sense of several passages was corrected.

P. G.

## मत.

कितीएक शारीरिक विकार हे मनोवृत्ति बिघडल्यामुळें ग्रांथिक ह्मणजे वैद्यशास्त्रप्रसिद्ध अथवा रूढींत असलेल्या उपायांनीं बरें न होतां, वैद्यास दुःसाध्य होतात. यामुळें रोग्यांचा वैद्यावरचा भरंवसा नाहींसा होतो इतकेंच नाहीं, तर वैद्यकाच्या वास्तविक न्यूनतेमुळें उत्पन्न होणाऱ्या अश्रद्धेपेक्षांही त्यावर विशेष अश्रद्धा होण्याचे समय वारंवार येतात ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. असे प्रसंग घडून येण्यास बहुधा वैद्याच्या अंगीं पाढिकपणाखेरीज जे गुण असावे, ते नसल्यामुळें घडतात असें होतें. रोग उत्पन्न होण्यास अनुकूल, प्रतिकूल अथवा साधक, बाधक कारणांचा विचार, विवक्षित प्रकृतीचा कायम असणारा स्वभाव व तिचे अनेक व्यासंग यांविषयीं क्षमता, अन्नाच्या निरनिराळ्या जातींस अनुलक्षून असणारी आवड व मनाचे कल इत्यादि अनेक प्रकारच्या शारीरसंबंधीं नियम व तत्संबंधी अंगें यांची चौकशी करणें व दिनचर्येच्या संबंधानें त्याच्या प्रकृतीचे साहजिक धर्म व कल यांचा विचार प्रत्येक रोग्याची परीक्षा करितांना वैद्यास अवश्य करावा लागतो.

हे विचार रोगाच्या निराकरणास निश्चयानें साह्यभूत व्हावे ह्मणून तर्क, तारतम्य, धूर्तता, सुयुक्तिक कल्पना व युक्ति या सर्व गुणांची प्रयोजक व श्रेयस्कर योजना करणें जरूर आहे हें सर्व बुद्धिमान् व समंजस लोकांस ग्राह्य आहेच. परंतु साधारण प्रतीच्या लोकांस या गुणांची किती आवश्यकता आहे हें पुरतेपणीं समजत नाहीं. या-

मुळें अडाणी मनुष्यें धूर्त व केवळ मतलबी लोकांचा आश्रय घेतात. अशा प्रकारच्या आश्रयानें त्यांचें इच्छित कार्य कधीं कधीं सिद्धीस जातें व वैद्यावरील श्रद्धा कमी होते. असें होण्याचें कारण हेंच आहे कीं, धूर्ततेनें व युक्तीनें भोळ्या व अशक्त मनाचे विकल्प व दुराग्रह जिंकले जातात.

आतां धूर्तता, प्रसंगाप्रमाणें योजना, व युक्ति हे गुण प्राय: अमोलिक आहेत. ते अशिक्षित मनुष्याच्या अंगीं असल्यानें कितीएक विवक्षित प्रसंगीं उपयोगी पडतात. तर ते वैद्याच्या अंगीं असल्यानें किती आपदा टळतील हें विस्तारानें सांगावयास नको. या गुणांचा वास्तविक उपयोग व्यक्त व्हावा या हेतूनें रा. रा. बाळकृष्ण दिनकर वैद्य यांनीं कांहीं घडून आलेल्या व कितीएक संभवनीय प्रसंगाचे यथोचित दाखले जमवून सदरील पुस्तक गोष्टींच्या रूपानें रचिलें आहे-

या समुदायास "वैद्यक चातुर्य" हें नांव दिलें आहे, व या नांवाप्रमाणेंच सदरीं लिहिलेले अवश्य गुण ठिकठिकाणीं प्रदर्शित केले आहेत, यामुळें हें पुस्तक खरोखर उपयुक्त होईल असें मला वाटतें.

पांडुरंग गोपाळ जी. जी. एम. सी.

# अनुक्रमणिका.

गोष्ट. पृष्ठ.

१. परपुरुषाच्या अप्राप्तीमुळें झुरून मरणोन्मुख झालेल्या राजस्त्रियेस दुर्व्यसनांत न पाडतां युक्तीनें बरें करणें... .... १

२. मेदोरोगानें ग्रस्त झालेला मनुष्य युक्तीनें बरा करणें .... .... .... १६

३. जांभई देतांना तसेंच उघडें राहिलेलें तोंड युक्तीनें मिटविणें... .... .... २५

४. बहुत दिवसाचें तिजांचें हिंव युक्तीनें दूर करणें .... .... .... .... २६

५. हर्षवायु झाला असतां त्यास युक्तीनें ताळ्यावर आणणें.... .... .... २९

६. एके छांदिष्ट मुलाची दुष्ट आफूची भयंकर संवय युक्तीनें तोडणें... .... ३२

७. भयंकर वांतीच्या प्रकारापासून युक्तीनें बरा करणें.... .... .... .... ३७

८. तीव्र रेचकानेंही दूर न होणाऱ्या मलावष्टंभी मनुष्यास युक्तीनें रेच करून बरा करणें.... .... .... .... ४१

९. द्रव्यशोकानें आलेली भयंकर मूर्छा युक्तीनें दूर करणें व त्यास द्रव्य गेल्याचा पुन्हा शोक न होऊं देणें.... .... ४२

१०. सर्पदंश खास होणारा टाळणें व पायास बसलेला त्याचा वेढा युक्तीनें सोडवणें. ४७

११. भूतवैद्यानें तीर्थांत कांहीं अमली पदार्थ

गोष्ट. पृष्ठ.

देऊन रोग्यावर प्राणसंकट आलें असतां तें ओळखून त्यास बचावणें.... ४८

१२. एके मुद्दाम औषध न घेणाऱ्या मनुष्याचें हिंव औषध न देतां युक्तीनें काढणें. ५३

१३. न मिळल्या स्त्रीच्या नादानें भ्रमिष्ट झालेल्या मनुष्यास युक्तीनें ताळ्यावर आणणें.... .... .... .... .... ५७

१४. मत्सरानें एके परस्थ वैद्यावर गहजब प्रसंग ग्रामस्थ वैद्यांनीं गुजरविला असतां त्यांतून तो पार पडला व आपणच यश मिळविलें.... .... .... ७३

१५. पोटांत विषारी पदार्थ गेल्याच्या भ्रांतीनें सुरू झालेल्या भयंकर वांतीस शमविणें. ८१

१६. विहिरींत पडून मृतवत् झालेल्या मनुष्याचा खरा रोग ओळखून रक्तप्रवाह सुरू करून त्यास सावध करणें. .... ८६

१७. बादशहाच्या मूर्खपणानें शेंकडों बंदींत पडलेले वैद्य युक्तीनें सोडवणें व आपणच प्रतिष्ठा मिळवणें.... .... .... ८८

१८. आळस देतांना वरतीं आडकलेला हात औषधानें बरा न होणारा हात युक्तीनें खालीं आणणें... .... .... .... ९२

१९. राजपुत्राचें खोटें वेड ओळखून त्यास ताळ्यावर आणणें व त्याच्या माता पितरांस आनंद देणें.... .... .... ९३

२०. वैद्यानें युक्तीनें एक मोठी चोरी पकडली. १०८

| गोष्ट. | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| २१. | जन्माच्या मुक्यास युक्तीनें बोलका करणें. | १११ |
| २२. | भयंकर उचकीचा वेग शमविणें.... | ११४ |
| २३. | यथाशास्त्र उपचार सांगितला असून गुण येत नसतां तोच उपचार पर्यायानें व मनाच्या समजुतीप्रमाणें योजिल्यामुळें गुण कसा आला त्या विषयीं.... .... | ११६ |
| २४. | आडलेल्या बाळंतिणीच्या वेणा मंद झाल्या असतां पुरूष्याच्या शरमेमुळें नेट देऊन सुटका करवणें.... .... | १२० |
| २५. | कित्येक ज्वर स्थलविशेषी कुंद हवेनें व पाणी बिघडल्यानें उत्पन्न होतात. व ते साधारण ज्वरसंबंधीं उपचारांनीं बरें होत नाहींत. अशा प्रसंगी जागा व पाणी बदलल्यानें रोग्यास पालट कसा पडतो त्या विषयीं .... .... .... | १२२ |

का. सं.क्र. १०८०८
मराठी ग्रंथ संग्रहालय नं० का ३७

# अमोलिक वैद्यकचातुर्य.

## गोष्ट १.

एके मांडलिक राजाची स्वारी देशपर्यटनास निघाली असतां गोंवें प्रांतीं सांवतवाडी येथें एक सोनाराची मुलगी अवचित त्याच्या दृष्टीस पडली. तिचें लावण्य व ज्वानीचा बहर पाहून राजाचें मन अगदीं मोहून गेलें. नंतर त्यानें तिच्या बापास व नवऱ्यास इच्छित धन देऊन मुलीस विकत घेतलें; व तिच्या नवऱ्याचें दुसरें लग्न करून दिलें. इतकें कृत्य होण्यास सुमारें दोन महिने लागले. परंतु राजाच्या मनांत आलेली गोष्ट लौकरच सिद्धीस गेली; रोज ती रात्रीं राजाकडे येई व दिवसास माहेरीं जाई. पुढें स्वारी परतण्याची तयारी झाली त्यावेळेस हिची किंचित् प्रकृति बिघडली. सबब आणखी सुमारें पंधरा दिवस तेथेंच मुक्काम झाला, नंतर निघून या स्त्रीसहवर्त्तमान राजाची स्वारी आपल्या नगरास परत आली.

इकडे आल्यावर सुमारें पांच सहा महिने या स्त्रियेची प्रकृति चांगली होती. पुढें एकाएकीं तिच्या प्रकृतींत बदल पडत चालला; हळूहळू अन्न कमी जाऊं लागलें, तोंडावरची टवटवी कमी झाली, अक्षयीं चित्त उदास, कोणतेंहि कृत्य सुचूं नये; अशी स्थिती झाली. हें पाहून राजानें तिच्या आवडीचे पदार्थ, खेळ व विला-

साच्या जिनसा तिजकडे पाठवाव्या व आपणही वारंवार तिजकडे जावें. पण हिच्या मनास ते कांहींच रुचेना. दिवसानुदिवस जास्तीच क्षीण होत चालली. तेव्हां राजानें वैद्यास प्रकृति दाखविली, व औषधी उपचार चालू केले; पण गुण येईना. वारंवार वैद्य लोकांच्या सभा भरवून निदान ठरवीत. कोणी क्षयाचें प्रतिपादन करीत; कोणी पांडुरोग ह्मणत, कोणी ह्मणत छेहो! हा जीर्ण ज्वरच आहे. अस्तु, अशा प्रकारें वादविवाद होऊन शेवटीं सर्वव्यापक असा एखादा उपचार करीत परंतु गुण नाहीं; तेव्हां कोणी कल्पना काढलीकीं, है असें उपयोगाचें नाहीं. एकेक वैद्याचे मार्फत उपचा चालू करावा ह्मणजे जोखीम त्याजवर राहील व प्रकृती ची चलविचल होणार नाहीं.

मग काय विचारता! वैद्याचे ग्रह उदयास आले. ज वैद्य उपचार करावयास लागे तो मागच्यास दूषण देऊन नवीनच एखादें रसायणाचें नांव सांगे; व ह्मणे, हें दि लें असतें तर आज कधींच प्रकृति नीट झाली असती. असें म्हणून कोणी क्षयकुलांतक, कोणी लक्ष्मीविलास, कोणी त्रैलोक्य-चिंतामणि व त्रिभुवनकीर्तिरस इत्यादि मोठमोठ्या नांवाचीं रसायणें करविण्याचा आव घालून द्रव्य खात; परंतु कोणत्याही औषधानें तिळमात्रही फा यदा झाला नाहीं, अशी अवस्था झाली. तेव्हां राजा चेंही मन उद्विग्न झालें.

इतक्यांत एक अतिवयोवृध्ध वैद्य बरोबर एक शिष्य घेऊन त्या गांवांत आला. ही बातमी कळतांच राजानें त्यास बोलावून आणून प्रकृति दाखविली. प्रकृति पा

हिल्यावर वैद्य म्हणाला "ज्या ज्या वैद्यांनीं हिला औषधें दिलीं आहेत. त्या सर्वांस बोलावून आणा म्हणजे त्यांनीं काय काय उपचार केले याची चौकशी करून मग मी या कामांत हात घालीन." असें वैद्याचें भाषण ऐकून राजानें पूर्वींचे सर्व वैद्य जमा केले. नंतर यानें खुलासेवार चौकशी करून राजास सांगितलें कीं, यापैकीं कोणास बरी करण्याची हिंमत असेल तर विचारा; नाहींतर तुह्मी निराश झालांच आहां, मला एक युक्ति सुचली आहे; मी प्रयत्न करून पाहतों. काय परमेश्वर यश देईल तें खरें! हें ऐकून राजा ह्मणाला. "हे सर्व थकले आहेत. आतां आपणच तिचे मायबाप आहांत, उपचार करून जीवदान द्या म्हणजे मी तुमचे आभार विसरणार नाहीं."

असें भाषण झाल्यावर औषध देण्याचा विचार ठरला. राजवाड्यांतच याचें बिऱ्हाड आलें, व हे सांगतील त्याप्रमाणें त्या स्त्रियेची व्यवस्था ठेवावी असा हुकूम झाला. नंतर दुसरे दिवशीं एक मधुरसें औषध घेऊन वैद्य तिच्याजवळ गेला, आणि ह्मणाला, "बेटा ऊठ, हें औषध घे; मी तुझा रोग जाणला, व लौकरच बरा होण्याचा उपाय करितों. मी इतर वैद्यांसारखा नाहीं." हें ऐकून तिनें हळूच याजकडे पाहिलें आणि ह्मणाली, "पुरे आतां औषधें. मला औषधांचा तिटकारा आला. मी आतां मरणार." हें ऐकून वैद्य ह्मणतो, "बेटा तूं भिऊं नको. तूं मरत नाहींस; मला ज्योतिष चांगलें समजतें. अझून तुझें आयुष्य पुष्कळ आहे. तुझ्या इच्छा पूर्ण होणार आहेत. जेथें मला यश मिळणार नाहीं तेथें मी

हातच घालीत नसतों. येथें मी हात घातला आहे, परमेश्वर मला यश देईल. घे हें औषध, घे." हें ऐकून तिच्या जिवास अंमळ धीर आला, आणि तिनें तें औषध मुकाट्यानें घेतलें. नंतर पथ्याची तयारी करावयास सांगितली व वैद्य तेथेंच बोलत बसला.

बोलतां बोलतां तिचें माहेर कोठें, सासर कोठें, हा योग जमल्यास किती दिवस झाले; वगैरे सर्व खुलासा काढून घेतला. आणि ह्मणाला, "तुमची प्रकृति त्या हवेवर गेल्यावांचून चांगली नीट होणार नाहीं. बरें असो, तुह्मास अंमळ हुषारी येऊं द्या, ह्मणजे आपण हवा पालटण्यास जाण्याचा विचार करूं. पण गेलें पाहिजे खरें." इतकें बोलत आहे तोंच पथ्याची तयारी झाली. वैद्यानें तिला आपल्या समक्ष थोडेंसें खाऊं घातलें, व आपण स्नानास गेले.

स्नान, संध्या, भोजन वगैरे आटपल्यानंतर जेऊं घालणारास विचारलें. "कायरे? रोजच्या सारखेंच आज जेवली किंवा कांहीं कमी जास्ती?"तेव्हां त्यानें सांगितलें. "महाराज! जेवण रोजच्या इतकेंच; पण हें नको मला, तें नको मला, हें मात्र कांहीं केलें नाहीं. असेंच आज दुपारचेंही जेवण झालें." अस्तु.

एकंदर धोरणावरून वैद्यास वाटलें कीं, कांहीं फल होईल. नंतर तिसरे प्रहरीं पुन्हा रूप्याच्या वाटींत औषध घेऊन गेले आणि ह्मणाले, "काय मग? हवा पालटण्याचें कसें? यायचेंना?" तेव्हां ही ह्मणते, "माझें तिकडे कोणी माहेरचें नाहीं कांहीं नाहीं, हे कसले पाठवितात आणि मी कसली येतें!" हें ऐकून वैद्य म्हणाले, "त्याविषयीं

तुला काळजी नको. मी राजापासून पूर्वीच कबूल करून घेतलें आहे कीं, चांगली बरी होई तों पर्यंत मी सांगेन तसें तुह्मास ऐकलें पाहिजे." असें बोलणें चाललें आहे तों तेथें राजाची स्वारी आली. तेव्हां वैद्यानें औषध पुढें करून दिलें व तिनें मुकाट्यानें घेतलें. हें पाहून राजा ह्मणतो, "अरे वा! आज खळखळ न करितां औषध घेतलें. वैद्यबोवा, तुमच्या हातास यश येवो ह्मणजे झालें." राजानें, तिच्यासमक्ष तुह्मी सांगाल त्यांत कांहीं कमी पडूं देणार नाहीं असें पुन्हा कबूल केलें. नंतर पथ्याची तयारी सकाळच्याप्रमाणें करावयास सांगून राजा व वैद्य बरोबर उठून गेले.

पुन्हा रात्रीं भोजनोत्तर झोंप लागावी ह्मणून औषध देण्याकरितां आले, व बोलतां बोलतां काळजीनें रोग वाढतो आणि चांगलीं औषधें दिलीं तरी लौकर बरा होत नाहीं, अशावर बोलण्याचा ओघ आणला. आणि दृष्टांतास एक दोन गोष्टी सांगितल्या कीं, एके मनुष्यास नौकरीवरून बडतर्फी मिळाल्याबरोबर ताप भरला होता, पुष्कळ उपचार केले पण गुण येईना. शेवटीं तर्कानें हें कारण उमगल्यावर त्यास सांगितलें कीं, तुह्मी बरें झाल्यावर माझ्या एका स्नेहाजवळ नौकर रहाल तर पहा. त्यास तुमच्या सारख्या मनुष्याची फार गरज आहे. व त्यानें मला या बाबतींत पत्र लिहिलें आहे. हा सुगावा लागतांच हळू हळू त्याची प्रकृती नीट होऊं लागली. अस्तु. पुढें त्यास हें बतावणीचें कारणही सांगितलें व एके स्नेह्यापासून एक नौकरीही देवविली. तसेंच एकदां एकजण परिक्षेंत नापास झाला होता व ज्वर येऊन अग-

र्दी बेफाम तब्बेत होऊन गेली; तेव्हां तर त्यास सांगितलें कीं, परिक्षा घेणारा माझा जिवलग दोस्त आहे. मी त्याचा हात धरून तुला पास करवीन. तेव्हां त्यास गुण पडत चालला. तात्पर्य, काळजी हा रोग मोठा भयंकर व विलक्षण आहे. ह्या गोष्टी बोलत असतां तिचें लक्ष्य इकडे लागलें आहे हें पाहून वैद्यानें ह्मटलें. "ह्या कांहींच नाहींत; विरहापासून ज्या एकेक स्थिति व नकला होत असतात त्या कांहीं अतर्क्यच. त्यास फारच धूर्त वैद्य पाहिजेत. नाहींतर दे औषधें, दे औषधें—करून प्राणांशीं गांठ घालतात. हो! लज्जेमुळें कारण व्यक्त करवत नाहीं व इच्छिली वस्तु मिळत नाहीं. मग रोग कसा बरा होणार? तर अशा वेळीं वैद्यानें मोठ्या धूर्ततेनें रोगाचें कारण ओळखून रोग्यास इच्छित पदार्थ आणून दिला पाहिजे ह्मणजे रोग हटलाच." अशा गोष्टी बोलतां बोलतां रात्र बरीच झाली. ह्मणून कांहीं अंमळ गुंगी येण्याचें औषध देऊन वैद्य उठून आपल्या खोलींत निजावयास गेले.

त्या रात्रीं हीस हा वैद्य मोठा धूर्त आहे व याचे हातून माझा कार्यभाग होऊन मी कदाचित् बरी होईन. असें वाटलें; व नंतर कांहीं वेळ मनांत तऱ्हेतऱ्हेचें तरंग येऊन त्याच नादांत झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं वैद्य औषध घेऊन तिजकडे गेले. तेव्हां तिनें ह्यास या बसा ह्मटलें, व आज फार दिवसांत रात्रीं अंमळ झोंप लागली असें सांगितलें. आणि ह्मणाली, "आपल्या गोष्टी ऐकून मला बरें वाटतें. एकूण वैद्य असावा तर असाच; नाहींतर, हे काय मेले एकमार्गी!!

बरें, वैद्य बोवा, काल आपण विरहाच्या नकला याहून मजेच्या आहेत असें ह्मणाला तो काय प्रकार आहे॰सांगा पाहूं." हें ऐकून वैद्य ह्मणाले, "अगे, त्याचा एक का प्रकार आहे! अनेक तऱ्हा पुरुषास व स्त्रियांस होतात.

श्लोक.

दृष्टिप्रेमपुराभ्रमोथमनसिप्रोक्तोथसंकल्पको,
निद्रोच्छित्तिरत:शरीरतनुतालज्जाविनाशस्तत:
वैराग्यंविषयेष्वथोनिगदितेउन्मन्मादमूर्छाततो,
मृत्यु:स्यादितिपंडितै:स्मरदशाउक्तादशैवक्रमात्॥ १ ॥

(कल्याण मल्ल कवी कृत.)

भावार्थ, " प्रथमत: जामुळें विरह झाला त्यास पाहण्याविषयीं फार प्रेमा उत्पन्न होईल, दुसरें कांहीं सुचणार नाहीं, चित्तांत निरंतर भ्रम, मन सर्वदां त्या विचारांत निमग्न, निद्रेचा नाश, तसेंच शरीर कृश होत जाईल. वेळेस निर्लज्जताही प्राप्त होईल, क्षणांत वैराग्य होईल कीं, नको हा संसार. कदाचित् उन्मत्तता प्राप्त होऊन वेडही लागेल, वारंवार मूर्छा येईल, फार काय? शेवटीं ह्या भयंकर विकारापासून इच्छा पुरी न झाल्यास मृत्युही येईल." अगे हा विकार मोठा गहन आहे. ज्यांस सामान्य कामज्वर झाला असतो त्यांस अशीं लक्षणें होतात.

श्लोक

कामजेचित्तविभ्रंश स्तंद्रालस्यमभोजनं ॥
ऱ्हदयेवेदनाचास्य गात्रंचपरिशुष्यति ॥ १ ॥

(माधव निदानांतील.)

भावार्थ, कामज्वरी मनुष्यास चित्त भ्रंश, झांपड,

आळस, जेवणावर इच्छा नसणें, हृदयांत पीडा, शरीर कृश इत्यादि अनेक लक्षणें होतात.

याप्रमाणें वैद्यबोवा जों जों एकेक लक्षण सांगत; तों तों तें अगदीं हिच्या हृदयांत बिंबे, आणि त्यामुळें तीस असें वाटूं लागलें कीं, खरेंच माझी असी दशा आहे, हें पुरतेपणीं वैद्यानें जाणलें. तेव्हां अंमळ साशंक होऊन ह्मणाली, "वैद्यबोवा असा एखादा रोगी मनुष्य तुम्हास मिळाला तर मग त्यास पुढें उपचार काय करितां?" वैद्य म्हणाले, "असला रोगी प्रथमतः लज्जेमुळें कबूल होत नाहीं. पुढें त्यास साधक बाधक प्रमाणें पाहून पुरती खात्री झाली कीं, हाच रोग आहे, ह्मणजे रोग हटलाच. हरतऱ्हेनें गुप्त रीतीनें त्याची इच्छा पूर्ण केली ह्मणजे रोग हटलाच आणि असें करण्यास शास्त्राधार आहे. जीव वांचतो आहे तर काय हरकत आहे? येथें काय आहे! हे प्रसंग बादशाही राज्यांत फार येतात. आधीं त्यांच्या बायका पडद्यांत असणार. त्यांत आमही पडद्याच्या आडून बोलणार. मग परपुरुष दृष्टीस पडण्याची गोष्ट कशास पाहिजे. त्यांना हे रोग वारंवार होणार म्हणून कां त्या मेल्या आहेत? हं! उपचार चाललेच आहेत. दुनयेचा कारखाना आहे. मी ३९ वर्षें नबाब अमीरखानचे पदरीं होतों." इतकें बोलणें झाल्यावर ती अंमळ स्तब्ध बसली, आणि ह्मणाली, "आतां आपण तिसरे प्रहरीं या. उशीर झाला आहे; मी आतां पथ्याचें घेतें."

इतकें झाल्यावर वैद्यबोवा उठून गेले, व हिनेंही पथ्याचें घेतलें. आणि बिछान्यावर निजली. मनांत विचार

हा घोळतो आहे कीं, वैद्यानें तर खरोखर ओळखलें. "आतां कबूल व्हावें कीं नाहीं? बरें, लज्जेनें न कबूल व्हावें तर असेंच झुरून झुरून मरावयाचें. कबूल झालेंच तर तो धूर्त आहे, एखादी तोड काढील." असें नाना-तऱ्हेचे तरंग मनांत येतां येतां शेवटीं कबूल होण्याचा विचार ठरला व ती वैद्याची वाट पाहात बसली.

तिसऱ्या प्रहरच्या सुमारास वैद्य येऊन बसत आहेत तोंच राजाची स्वारी आली, त्यामुळें कांहीं बोलण्यास फुरसत झाली नाहीं. सबब वरवर गोष्टी बोलून निघून गेले.

रात्रीं पुन्हा वैद्यबोवा औषध घेऊन आले तेव्हां ही म्हणते, "गोष्ट अगदीं फोडूं नका. आपण खचित ओळखलें. मला सर्व लक्षणें सकाळीं आपण सांगित-लीं त्याप्रमाणें होतात. आतां मायबाप सर्व तुम्ही आ-हां; मी उघड करून सांगतें." माझ्या माहेरीं कनै एक— ( असें म्हणून लाजल्यासारखें करते ) तेव्हां वैद्य म्हण-तात. "हं, बोल बेटा. भिऊं नको. मी सर्व गुप्त राखून तुझें काम करीन" तेव्हां ती म्हणाली,—"कनै—एक सोनार आहे. अहाहा!! काय त्याचें रूप व गुण! मला इकडे आणल्यावर आशा होती कीं, आईबापास भेटाव-यास गेलें म्हणजे त्याची भेट होत जाईल. परंतु व्यर्थ! मी इकडे आल्यावर एक दोन महिन्यांनीं वाख्याच्या सपाट्यांत तेही मरून गेले. आतां तिकडे जाण्याची आशा ही नाहीं. उघड रीतीनें तिकडील खबरही आणतां येत नाहीं." असें म्हणून रडूं लागते. तें पाहून वैद्य म्हणतो, "उगी रहा. अं:! यांत काय आहे? तूं

अंमळ बरी हो. आपण त्यासच येथें आणवूं; तिकडे जाणें तरी कशास पाहिजे? मी उद्यां मुद्दाम कांहीं तिकडील औषध आणावयाचें आहे असें सांगून मनुष्य पाठवितों. व त्याच्या हातचें सुखरूप असल्याबद्दल पत्र आणतों मग तर झालें ना? मागाहून युक्तीनें लौकरच त्यासही आणवूं."

हें बोलणें ऐकून तीस अंमळ धीर आला आणि म्हणते, "पहाहो! काम फार गुप्तरीतीनें झालें पाहिजे. नाहींतर उद्यांचें मरण आजच पुढें येईल. त्यांत माझ्यामुळें आणखी तुम्हास!" हें ऐकून वैद्य म्हणतो, "वेडे तूं बरी तर हो. काम पहा कसें बेमालुम करितों कीं, जन्मभर त्याची तुमची दोस्ती असून कोणास वहिमही येणार नाहीं."

असें बोलून तिजजवळून त्यास एक पत्र लिहून घेतलें कीं, मी तुला इकडे आणविण्याची तजवीज करीत आहें; माझी प्रकृति अंमळ अजारी आहे; बरी झाल्याबरोबर तुला इकडे आणवीन. फक्त तूं खुशाल असल्याचें स्वदस्तूरचें पत्र हल्लीं आलेल्या मनुष्याबरोबर पाठीव. कळावें. अशा मजकुराचें पत्र घेऊन वैद्य निजावयास गेले व हीही अंमळ विचारांत गोंधळून लौकरच झोंपी गेली.

दुसरे दिवशीं वैद्यानें सकाळींच आपल्या शिष्याजवळ तें पत्र दिलें, व सांगितलें कीं, हें सांवतवाडी येथें अमकें गृहस्थास नेऊन दे व त्याजवळून याचें उत्तर हस्तगत करून घेतल्यावर एकदम त्याजवर कांहीं तरी आळ घालून कैद करून घेऊन ये. तजबरोबर राजाजव-

 स. का. १०७८

ळून पांच स्वार देववितों. जातांना कोणी विचारल्यास औषधें आणावयास जातों अशी बतावणी कर. असें नीट शिकवून, त्याची पांच स्वार बरोबर देऊन रवानगी केली.

इकडे रात्रीं झोंप चांगली लागली होतीच. त्यांत वैद्यानें मनुष्य रवाना केल्याची खबर कळविल्यावर जास्तीच हुषारी वाढली. हळू हळू अन्न जास्ती चालूं लागलें व रोज झोंपही चांगली लागूं लागली. याप्रमाणें दुखण्याचें पाऊल एकेक मागें हटत चाललें. राजासही वाटलें कीं, हा वैद्य खरा. नाहींतर इतर वैद्यांचे डौल व रसायणें करण्याकरितां द्रव्याची मागणी ही मात्र पाहून घ्या. अस्तु, सुमारें सात आठ दिवस झाल्यावर शिष्यानें त्यास कैद करून आणलें. आणि पत्राचें उत्तर व कैदी इसम हे दोनीं गुरूजींच्या हवालीं केले. वैद्यानें त्या कैद्याचा पक्का बंदोवस्त करून तें उत्तर आपण स्वतः त्या स्त्रीपाशीं नेऊन दिलें, तिनें तें अतिशय उत्सुकतेनें उघडून वाचलें. पत्रांत मजकूर कीं, मी समजत होतों येथले प्रेम येथेंच. आतां कशाला माझी आठवण होत असेल? पण "आहे." हीं आपल्या हातचीं अक्षरें पाहून अप्रतिम आनंद झाला. एकदां तिकडे न्या म्हणजे भेटी अंतीं सर्व हेतु पूर्ण होतील. कुशल आहे. असें पत्र वाचल्यावर तीसही फार आनंद झाला, आणि म्हणाली, बरीच मजल पोंचली. "आतां त्यास आणण्याची तजवीज झाली पाहिजे." हें ऐकून वैद्य ह्मणतो, "बरें, तुम्ही बऱ्यातर व्हा. त्यास काय! एका चार दिवसांत येथें आणवूं. अस्तु." अशा प्रकारें चिकित्सा चालल्यावर प्रकृति दिवसानदिवस सधरत चालली, मनास हुषारी

आली, सुग्रास अन्न जास्ती चालूं लागलें, झोंप निवांत येऊं लागली. शिवाय शक्ति येण्याकरितां पौष्टिक औषधें चालू होतींच.

इकडे या कैदीला फार दहशत घातली, मिठाशिवाय अन्न देऊं लागले. त्यामुळें तो बिचारा दिवसानुदिवस अगदींच अशक्त होत चालला. होतां होतां शुद्ध अस्थिपंजर मात्र शिलक राहिला. शब्द व डोळे खोल गेले.

इकडे स्त्रीकडे काय? नव्या ज्वानीच्या बहराप्रमाणें एकेक लक्षण वाढत चाललें. मुखावर चांगली टवटवी आली. इकडून तिकडे बगीच्यांतून हिंडूं लागली. नटणें व अलंकार प्रिय वाटूं लागले. हें पाहून राजास फार आनंद झाला.

पुढें एके दिवशीं त्या स्त्रीनें सोनारास आणण्याविषयीं वैद्यास सांगितलें. त्यानें लागलेंच ठीक आहे, उद्यां मनुष्य पाठवितों असें उत्तर दिलें आणि दुसऱ्या दिवशीं मनुष्य आणावयास पाठविलें अशी खबर ही येऊन दिली. आणि ह्मणाला, "मी तुला कबूल केलें आहे त्याप्रमाणें काम तर करतोंच, परंतु ही तुह्मां स्त्रियांची चाल फार वाईट आहे. यापासून मोठमोठाले अनर्थ होतात. आणि हें महत्पातक करण्याच्या मसलतींतच माझा बहुतेक जन्म गेला; शेवटीं त्रासलों आणि पश्चात्तापानें नौकरी सोडून देऊन घरीं जात होतों, तों वाटेंत तुमचें हें एक**आडवें आलें. परमेश्वर मला या अघोर पातकाबद्दल काय शासन करील तें करो! माझ्या हातून तर अशीं शतशः पातकें झालीं आहेत. त्याजपाशीं क्षमा मागण्यासही तोंड नाहीं!" वैद्याचें हें भाषण ऐकून

ती अंमळ भयभीत व विरस झाली, आणि स्तब्ध बसली. हें पाहून वैद्य ह्मणतो, " अशी स्तब्ध कां? मीं तुला जें वचन दिलें आहे तें कधींही अन्यथा होणार नाहीं. तूं काळजी करूं नको. तुझें काम तर करतोंच परंतु आतां खरोखर विट्ट आला. यांतून मोकळा झालों ह्मणजे आयुष्याचे राहिलेले दिवस पुण्यकर्मांत कोठेंतरी हरीहरी ह्मणत घालवावे, असें मनांत आहे. "

असें बोलून प्रत्यहीं तिला एकेक अनर्थाची गोष्ट सांगूं लागला. कोणत्या गोष्टीचा परिणाम आत्महत्या; कोणाच्या अब्रूस बट्टा लागून तोंडास काळोखी आली, असा; कोणाचा उपदंशामुळें शरिराचा नाश झाला, असा; कोणी धनवान ह्या नादानें दरिद्री होऊन धुळीस मिळाला, असा. अशा नानाप्रकारच्या गोष्टी ऐकून तिचें मन द्विधा झालें. तिला एकदां वाटे कीं या विकल्पाचा मुळींच नाद सोडावा आणि एकदां वाटे, आरंभलेला हेतु हे वैद्य आहेत तों पूर्ण करून घेऊन पुन्हां त्याचें नांवही घेऊं नये.

अस्तु, असा प्रकार चालला आहे, तों एके दिवशीं सोनार आल्याची बातमी आणून पोंचविली आणि फार दुःखी झाल्यासारखा होऊन ह्मणतो, अगे तुझा कितीग जीव त्याजकडे! पण त्याचें थोडेसें तरी प्रेम तुजकडे आहे कां? तो महा ** उपदंशग्रस्त होऊन अगदीं मरणोन्मुख झाला आहे. पाहिजे असल्यास त्याची डोळेभेट करवितों, पण हा रोग ह्मटला ह्मणजे.

"स्पर्शैकाहारशय्यादि सेवनात्प्रायशोगदाः ॥
सर्वेसंचारिणोनेत्र त्वग्विकाराविशेषतः ॥१॥
(वाग्भटग्रंथ, निदानस्थान.")

ह्या न्यायाप्रमाणें संस्पर्शानेंही होतो व कधींही हें दु
विष शरिरांतून साफ निघत नाहीं. असें सांगून शेवटीं ती
तो मनुष्य दाखविला. दाखविण्याच्यापूर्वीं यास शिकवू
ठेविलें होतेंकीं, तेथें गेल्यावर फक्त तूं कपाळास हा
लाव आणि रडूं लाग, ह्मणजे आम्ही तुझी सुटका करूं
त्याप्रमाणें यानें तेथें गेल्यावर केलें. शिवाय जागोजा
खोऱ्याच दुर्गंधी लावलेल्या मलमपट्या, बांधलेलीं क्ष
आणि ती अतिशय अशक्त झालेली अस्थिपंजररूपी भयं
कर मूर्ति पाहून तिच्या मनानें उलट खाल्लीं, फ
इतकेंच म्हणाली कीं, यास माझ्या डोळ्याआड करा
आणि उपचार करून बरा करा. मी लागेल तो ख
र्च देईन.

वैद्य बोवा, माझें मन आधीं आपल्या उपदेशापासू
विटलेंच होतें; आणि आतां तर हें स्वरूप पाहून अगदी
त्रासच घेतला. "मी आणवितें" असें पत्र पाठविलें अ
सून त्याच्यानें इतका धीर धरवला नाहींना! नशी
त्याचें !!

अस्तु, पुढें वैद्यबोवांनीं त्यास बरा केला व पुन्हा य
मुलखांत न येण्याविषयीं भयंकर ताकीद देऊन सुमा
एक हजार रुपये बक्षीस देऊन रवाना केलें. पुढें हि
ची प्रकृति चांगली सुधारली हे पाहून राजानें एके दि
वशीं सभा केली, व वैद्याची पुष्कळ वहावा करून त्या
स इनाम व पोषाक दिले, आणि जहागीर करून देऊ
आपला अश्रित करून ठेविला. ह्यानंतर कित्येक दि
वसांनीं तो सोनार बरा झाल्याची खबरहि हिला कळ
ली; परंतु उपदंशाचें विष शरिरांतून साफ कधींच नि

त नाहीं ही भीति व या दोघांचा उपदेश मनांत वागत असल्यामुळें पुन्हा या दुर्गुणाकडे तिचें कधींच लक्ष्य गेलें नाहीं.

---

## गोष्ट २.

बडोदें राजधानींत एक अत्यंत श्रीमंत गृहस्थ रहात असे. तो आपल्या वयांत आल्यावर नित्यशः नाच रंग, तमाशे, वगैरे जें चित्तास वाटेल तें करून चित्तरंजन करीत असे. सहज बाहेर स्वारी निघाली तर पांच पंचवीस मेणे, पालख्या इत्यादि वैभव व स्नेहीमंडळ बरोबर असे. भोजनाचा थाट बहुतकरून रोजरोज केशरी भात, जिलब्या, मोतीचूर वगैरे पक्वान्नें पालटून पालटून होत असत. शिवाय प्रातःकाळीं व सायंकाळीं मजेनें खाण्यास सालंमिश्रीपाक, बदामी हलवा, मुसळीपाक, तशींच तऱ्हेतऱ्हेचीं सरबतें व अवलेह, हे आश्रित वैद्यांनीं करून ठेविलेले असतच.

अशा प्रकारचे सुखोपभोग व चैन भोगीत असतां हळूहळू क्षुधा फारच वाढत चालली, अंग स्थूल होत चाललें; चालतांना स्तन, कुले वगैरे लटलट हालूं लागले. अक्षयीं आंगाला घाम आहेच. दिवसास निद्रा घेतल्यावांचून चैन पडेना. आधीं श्रम करण्याची गरज काय? परंतु साधारण उगेच खालून माडीवर गेलें तरी दम लागे.

अशी अवस्था झाली असतां आश्रित वैद्यांनीं कांहीं औषधी उपचार चालू केले. परंतु रावसाहेबांची तबि-

यत जाईल ह्मणून त्यास पथ्य सांगावयाचें नाहीं. जि
वाय पाहिजे तो पदार्थ खावयास व पाहिजे तसें आचरण
करण्यास जो वैद्य परवानगी देईल तोच वैद्य खरा. अ
शी त्यांची समजूत व हे जे पिढीजादे वैद्य यांचाही ध
न्याची अशी समजूत असण्यांतच स्वार्थ. तेव्हां त
शीच समजूत राखण्याकरितां कमी जास्ती द्रव्य घेऊन
इच्छेप्रमाणें वागण्यास परवानगी देत.

असें होतां होतां स्थूलता फारच वाढली, शरीर बेढ
ब दिसूं लागलें, हुषारी मुळींच नाहीं, कोठेंही मन रमे
ना, स्थूलतेमुळें स्नानास जाणें तरी दुसऱ्याच्या खांद्या
वर हात ठेऊन जावयाचें, आंग चोळण्यास दुसरे आहेत
च. आंचवण्याचें तर काय? शागीर्द पुढच्यापुढें
पान ओढून घेऊन बसल्या जागींच तस्तांत हाताव
पाणी घालण्यास तयार. भोजनोत्तर खालच्या खालीं
पान सुपारी झाल्यावर लागलेंच आहारल्यासारखें निजाव
याचें. माडीवर जाणेंही बंद झालें. खालींच ना
बैठकादि चित्तरंजनाचे प्रकार होऊं लागले. अशा
प्रकारें सुखोपभोगाचे प्रकार व रोगाचीं लक्षणें वाढत
चाललीं. पुष्कळ द्रव्य खर्च केलें. गांवांतील व बा
हेरील मोठे मोठे वैद्य यांचीं औषधें घेतलीं परंतु कित
एकच. वैद्यांची स्वार्थपर दृष्टी! सर्व एकत्र जमून धन्या
च्या देखत एकमेकांस मोठेपणा देत व कांहीं धन्याच्या
मर्जीप्रमाणें बोलून रसायण करण्याच्या निमित्तानें द्रव्य
लपटीत.

असे कांहीं दिवस लोटल्यावर बिचारा त्रासला. आ
णि शेवटीं गंगातीरीं जाऊन रहावें असा बेत करून

नाशीक येथें येऊन राहिला. तेथें तर काय? आ–करून बसलेले ब्राम्हण आहेतच! कोणी भूतवैद्याचा बाणा मिरवून आंगारा देतो, कोणी ज्योतिषी ग्रह अनिष्ट आहेत, जप करा, दानें करा, असें सांगतो. वैद्य तर आहेतच. शिवाय अनुष्ठानें, सप्ताह यांची एक गर्दी होऊन गेली.

अशा संधींत काशीकर प्रसिद्ध विद्वान व ज्योतिषी यादवाचार्य वैद्य यांची स्वारी सहज नाशिकास आली. आधींच मोठें नामांकित व धूर्त असल्यामुळें हे आल्याची खबर सर्वांस समजली. रोगी पुष्कळ जमूं लागले. एके दिवशीं यांनीं त्यास बोलावून आणून आपली प्रकृति दाखविली. वैद्यानें प्रकृति पाहिल्यावर सांगितलेंकीं, गांवांतील प्रसिद्ध वैद्यांस बोलावून आणा व सभा करा, ह्मणजे मी आपलें मत देतों. असें म्हणतांच गांवातले वैद्य बोलावले. शिवाय यांचे बरोबरचे आश्रित वैद्य होतेच ते व हे मिळून सर्वांनीं प्रकृति पाहिल्यावर संवाद चालू केला.

त्यांत प्रथमत: काशीकर वैद्य बोललेकीं, माझ्या मतें हा मेदो-रोग आहे व याची पूर्णावस्था झाली आहे. आपण प्रकृति पाहिलीच आहां; जर कोणाची हिंमत असेल तर छातीस हात लावून आजपासून तीन महिन्यांच्या आंत बरा करावा, आतां जरी आपल्या शास्त्रांत माधवादिकांनीं असें ह्मटलें आहेकीं, श्लोक.

**मेदस्यातीवसंवृद्धौ सहसैवानिलादय:॥**
**विकारान्दारुणान्कृत्वा नाशयंत्याशुजीवितं॥**

(माधवनिदानांतील).

भावार्थ, "मेद अत्यंत वाढला असतां मोठमोठाले भयं-

कर वातादिविकार उत्पन्न करून त्वरित जीविताचा नाश करितांत." असें शास्त्रकर्त्यांचें मत आहे तरीही मी यांत हात घातला तर खात्रीनें सांगतोंकीं, सदरील मुदतीचे आंत यास बरा करीन.

असें बोलताहेत तोंच मध्यें रोगी म्हणूं लागलाकीं "मी पुष्कळ उपचार करून थकलों, आतां आपले पाय धरले आहेत." हें ऐकून वैद्य म्हणाला, "जें मला साध्य वाटतें तेथेंच मी हात घालतों. एकदां हात घातला म्हणजे परमेश्वरकृपेनें तेथें यशच जोडावयाचें, असा क्रम आजदीन पावेतों चालला आहे. मोठमोठे क्षयी, उदरी, हातीं धरून यश मिळविलें आहे. तेथें या मेदोरोगाची कथा काय! परंतु तुम्ही दुसरा कोणी वैद्य थोडक्यांत बरा करणारा असेल तर पहा. आमची मागणी मोठी आहे परंतु आधीं एक छत्रपति घेणार नाहीं, तुमच्या घरीं जेवणारही नाहीं, पदरचें औषध देईन, मुदतीच्या आंत बरा करीन, नंतर ठरावाप्रमाणें रुपये घेतल्यावांचून सोडणार नाहीं. हे माझे नियम आहेत, यांत व्यत्यय येतां कामास नये. तसेंच सांगितल्याप्रमाणें पथ्य व आचरण केलें पाहिजे, तर मी या कामांत हात घालीन."

या खात्रीच्या बोलण्यावर रोग्याचा पूर्ण विश्वास बसला व त[illegible] असें वाटलें कीं, मी बरा झालों तर याच्याच हातून होईन. यांत यास इतर वैद्यासारखें आधीं कांहींच द्यावें लागत नाहीं. आपण आजपर्यंत थोडा कां खर्च केला? काय होईल तें होवो! औषध घ्यावें...

सांगाल त्याप्रमाणें मी वागेन. मला औषध देऊन बरा करा. मी आपले उपकार विसरणार नाहीं. पाहिजे असल्यास लेख लिहून देतों." हें ऐकून वैद्य ह्मणतो, "हं आतां ठीक आहे. मी निदान दोन लक्ष रुपये घेईन. परंतु थांबा, रुपयांचा अंक लेखांत घालूं नका, मी ज्योतिष विद्या चांगली जाणतों. तर गणित करून पाहतों कीं, आपलें आयुष्य किती आहे? व मला यांत यश मिळेल किंवा कसें?"

असें ह्मणून पत्रिका घेऊन पहात बसला. सुमारें तासभर मनन व गणित वगैरे करून चेहरा एकदम फिक्का केला आणि ह्मणाला "महाराज, माझें दैव खोटें! या कामांत मला यश मिळणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर दुनियेंतही कोणास मिळावयाचें नाहीं. सबब मी मुळींच हात घालीत नाहीं. मला तुमची सगळी दौलत दिली तरी मी अपयशाच्या ठिकाणीं हात कधीं घालणार नाहीं." हें ऐकतांच इतर वैद्य व जवळील लोक ह्मणूं लागले "न ब्रूयात् मरणं भिषक्" असें असून तुह्मी यांचा धीर खचवितां हें काय? तेव्हां हा ह्मणाला, "मुदत थोडी राहिली, एवढ्या मोठ्या धनवानाच्या द्रव्याची व्यवस्था लागली पाहिजे. शिवाय कांहीं पुण्यकर्म करणें असेल तर करतील. ज्यास पूर्णपणें मृत्यु कळेल त्यानें असल्या गृहस्थास कळवावा. परंतु पूर्णपणें कोणास कळत नाहीं ह्मणून सांगितल्या मुदतीवर वांचला तर फजीती होईल सबब लोक सांगत नाहींत. माझें तसें नाहीं. मी आपला लेख लिहून देतों कीं, हा आजपासून पंचाहत्तरावे दिवशीं दुपारीं मरेल. तर यानें आपल्या संपत्तीची व्यव-

स्था लावावी. हें माझें भविष्य खोटें झालें तर माझा हात कलम करावा व पुन्हा यावत् जीव भविष्य सांगणार नाहीं." असें निस्पृहतेचें भाषण बोलून तो आपल्या बिऱ्हाडीं गेला. आणि खालीं लिहिल्याप्रमाणें एक पत्र लागलेंच लिहून त्याजकडे पाठविलें.

श्रीशंकर.

मेहेरबानांस करार लिहून देतों कीं, दोन लक्ष रुपये इनाम ठरवून रोग बरा करणार होतों. परंतु रोगाचें शमन होणें नाहीं; कारण कीं, सर्व ग्रह अनिष्ट आहेत, व आयुष्य कांहीं उरलें नाहीं. सर्व प्रयत्न निष्फळ होतील, सबब मी यांत पडत नाहीं, व जी मरणाची वेळ सांगितली आहे ती कधींही अन्यथा होणार नाहीं. व्रतें, दानें, जप, इत्यादिक करून औदार्य दाखवा. व मरण दिवसीं नाम घोष चालूं द्या आणि परलोक साधून घ्या. धर्म कामास येईल. भविष्य चुकल्यास योग्या योग्य विचार न करतां जितकें तीव्र शासन खालीं कौंसांत लिहिलें आहे तितकें बेधडक करा. "आपण मजला देहांत प्रायश्चित्त द्या" हे मी स्वसंतोषें लिहून दिलें सही.

मित्ती ९ सोमवार वैद्य.

इकडे हें पत्र येऊन पोंचल्यावर तर रोग्याचा धीर अ

ठाणे.

गर्दी खचला व त्यास कांहीं सुचेनासें झालें. सदा सर्वदां चिंतेंत निमग्न, अशी अवस्था झाली. लोकांनीं पुष्कळ प्रकारांनीं त्यास सांगितलें कीं, अशीं भविष्यें कोठें खरीं होत असतात. त्याच्या बोलण्याचा काय नेम? तो काय ईश्वर आहे?

त्याजवर हा असें ह्मणें कीं, "असें खोटें भविष्य सांगण्यांत त्याचा कांहीं नफा आहे काय? याशिवाय जर तो औषध देऊं लागता तर गूण येण्याच्यापूर्वीही त्यास लाख दोन लाख रुपये सहज मिळते. असें असून त्यानें एके छदामाचीही आशा न धरतां निस्पृहतेनें स्पष्ट सांगितलें. तेंच खरें! मी आतां मरणार पहा द्रव्य कोणाला नकोसें आहे काय? परंतु त्या सात्विकानें अपयशाच्या भीतीनें द्रव्यही सोडिलें. धन्य तो! एकूण पुण्यवान खरा!"

अस्तु. पुढें उद्विग्न होऊन कशी तशी द्रव्याची व्यवस्था लावली. आजदीनपावेतों करमणूकीकरितां, नाच, रंग तमाशे होत असत, तेही रुचतना; ह्मणून बंद केले. स्नेही मंडळीशीं बोलणेंही आवडेना, दिवसानुदिवस जेवण तुटत चाललें, आणि सर्वकाळ चिंतेमुळें निद्राही तुरळक, अशी स्थिती झाली. प्रकृति फारच अशक्त होत चालली. जों जों हीं लक्षणें जमत चाललीं तों तों लोक ह्मणूं लागले कीं, त्याचें भविष्य खरें होईल. अहो पहा. आतांच्या आतांच अन्न अगदीं तुटलें, निःशक्त किती झाले! असें होतां होतां जों जों मुदत जवळ आली तों तों काळजीनें ह्याचें शरीर दग्ध होत चाललें, कृशता फारच वाढली, अक्षयीं बिछान्यावर पडलेलें, बोलण्याचाही त्रास. अशा प्रकारें काळ कंठीत असतां मरण दिवस येऊन

ठेपला. तेव्हां याचे डोळे खोल गेलेले, पोटांत अ
नाहीं, मुख विरस, मन निरिच्छ घरांत जिकडे तिक
आटपा आटप चालली. नंतर जेवणें वगैरे आटपू
बसल्यानंतर पुष्कळ मंडळी जमली, व दुःखानें हळ
हळत आहेत, तों इतक्यांत ते वैद्य एके हातांत एक तर
वार व दुसरे हातांत औषधाची पेटी घेऊन आणि
एकदम पुढें होऊन ह्मणाले. "काय? आतां आह्मास
ठरावाप्रमाणें देहांत प्रायश्चित्त देतां? किंवा इनामाचें
द्रव्य देतां?"

हें भाषण ऐकून सर्व लोक ह्मणूं लागले कीं, हें काय
इकडे कोण प्रसंग आणि हा इनाम कशाचें मागतो? इ-
तक्यांत ही गोष्ट रोग्याच्या कानीं गेली. त्यानें त्रासामुळें
खोलींत येण्याची लोकांस बंदी केली होती तरी ह्यास
आंत बोलावून आणलें आणि विचारलेंकीं, आपलें काय
ह्मणणें आहे?

वैद्यानें सांगितलें. "महाराज, आतां आपण बरें झालां
फक्त अशक्तता झाली आहे, ही सामान्य औषधें दिल्यानें
जाईल, व तीं मी देतों. आपणास ही जी तीव्र काळ
जी लावली हेंच मी औषध योजिलें. या वांचून आपले
सुखोपभोग बंद झाले नसते, व त्या शिवाय अन्य को-
णत्याही तऱ्हेनें गूण आला नसता."

हें भाषण ऐकून रोग्यास हुषारी आली, उठून बसला
व हा वैद्य फार धूर्त, निस्पृह आणि विचारी आहे असें
जाणून त्याचे फार आभार मानले व लागलेंच ठरावा-
प्रमाणें इनाम देण्याविषयीं हुकूम केला.

तेव्हां आश्रित वैद्य व जवळील लोक आपसांत कुर

कुरूं लागले व कोणी रुपये देण्यास उठत नाहीं हें पाहून रोगी ह्मणाला, "कां? आतां देण्यास उशीर कां?" त्या वेळेस त्यांतील एक धिट्ट गृहस्थ पुढें होऊन ह्मणाला, "परमेश्वराची आपल्यावर दया आहे. आपणांस आनंद झाला आहे तर त्यास कांहीं द्रव्य द्या. एकदम ठरावाप्रमाणें कसलें देतां? हाच यांनीं उपचार केला हें कशावरून. स्वाभाविक यांना ज्योतिषांत जें कळलें तें सांगितलें आतां मुदत तर टळते. तेव्हां कांहीं तरी बतावणी करून वेळ मारून नेण्यास आले आहेत झाले! त्यांत वैद्य लोकांची चाल आहे. कांहीं तरी करावयाचें व त्यापासून हित झालें ह्मणजे तें आह्मीं मुद्दाम केलें असें सांगावयाचें.

हें भाषण झाल्यावर वैद्य ह्मणाला, "आश्रित वैद्य व लोकहो! ऐका. ह्या रोगास चिंता हें शास्त्रोक्त तीव्र औषध आहे. यास प्रमाण श्लोक.

अस्वप्नंचव्यवायंच व्यायामंचिंतनानिच ॥
स्थौल्यमिच्छन्परित्यक्तुं क्रमेणातिप्रवर्तयेत् ॥
(निघंट रत्नाकरांतील.)

भावार्थ, स्थौल्य जावें अशी ज्यांची इच्छा असेल यांनीं थोडी झोंप, मैथुन, व्यायाम, चिंताही वाढवावी. तसेंच,

श्रमचिंताव्यवायाध्व क्षौद्रजागरणास्त्रियाः ॥
हंत्यवश्यमतिस्थौल्यं. (निघंट रत्नाकरांतून)

भावार्थ, "श्रम, चिंता, मैथुन, मार्ग, मध, जागरण आणि स्त्री अवश्य स्थौल्यनाश करितात." हे सामान्य सर्व उपचार मेदनाशक आहेत परंतु "चिंतासमंनास्ति

शरीरशोषणं " ( चिंते सारखें शरीर-शोषण दुसरें नाहीं
तसेंच आणखी एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं,

चिताचिंतासमाख्याता बिंदुमात्रविशेषता ॥
सजीवंदहतेचिंता निर्जिवंदहतेचिता ॥ १ ॥

भावार्थ "चितेहून चिंता बिंदुमात्र अधीक आ
कारण कीं, ती निर्जीव झाल्यावर जाळते. आणि ही त
सजीवाला जाळते. अस्तु, इतक्याकरितां इतर सर्व उ
चाराहूनही श्रेष्ठ उपचार आहे असें जाणून गुप्त
मी योजिला. त्यावांचून मला दुसरा उपाय यो
दिसला नाहीं."

तेव्हां त्यांतील एक आश्रित वैद्य ह्मणाला, "अ
पणांस ज्योतिषांत जें कळलें तें सांगितलें. ईश्वर द
तोच उत्कृष्ट व शास्त्रोक्त उपाय झाला परंतु हा
तुम्ही मुद्दाम केला असता तर कोणाशीं तरी बोलून
विलें असतें; तसें केलें नाहीं यावरून संशय येतो. वा
उपाय उत्कृष्ट!!

हें ऐकतांच वैद्यानें आपला करार आणावयास सांगि
तला. व प्रत्येक ओळीचें पहिलें अक्षर वाचायास सांगि
तलें तों "मेदोरोगास काळजी हें तीव्र औषध योजि
आहे" असें वाक्य निघालें. तेव्हां सर्वांचा पक्की ख
त्रीच झाली. इनामाचें द्रव्य ठरावाप्रमाणें लागलेंच दि
व याच्या धूर्ततेची शिकस्त आहे; चांगली कल्पना ल
विली. अशी वहावा केली. दान धर्म केला आणि आ
तांस वगैरे पोषाक देऊन आनंदच आनंद करून दि
पुढें वैद्याच्या सांगण्याप्रमाणें औषधें, श्रम, आहार, वि

चांगले व्यवस्थित चालल्यामुळें त्याच्या शरीरकांतीचें वर्णन करावें अशी ती झाली.

---

## गोष्ट ३.

एका उतारवयाच्या मनुष्याचें तोंड जांभई देतां देतां तसेंच उघडें राहिलें, त्यास धुरी, प्रवाही औषधें, इत्यादि उपचार केले, परंतु जबडा मिटेना. तेव्हां त्या रोग्यास लोकांनीं सर्कारी दवाखान्यांत नेलें. त्यांतील मुख्य वैद्यानें याचीं सर्व लक्षणें पाहून सांगितलें कीं, याच्या जबड्याचे स्नायू आंखडले आहेत. मी उपचार करितों ह्मणजे आतां अर्ध्या घटकेंत साफ होईल.

असें बोलून उपचार करावयास लागला. प्रथमतः त्यास एके खांबापाशीं असें गच्च बांधलें कीं, हात, पाय किंवा मान वगैरे बिलकूल हालवितां येऊं नये. असें बांधल्यावर त्याच्या घरची मंडळी ह्मणूं लागली. हें काय करितां? तेव्हां वैद्यानें सांगितलें. तुह्मी स्वस्थ रहा; आतां जबडा मिटेल. असें बोलून पटकन एक कोलीत घेऊन आला. आणि ह्मणाला, अजून नाहीं मिटत? नाहीं! बरें पहातों आतां कसें तोंड मिटत नाहीं तें? याची पहजीभ जाळली पाहिजे. असें ह्मणून एकदम पुढें सरसावून त्याच्या उघड्या जबड्यांत ती कोलीत घालण्याचा आव आणला. त्या बरोबर रोग्यानें पटकन तोंड मिटलें. कारण त्या आगीच्या निवारणार्थ तो बांधला गेला असल्यामुळें दुसरें कांहींच साधन नाहीं तेव्हां त्यास जेवढें

नैट करवलें तितकें करून जबडा मिटणें भाग पडलें. अस्तु. ही कल्पना पाहून सर्वांस आनंद व आश्चर्य वाटलें. शेवटीं वैद्याचीं पुष्कळ तारीफ करून आभारी होत्साते आपल्या घरीं गेले.

---

## गोष्ट ४.

एके गृहस्थास तिजांत्रें हींव सुमारें अडीच वर्षे येत असे. त्यानें पुष्कळ औषधें व तोडगे ताडगे केले. पण गूण येईना; शेवटीं त्रासला. प्रत्येक पाळी जशी बोलावून आणावी तशी वेळच्या वेळेस येई! पाळीच्या दिवशीं हा रोगी कांहीं उद्योग न करितां घरीं आपल्या खोलींत बसत असे. त्या खोलींत तिसरे प्रहरीं उन्हाचा कवडसा पडत असे; व तो पडला ह्मणजे यास हींव भरे.

याचे घरीं एके दिवशीं एक वैद्य पाहुणा आला. तो दिवस याच्या पाळीचा होता. जेवण वगैरे आटपल्यावर रोग्यानें आपल्या क्रमाप्रमाणें डोकें चिकें बांधलें; आंगांत एक बंडी घातली, आणि बिछान्यावर गोष्टी सांगत बसले. तेव्हां रोग्यानें सहज थट्टेनें म्हटलें, " कां वैद्यबोवा! याजवर कांहीं तुमची मात्रा आहे? आतां पहा कसें आमच्या आंगांत येईल! त्या खांबापाशीं उन्हाची तिरीप येऊन पडली कीं, आम्हांस पछाडलेंच. मग चार घटका आम्ही कोणाचे नाहीं. पुढें सारी रात्र ताप रहातो. नंतर पहाटेस घाम निघून दुसरे दिवसास साफ मोकळा! मग हवें असेल तर बारा कोसाची मजल मारूं! पण

हें प्रत्यहीं तिसऱ्या दिवशीं आहेच." हें ऐकून वैद्य म्हणतो, "ओहो! वेळ घालवली! जरी सकाळीं बोलला असता तरी काय मजाल आहे? हींव येतें! बरें, पाहूं आतां पुढच्या पाळीस! तुम्हाला तरी एक चमत्कार कळेल."

असें बोलून बुदबळें खेळत बसले. खेळतां खेळतां वारंवार रोगी त्या उन्हाच्या जागेकडे पाही, आणि म्हणे, "वैद्यबोवा! इतका डाव झाला म्हणजे पुरे. आमची वेळ भरत आली." वैद्यानें ह्मणावें, "चालूं द्याहो! असे भितां काय? फारतर डाव अपुरता राहील. दुसरें काय होणार?" असें बोलत आहेत व खेळत आहेत तों पटकन तेथें कवडसा पडला. व या बोवांस हींव भरलें. वैद्य फार धूर्त होता, त्यानें हें सर्व पाहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं रोग्यास सांगितलें कीं, तुझें हींव पुढच्या पाळीस हटकून बरें करतों. मला एके ठाकरानें एक जंगली वनस्पतीचें औषध दाखवून दिलें आहे. पहातर खरें. तें चावल्याबरोबर असें वाटतें कीं, याजपुढें हींव टिकणार नाहीं. आणि तें खायाचेंही नाहीं. चावून अंमळसें तोंडांत धरावयाचें व थुंकावयाचें. असें ह्मणून आपल्या बटव्यांतून पिंपळमुळाच्या काड्या चार एक गुंजा त्यास चावण्यास दिल्या. त्या चावल्या बरोबर तिखट लागल्यामुळें तोंडाचा भडका झाला, कान झणाणले, तेव्हां यास वाटलें कीं, कदाचित् थंडी वाजते वेळेस हे औषध चावलें तर अंमळ थंडी थांबेल. पण कां हींव रहातें? वैद्य ह्मणाला, "बरें, पहाल आतां! (हातच्या कांकणास आरसा कशाला?) परवांचे दिवशीं याचा अनुभव."

अस्तु. याप्रमाणें दोन दिवस सकाळीं औषध देत व

दुपारीं खेळत बसत. पुढें तिसरे दिवशीं वैद्यानें कोणास न कळूं देतां मोठ्या पहाटेस घरावर जाऊन कवडसा पडण्याची वाट बंद केली. आणि रोजच्या प्रमाणे सकाळीं औषध दिलें. व जेवण झाल्यावर बुदबळें खेळत बसले. या दिवशीं वैद्यानें डाव आपल्या आंगावर घेतला. आणि त्यास खेळण्याच्या नादांत अगदीं गर्क केलें तरी तो वारंवार त्या कवडसाच्या जागेकडे पाही; आणि खेळावयास लागे. या दिवशीं तेथें कवडसाही पडला नाहीं व रोग्यास हींवही आलें नाहीं.

हें पाहून त्या रोग्यानें रात्रीं त्या औषधाची फारच तारीफ केली.

दुसऱ्या दिवशीं वैद्यानें सांगितलें कीं, ह्या औषधानें एखादे वेळेस हींव जातें व हें विद्यांत पोटांत खाण्यासही देतात. परंतु तुमचीं मुख्य औषधें कवडसा बंद करणें, तुमची औषधावर श्रध्धा बसविणें व तुह्मास खेळण्याच्या नादांत गुंतविणें हीं होत. तेव्हां रोगी ह्मणाला. हें कसें? त्याजवर वैद्य ह्मणतो. (श्लोक.)

ज्वरकालस्मृतिंचास्यहारिभिर्विषयैर्हरेत् ॥

असें आहे. मी जाणलें कीं, तुमचें लक्ष्य अक्षयीं त्या कवडशावर असे, व तो पडला ह्मणजे तुह्मास हींव भरे. ह्मणून प्रथमतः तो कवडसा बंद केला. तसेंच तुमचें मन मी आपल्या आंगावर डाव घेऊन खेळण्याकडे गुंतविलें, आणि तुह्मास पाळीचा थोडा विसर पाडला तेव्हां हींव गेलें. कित्येक रोग असे असतात कीं, रोग्याचे मनावर त्याचें कमजास्त होणें असतें. त्या वेळेस त्या

रोग्याच्या मनाची समजूत अनकूल असी पाडणें हें व वैद्याचें काम.

अस्तु. या दिवशीं जें त्याचें हींव गेलें तें पुन्हा आलें नाहीं. सबब रोग्यानें त्याचे फार आभार मानले. व वैद्यही त्याचें काम होतांच आपल्या गावीं गेला.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

---

## गोष्ट ५.

एक गृहस्थ पंढरीस जात असतां, वाटेंत पुणें येथें आपल्या स्नेह्याच्या घरीं उतरला. तेथें त्यास कांहीं सोडत खेळणारी मंडळी भेटली. त्यांच्या संगतीनें हाही सोडतींत आपलें नांव घालूं लागला. दोन चार वेळां याचें नांव निघालें नाहीं. परंतु यानें निश्चय केला कीं, आणखी पांच चार वेळां करून पाहूं व एकदां आपल्या नांवाची सोडत निघाली ह्मणजे पुन्हा नांव न घालतां निघून जाऊं. असा विचार करून रोज रोज आपलें नांव बळेंच घालूं लागला. मनांत इच्छा कीं, एकदां तरी लोकासारखा लाट सांपडेल.

असें चाललें असतां सुमारें नववे दहावे दिवशीं ह्याच्या नांवाची सोडत निघाली. तींत एकंदर पंचवीस हजारांचा ऐवज होता. हा गरीब गृहस्थ. यानें कधींही एवढें द्रव्य पाहिलें नाहीं. त्याच्या पुढें एकदम या थैल्या येतांच तो आनंदानें अगदीं वेडा झाला. कोणाशीं नीट बोलेना, व एक सारखा हसूंच लागला.

यापमाणें त्याची दशा झाल्यावर घरधन्यास मोठें दुः-

ख झालें कीं, आपल्या घरीं हा बहुता दिवशीं स्नेह-सं
धानें आला आणि त्याजवर हा प्रसंग!! नशीब आपलें
असें मनांत आणून वैद्यास बोलाविलें. हा वैद्य फार धू
होता. त्यानें असें होण्याचें सर्व कारण समजून घेऊ
विचारलें, याचें घर कोठें? व मुलें माणसें कोणी आहे
कां?

हा प्रश्न ऐकून घरधन्यास वाटलें कीं, वैद्यानें हा मर
णार असें निदान केलें असावें. इतक्यामुळें अंमळ साशं
क होऊन सद्गदित-कंठानें ह्मणाला, भिवंडीस एकुलता-
एक लहान मुलगा व एक बायको आहे. वैद्य ह्मणाला,
"बरें तर तुह्मी पांच सहा असामी मोठ्यानें रडायाला
लागा. आणि रडतां रडतां ह्मणा कीं, घरास आग ला-
गून मुलगा जळाला."

घरधन्यास व दुसऱ्या मनुष्यांस वाटलें कीं, हा कांहीं
तोडगा असेल. अस्तु. पुढें सात आठ असामी मिळून
मोठ्यानें आक्रोश करून रडूं लागले व त्या मुलाच्या नां-
वानें हाका मारूं लागले.

इकडे वैद्य कांहीं तीक्ष्ण औषध हुंगण्याकारितां किंवा
अंजना कारितां तयार करीत होता. तोंच त्या रोग्यानें हा
मोठा कल्लोळ व त्यांत आपल्या मुलाचें नांव हें ऐकून
चट्कन् तो शुद्धीवर आला. आणि विचारूं लागला कीं,
"आहे काय! रडतां कां!" वैद्यानें खूण केली कीं, इत-
क्यांत सांगूं नका, रडणेंच चालूं द्या. मंडळीनें तसेंच
केलें. तों हा चांगला शुद्धीवर येऊन त्याचें शांतवन करूं
लागला व रडण्याचें कारण विचारूं लागला. पुढें को-

णीच बोलत नाहींत ह्मणून तेथें स्तब्ध बसलेला हा वैद्य याजजवळ आला आणि विचारूं लागला.

वैद्यानें पाहिलें, हा बराच शुद्धीवर आला तेव्हां त्यास सांगितलें कीं, भिवंडी येथें अमक्या घराजवळच कोणा एकाच्या घरास आग लागून त्यांत एक मुलगा जळाल्याची बातमी कळली ह्मणून हे रडत आहेत.

इतक्यांत याच्या पोटांत धस्स झालें. व हाही रडूं लागला. ही गडबड चालली आहे तोंच वैद्याच्या तजविजीप्रमाणें एक मनुष्य भिवंडीचें पत्र घेऊन आला. वैद्यानें त्या गड्याजवळचें तें पत्र घेऊन म्हटलें, थांबाहो! हें भिवंडीचेंच पत्र आलें आहे, मी वाचतों. तेव्हां सर्व मंडळी उगी राहून ऐकूं लागली. व ह्यानें तें वाचलें. त्यांत मजकूर कीं, घरास आग लागली होती पण विझविली. बेंडें मात्र जळालें व त्यांत एक आपला *मुरगा जळाला. सामानाचें वगैरे नुकसान झालें नाहीं. परमेश्वरानें विशेष तोहमत लागूं न देतां हा प्रसंग टाळला. सबब त्याचे फार आभार मानतों. खुशाल आहों.

हें पत्र वांचतांच सर्व मंडळीचें रडणें बंद झालें. व हाही चांगला शुद्धीवर येऊन ऐकींव गोष्टींत व पत्रांत कितीहो बदल असें आश्चर्य करूं लागला. नंतर कांहीं वेळानें हर्षवायु झाल्यापासूनची सर्व हकीकत स्नेह्यानें कळविली आणि सांगितलें कीं, "ही युक्ती केली तेव्हां तूं शुद्धीवर आलास." या वैद्याचे आभार मान. तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटलें व वैद्यास पुष्कळ द्रव्य देऊन संतुष्ट केलें, आणि मंडळींनेंही त्याच्या अकलेची पुष्कळ वहावा केली.

---

*कोंबडा. (मुरगा व मुलगा ह्या थोड्या बदलानें.)

## गोष्ट ६.

पूर्वी भावनगर येथें बलदेव रामनाथ या नांवाचा ए
मारवाडी अफूचा मोठा व्यापार करीत असे. याच व्य
पारांत त्यास पुष्कळ द्रव्य मिळून तो फार सधन झाल
होता ह्यास फार दिवस संतान नव्हतें, परंतु दैवयोगा
ह्याच्या चौघी बायकापैकीं एकीस एक मुलगा झाल
त्यामुळें सर्वांची त्याजवर फार माया असून लहान पणाप
सून त्याचे फार लाड करीत असत. तो मागेल
त्यास देत. कोणी कधीं रागें भरत नसत.

अशा प्रकारें तो सगळ्यांचाच लाडका असल्यामु
फार व्रात्य होऊन कोणाचेंच ऐकेनासा झाला. हा
मारें आठ नऊ वर्षांचा झाला, तेव्हां यास दुकानांतू
अफू चोरून खाण्याची संवय लागली. ती दिवसा
दिवस वाढतच चालली. पुढें ती दृष्टोत्पत्तीस आल्याव
आईबाप त्यास रागें भरूं लागले. परंतु हा कोणाचें
ऐकेना. साफ "मी खाईन जा" अशीं उत्तरें देऊं लागल

जों जों हे रागें भरत तों तों हा बळेंच जास्ती अ
खाऊं लागला. कधीं कमजास्त शिक्षा केली कीं, हा रा
गानें जास्ती अफू खाऊन कोठें तरी बेसावध होऊन
पडे. मग काय? एकुलत्या एक्या मुलाची अशी व्यवस्थ
झाल्यावर मातापितरें अगदीं घाबरून जात आणि नान
तऱ्हेचे उतारे व नवस करून त्यास सावध करीत. पु
त्यांनीं त्यास रागें भरणेंही सोडलें कारणकीं, न जाणों
कदाचित् हा आत्महत्या करील.

इकडे याची संवय फारच वाढत ...

धा मंद झाली, अंग निस्तेज झालें व कृशता फारच वाढली, अशी याची दशा झाली तेणेंकरून आईबापास फार दुःख झालें.

अशा स्थितींत ते असतां त्याच्या घरीं एक वैद्य पाहुणा आला. त्यानें हें सगळें पाहिलें व त्याच्या बापास विचारलें कीं, तुमच्या मुलाची ही सवय मोडून जर याचें शरीर चांगलें करून दिलें तर काय द्याल? बाप ह्मणाला, "हें काय विचारतां? जर माझा एकुलता एक मुलगा चांगल्या स्थितीवर आणला तर माझ्या शक्तीप्रमाणें तुह्मी मागाल तें देईन व जन्मभर तुमचे उपकार विसरणार नाहीं."

हें ऐकून वैद्य ह्मणाला, "मी सांगेन तसें घरांतल्या मनुष्यांनीं वागलें पाहिजे; त्या मुलास कोणी रागें भरतां कामास नये. व साफ बरा झाल्यावर रुपये पन्नास घेईन." असें कबूल असेल तर मी उपाय करितों. मारवाड्यानें तें सर्व कबूल केलें. नंतर वैद्यानें पुढें कसें कसें करावयाचें तें शिकवून ठेविलें.

दुसरे दिवशीं जेवतांना हा वैद्य सर्व माणसांस ह्मणाला "काय हो? या मुलास कांहीं रोग नसतां हा इतका वाळला कशानें?" तेव्हां सर्वजण वैद्यानें शिकविल्याप्रमाणें बोलले कीं, यांस अफू खाण्याची मोठी वाईट संवय आहे ह्मणून. तेव्हां वैद्य ह्मणाला, "तर मग तुह्मी त्यास रागें भरत असाल." तेव्हां ते ह्मणाले, हो पुष्कळ रागें भरतों; पण हा आपली दुष्ट खोड टाकीत नाहीं. हें ऐकून वैद्य रागानें ह्मणाला, "मूर्ख आहात तुह्मीं; अफूनें कोठें वाळत कां असतात? वारंवार तमच्या रागें भर-

ण्यानें तो वाळला, खबरदार! कोणी त्यास रागें भर
तर,—मी, पहा, त्यास लागेल तेवढी अफु खावयास दे
पुन्हा पूर्वीसारखा लठ्ठ करितों. मध्यहिंदुस्थानांतील क
प्रांतांत शेंकडो लोक घरोघर अफू खाणारे आहेत." ते
सर्व माणसें चिप्प बसली आणि ह्मणालीं, "वैद्यबोवा
मचा मुलगा आपण बरा करीत असाल तर आह्मी
लकूल रागें भरणार नाहीं. तुमच्या इच्छेस येईल तित
अफू खाऊं घाला." वैद्य ह्मणाला, "बरें तर जेवण
ल्यावर अगदीं अव्वल पैकीं अफू पक्का अच्छेर त्या मुल
जवळ द्या व एक पेटी आणि कुलूप किल्ली द्या."

असें वैद्य बोलत आहेत तोंच मध्यें मुलगा बोलूं ल
गला. "असें जर बाबानें पूर्वी केलें असतें तर मी इत
हट्टी झालोंच नसतों. मला विनाकारण रागें भरत."

अस्तु. पुढे जेवण झाल्यावर पहिल्यानें त्या मुला
बापा जवळून अफू, पेटी व कुलूप-किल्ली देविवली आ
त्यास अंमळ एकीकडे नेऊन ह्मणाला. "मुला, तूं रो
किती अफू खाशील? जेवढी तुझ्याच्यानें खावेल तेव
सांग. तुला कोणी रागें भरणार नाहीं. मी तुला ए
युक्ती सांगतों, तिनें तूं अफू खातां खातां चांगला सश
व लठ्ठ होशील."

हें ऐकून मुलगा ह्मणाला, "बाबा मला उगेंच रा
भरतो. मी कांहीं फार खात नाहीं (हातानें खूण करून
ह्मणतो) फारतर एवढी खातों." वैद्य ह्मणाला, अं हं
तसें नाहीं हा येथें खडू पडला आहे. यांतील एक खड
उचलून दाखीव. किती अफू खाशील तेवढा?" तेव्ह
मुलानें एक खडा उचलून दाखविला. तो हातीं घेऊन

वैद्य ह्मणतो, "हा त्याचा? इतकीच का? आणि इतक्या करितां आईबाप तुला रागें भरत असत? इतक्यानें काय होणार? माझ्या एका स्नेह्याचा मुलगा तर याहून किती जास्ती खात असे. पण शरीर काय उत्कृष्ट होतें–त्याला मीच युक्ती सांगितली होती. अफूचें असें आहे. रोज सारखी वजन करून जी खाणें ती सकाळ संध्याकाळ दोन वेळा खाल्ली पाहिजे. ह्मणजे जसा रतीब लावून मनुष्याचें शरीर सशक्त होतें तसें फक्त या अफूनें होतें. ही युक्ती दुसऱ्यास कळवूं नको. हा खडू तुझ्या पेटींत ठेव. मी तुला एक ताजवा आणून देतों. त्यानें तोलून तूं रोज या खडू भारंभार अफू खात जा. व खडूनें रेघ मारून ठेवीत जा ह्मणजे आपणांस समजेल कीं, अर्धा शेर अफू किती दिवस पुरते? तेवढी संपली ह्मणजे आणखी देववीन. पुढें तुझें शरीर चांगलें होऊं लागलें ह्मणजे मी तुला कसरत शिकवीन. याप्रमाणें तूं वागलास तर तुला हटकून सांगतों कीं, तूं चांगला सशक्त व लठ्ठ होशील तेव्हांच मी जाईन." असें सांगितलें, तेव्हां मुलानें तें सर्व कबूल केलें आणि ह्मणाला, "द्या तर मग ताजवा," नंतर वैद्यानें लागलेंच बाजारांत जाऊन एक चकचकीत नवा ताजवा आणून दिला.

मुलानें हौसेनें तो आपल्या पेटींत ठेविला आणि मी आतां लठ्ठ होईन, कसरत शिकेन, ह्या आनंदानें वैद्यानें सांगितल्या युक्तीप्रमाणें रोज तोलून अफू खाऊं लागला. शिवाय वैद्यानें तिसरे प्रहरीं कांहीं खाऊ ह्मणून पाक वगैरे मुलास द्यावे त्यांतही अफूचे दोष नाश करणारीं औषधें असत.

रोज अफू वजन करून खावी आणि दारावर रेघ
रावी. असा क्रम चालला असतां लौकरच त्याचा खडू अ
झिजला. तेव्हां त्याचें अफू खाण्याचें अर्धे मान क
झालें. त्या योगानें त्यास हुषारी वाटूं लागली. व प
त्या सारखा झिंगत पडेनासा झाला. परंतु त्यास वाटे
खडू झिजतो आणि आपली अफू तुटते. याकरितां अ
पण वैद्याजवळून दुसरें कांहीं वजन मागून घेऊं. अ
विचार करून वैद्याजवळ वजन मागूं लागला.

त्या वेळेस शेजारीं पुष्कळ मंडळी बसली होती.
व्हां वैद्यानें सांगितलें, "तुझी पहिली स्थिति तुला आ
वते? तूं जागोजाग कसा पडत असस? त्या वेळे
तुला हुषारी किती होती! आणि आतां किती आहे!
तेव्हां शेजारची मंडळी म्हणूं लागली, वहावा! ते
काय पाण्याचें पितर झालें होतें! आतांच्याला आ
तेव्हांच्याला जमीन अस्मानचें अंतर!

वैद्य ह्मणाला, "हेंच आमच्या युक्तीचें फळ. जसज
खडू झिजत चालला तसतसी तूं अफू कमी खाऊं ल
गलास व त्यामुळेंच हा तुझ्या शरीर प्रकृतींत बदल पड
चालला. आह्मी तुला जर पूर्वीं सांगितलें असतें क
रोज थोडथोडी कमी खात जा, तर तूं ऐकलें नसतेंस
ह्मणून तुझ्या हातानें तूंच कमी कमी खावीस अशी यु
क्ती योजिली."

"अफू महा दुष्ट आहे. सर्व रक्त शोषून शरीर नि
स्तेज व कृश करिते हें मोठें भयंकर व्यसन तुला होतें
एखादे वेळेस प्राणाशीं गांठ घातली असती."

हें ऐकून मुलास अनुभवसह असें वाटलें कीं आप

मोठ्याच संकटांतून पार पडत आहों. आणि इतकें ह्या वैद्याच्या युक्तीनें झालें. असें मनांत येतांच वैद्याजवळ वजन मागणें सोडून देऊन आपला पूर्व क्रम तसाच चालविला. कांहीं दिवसांनीं खडू सगळा झिजला व याची अफूची संवय तुटली, तेणेंकरून शरीर चांगलें होत चाललें. शिवाय वैद्यानें त्यास पाक वगैरे करून दिले आणि कसरत शिकविण्याचें काम सुरू केलें.

त्यानंतर याचें शरीर बरेंच सुधारलें असें पाहून एके दिवशीं बापानें सभा करून वैद्याच्या अकलेची पुष्कळ वहावा केली आणि यांनीं आह्मांस नवा पुत्र दिला असें बोलून दाखविलें व त्याचे आणि परमेश्वराचे आभार मानून वैद्यास ठरावाच्या दुप्पट रुपये व पोषाक दिला. बाकीच्या मंडळीस दक्षिणा, हार, तुरे, गजरे, पानसुपारी देऊन यथाशक्ति आनंदच आनंद करून दाखविला.

---

## गोष्ट ७.

पुणें शहरांत यलाप्पा या नांवाचा एक व्यापारी रहात असे. त्यास एके दिवशीं सारी रात्र जागरण झालें. व दुसरे दिवशीं दोन प्रहरीं जेवतां जेवतां एकदम उलटी झाली आणि घेरी करावयास लागली; ह्मणून खोलींत जाऊन निजला. संध्याकाळीं जिवास अंमळ बरें वाटलें व रात्रीं जेवणही यथास्थित झालें. पुन्हा दुसरे दिवशीं दुपारीं जेवते वेळेस वांति झाली व रात्रीं जेवण नीट झालें. याच प्रमाणें नित्य होऊं लागलें पुढें दिवसास जेवणें त्यास सोडून देणें भाग पडलें.

पुष्कळ वैद्यांनीं वांति बंद होण्याकरितां तऱ्हे तऱ्हे औषधें दिलीं परंतु गूण नाहीं. याप्रमाणें औषधें घे घेतां तो त्रासला; व पुढें औषधें घेणेंही बंद केलें. [illegible] वसास आपला धंदा उद्योग करावा आणि रात्रीं यथे जेवावें व निजावें असा क्रम चालला. यास सुमारें करा महिने झाले, इतक्यांत त्याच्या घरीं एक नाशीक वैद्य पाहुणा आला. त्यानें एक दोन दिवस हा क्रम प हिल्यावर सहज विचारिलें कीं, यलाप्पा दिवसास जेवा नसतात हें काय? तेव्हां रोग्याच्या आईनें त्यास सर्व त्थंभूत वर्तमान सांगितलें. आणि ह्मणाली, "वैद्य बो पहा. माझा एकुलता एक मुलगा मंडळींत जेवण्यास कला. लग्न असो, कार्य असो, याचें जेवण रात्रीं. आ बरोबर अकरा महिने झाले. औषधें घेतांनाही विट्ट आला.

हें ऐकून घेऊन वैद्यानें आणखी कांहीं खुलासेवार म जकूर विचारून घेतला. आणि ह्मणाला, माझ्या सां ग्याप्रमाणें हे जर वागतील तर मी खात्रीनें सांगतों कीं एक महिन्यांत यास बरा करून पंक्तीस घेऊन जेवू जाईन. शिवाय पहिल्यानें खर्च मुळींच नाहीं. फक्त बरा झाल्यावर रुपये पन्नास घेईन.

त्याच्या आईनें हें बोलणें कबूल केलें व यलाप्पास बोलावून आणून त्याचे समक्ष आईनें ठराव केला कीं साफ बरा झाल्यावर पन्नास काय? पण शंभरही देईन. पुढें वैद्यानें सांगितलें कीं, एक महिनाभर उजेडांत उ द्योग धंदा कांहीं पहातां कामास नये. यास एक आंधेऱ्या खोलींत बसलें पाहिजे; दिव्याचा उजेड चालेल असें मुख्य पथ्य आहे.

सर्व कबूल झाल्यावर दुसऱ्या दिवसापासून औषध चालू झालें. रोग्यास एक्या अंधेऱ्या खोलींत नेऊन ठेविलें व तेथें एक तुपाचा दिवा लावला. आणि उद्योग धंदा करण्यास व गंजिफा वगैरे खेळण्यास परवानगी दिली.

पुढें सायंकाळ होण्याच्या पूर्वींच खेळणारी मंडळी आंधेऱ्या खोलीमुळें संध्याकाळ झाली असें समजून निघून गेली व ह्यांनीं ही त्यास औषध व जेवण नेऊन दिलें आणि निजावयास सांगितलें. दुसरे दिवशीं उजेडावयाच्या पूर्वींच कांहीं स्नेही मंडळीस आंत पाठवून अशी बतावणी करवलीकीं, दारीं चार घटका दिवस आला अजून हे आपले निजलेच आहेत. आंधेऱ्या खोलींत उजेडलेलें कळत नाहीं, पण झोंपेचा तर अजमास आहेना ?

अशी कांहींना कांहीं बतावणी करून रोज घटका घटका वेळ तोडीत चालले. प्रातःकाळीं घटकाभर आधीं उठवावें, औषध द्यावें आणि सायंकाळीं रोजच्यापेक्षां आधीं संध्याकाळ झाल्याची चांगली बतावणी करून जेवूं घालावें. असा क्रम चालवतां चालवतां ऐन दोन प्रहरच्या सुमारास यांची संध्याकाळ झाली. व क्रमाप्रमाणें त्याच वेळेस त्यास जेवावयास घातलें. याची समजूत कीं, ही खरीच संध्याकाळ आहे.

सुमारें तास दोन तास गेल्यावर यलाप्पाचा स्नेही एक फौजदार होता त्यास सगळी हकीकत वैद्यानें सांगितली. व त्याजकडून पोलीसच्या शिपायाजवळ बनावट वारंट करून दिलें आणि त्यास कांहीं देऊ करून विशेष धामधूम करण्यास सांगितलें. शिपाई तसेच धट्टाईनें घरांत शिरले व एकच गर्दी उडवून दिली. रोग्यास ऐकू

जाई अशा स्वरानें ह्मणूं लागले कीं, "जहां मिलेगा वह
पकडलाव ऐसा हमकू सरकारका हुकूम है. और हम
पकी खबर मिली है के, वोह षक्स[1] आज बीस रोज
मकानमें पोषीदा[2] है. और बाहेर तो हमने पहारा र
है. अहमक[3] अब कहां जायगा ?" असे हे भयंकर श
ऐकून घरांत एकच गोंधळ होऊन गेला. व शिप
सोधीत सोधीत खोलींत आले आणि ह्मणाले, "मिला
मिला! अब कहां भागेगा ?"

तेव्हां यलाप्पा घाबरून विचारूं लागला कीं, "अ
काय? पळून कोण जातो? आणि रात्रीचे तुह्मी येथें क
आलां आहां?" हें ऐकून त्यांतील एकजण ह्मणाला
"पकडो पकडो! मजेसे नींदमें था. दो पहरके वख
पूछता हैके तुम रातकू क्यौं आये?"

असें ह्मणून त्यास धरून बाहेर आणलें. नंतर गुन्ह
काय? इतका सक्त हुकूम कोणी केला? वगैरे कोणी वि
चारीत आहेत. कोणी सोडा व घरांत नाहींत असें सां
गा आह्मी तुह्मास खुष करूं, असें सांगत आहेत तों
संकेताप्रमाणें फौजदार आले.

त्यांनीं शिपायांस एकीकडे केलें आणि यास सांगित
लें कीं, आतां तिसरे प्रहरची वेळ आहे व आपण जेवून
बाहेर आलां आहां. अझून वांति झाली नाहीं. हे
सर्व आम्ही मुद्दाम करविलें. आपण आतां बरे झालां.

हें ऐकून सर्वांस आनंद झाला. रात्रीं पुन्हा जेवले
दुसरे दिवशीं इष्टमित्रांसह दोन प्रहरीं भोजन समारंभ
करून भोजनोत्तर सभा केली. आणि वैद्याच्या अकले

१ मनुष्य. २ लपला. ३ मूर्ख.

ची पुष्कळ तारीफ करून त्यास ठरावाप्रमाणें रुपये देऊन जास्ती पोषाक दिला. नंतर पानसुपारी, अत्तर गुलाब होऊन सभा विसर्जन झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

---

## गोष्ट ८.

दिल्ली येथें एके सामान्य अशक्त मनुष्यास चार पांच दिवस फार मलावष्टंभ झाला. तेव्हां इतर वैद्यांनीं पुष्कळ रेचकें वगैरे दिलीं परंतु जुलाब लागू होईना. कोणाचीही कल्पना चालेना कीं, ह्यास अमुक तऱ्हेनें जुलाब करतां येईल. इतक्यांत तेथें एक अबदलशहा या नांवाचा प्रसिद्ध व कीर्तिमान हकीम होता त्यास एकानें बोलावून आणलें. त्यानें सर्व हकीकत समजून घेतली, रोगी पाहिला आणि सांगितलें कीं, यास एक औषध केलें पाहिजे; चार गाड्या फांटीं लौकर आणवा. मी औषधें आणतों असें ह्मणून घरीं गेला आणि सुमारें अर्धघटकेनें चार भले दांडगे असामी बरोबर घेऊन आला.

इकडे यांनीं लांकडें आणून ठेविलींच होतीं. सर्व मंडळी, तो रोगी व आपण असे ओटीवर गप्पा सांगत बसले आणि चौकांत लांकडांचा ढिगार पेटविला. ज्या वेळेस तो चांगला पेटला व मोठमोठ्या ज्वाळा निघूं लागल्या त्या वेळेस यांनीं बरोबर आणलेल्या चौघांस इषारत केली आणि ह्मणाला, "क्यौं अभी क्या देख-

तेहो? अहमक[1]! यह बीमार[2] हमारे सामने पायखाना न होता ऐसा कहताहै. इसको पकडो और आगमें फें देव."

इतकें बोलतांच चौघांनीं उचलला व आगीजव घेऊन जाऊं लागले. इतक्यांत आधीं पुष्कळ रेचं पोटांत गेलीं होतींच आणि वर ही दहशत! मग काय असा सपाटून झाडा झाला कीं, त्याची खात्रीच झाली तेंव्हां त्या चौघांनीं पुन्हा त्यास जागेवर आणून ठेविले

नंतर हकीम म्हणाला कीं, हेंच याजवर औषध. दुस ऱ्या वैद्यांनीं औषधें देण्यांत कांहीं कमती कां केलें अ सेल? परंतु तोंडाशीं झालेल्या प्रतिबंधास हीच युक्ती असें बोलून तो आपल्या घरीं गेला. व लोकांनीं ह त्याच्या अक्कलेची पुष्कळ स्तुति केली व आपआपल्या घरीं गेले.

---

## गोष्ट ९.

पुणें शहरांत एके दिवशीं रात्रीं एके मारवाड्याच्या दुका नास आग लागली. हा मारवाडी फारच धनलोभी होता ज्या वेळेस आग लागली त्या वेळेस फौजदार व गांवकरी वगैरे मंडळी मिळून ती शमविण्याचा पुष्कळ यत्न केला परंतु तो अग्नि आसपासचीं पांचपंचवीस घरें घेतल्या वांचून शमला नाहीं. अस्तु, अंमळ विझवा विझ झाल्यावर मारवाड्यानें फौजदारास सांगितलें कीं, मा

---

१ मूर्ख. २ आजारी. (रोगी)

गाहाणवटीचा व्यापार आहे व सोन्यावांचून मी दुसरें कांहीं गहाण ठेवीत नसतों. घरांतल्या अमक्या बाजूस खोलींतल्या पेटींत सुमारें एकवीस हजारांचे डागिणे आहेत. तर मेहेरबानी करून सकाळपर्यंत चार पहारेकरी ठेवा. माझा हक्क हलालाचा पैसा त्या राखेंतूनही निघेल. हें ऐकून फौजदारानें चार हत्यारबंद शिपाई दिले. त्यास घेऊन हा सभोंवतीं रखवालीस बसला. हा झालेला प्रकार तेथील एके अट्टल सोद्यानें पाहिला व लागलेंच आपले साथी बरोबर घेऊन तेथें आला. नंतर त्यापैकीं कित्येकांस रखवालदार शिपाई व मारवाडी यास नादीं लावण्याकरितां पाठविलें. बरोबर चंच्या, गंजीफा, कांहीं चमत्कारिक कोडीं वगैरे सरंजाम होताच. त्यांनीं आपल्या ठकबाजीच्या कसबाप्रमाणें त्यांस नादीं गुंतविलें हें पाहून अट्टल सोद्यानें राखेसुध्धां ऐवज त्या खुणेप्रमाणें जाऊन चोरला व त्याजवर एक भिंत पाडून ठेविली आणि माल घेऊन सर्वजण पळून गेले.

इकडे दुसरे दिवशीं उजेडतांच फौजदार वगैरे मंडळी जमली, आणि मोठ्या धामधुमीनें मजूरकरांकडून जळकें सामान व राख एकीकडे करून पाहिलें तों तेथें काय आहे? सारी राखच राख !! फक्त कांहीं जळकीं भांडीं मात्र सांपडलीं. दुसरें कांहीं नाहीं.

हें पाहतांच मारवाड्यास द्रव्यशोकानें एकदम मूर्छा आली व भुईवर बेसावध होऊन पडला. तेव्हां भोंवताली मंडळीचा मोठा गराडा जमला. फौजदारानें डोळ्यास पाणी लावून मस्तकावर ही शिंपिलें. परंतु कांहीं केल्या सावध होईना. तेव्हां वैद्यास बोलावून आणलें.

वैद्यानें प्रकृति पाहिली व सर्व हकीकत ऐकून घेऊन सांगितलें कीं, मी डोळ्यांत अंजन घालतों व तुम्ही दोघे चौघे जण एकदम ओरडून म्हणा कीं, चोर द्रव्यासह सांपडला. अशी सर्व तयारी करून वैद्यानें अंजन घातलें व हे संकेताप्रमाणें ओरडले. त्या बरोबर मारवाडी उठून बसला; आणि चोर कोठें आहे? असें विचारूं लागला. त्या वेळेस फौजदारानें सांगितलें कीं, चोर कैदेंत ठेविला आहे व द्रव्य माझ्या ताब्यांत आहे. आतां उशीर झाला आहे. आम्ही जेवावयास जातों आणि तुम्हीही आमच्या येथेंच चला. मारवाड्यासही द्रव्य सांपडल्याचा आनंद झाला होता तेव्हां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें तेथें जाऊन जेवला. वैद्यानें पूर्वींच फौजदारास गुप्तरूपें सुचविलें होतें कीं, यास एकदम द्रव्य गेल्याची बातमी सांगूं नका. कदाचित् सांगाल तर पूर्ववत् अवस्था होईल. इतक्या करितां जेवणांत हें गुंगी येण्याचें औषध घाला, व चोरीचा तपास करा. नच सांपडेल तर (अगदीं कानांत सांगितलें) अशा अशा तऱ्हेनें व्यवस्था लावा.

त्याप्रमाणें जेवणांत गुंगीचें औषध घातलें होतेंच; त्यामुळें जेवण आटपतांच त्यास गुंगी आली, आणि तो निचेष्टित पडला. इकडे यांनीं पुष्कळ चोरीचा तपास केला परंतु तेहीं (          ) येथील ठाणेदार सोदे! त्यांनीं तिळमात्र पत्ता लागूं दिला नाहीं.

पुढें दुसऱ्या दिवशीं मारवाड्याची गुंगी उतरल्यावर फौजदारानें अं:! आतां काय बेसावध होतो? कळवा. असें म्हटलें व कांहीं सांपडलें नाहीं असें त्यास सांगितलें. त्या

बरोबर त्याचा तो भयंकर शोक सुरू झाला व पूर्ववत् प्रसंग येतो कीं काय? असें वाटूं लागलें. तेव्हां वैद्याच्या सांगण्याप्रमाणें "ही सर्व थट्टा! हा पहा चोर." असें ह्मणून एक बनावट चोर दाखवून गुन्ह्याची चौकशी त्याच्या समक्ष चालविली.

त्या वेळेस चोरानें बतावणी केली कीं, एकंदर माल अमुक सांपडला, त्यांतील चौथाई नेतां नेतां आलीपासून कोणी लुटून घेतली. परंतु तीन हिस्से द्रव्य एकया लों-खंडी पिंपांत घालून नदीचे पलीकडे पुरून ठेविलें आहे. अशी जबानी झाली तेव्हां मारवाड्यास चौथाई गेल्याचें दु:ख झालें. परंतु बरें चला, इतक्यावरच गेलें, अझून तीन हिस्से आहेत, सगळेंच जातें तर काय करितां! त्यांतून मागें पुढें त्याचाही तपास लागेल. अशी फौजदार व इतर लोक ह्यांनीं त्याची समजूत केली. मारवाडीही तितक्यांत समजला, आणि त्यानें शांतवन झाल्यासारखें दाखविलें. नंतर बनावट चोरास कैदेंत ठेविलें आणि दुपारीं नदी पलीकडील पुरलेला माल आणण्याचें ठरविलें.

इकडे फौजदारानें एके पिंपास मोठें कुलूप घालून नदी पलीकडे पुरून ठेविलें आणि दुपारीं जेवण होतांच तो चोर कैदी, मारवाडी व आणखी कांहीं मंडळी बरोबर घेऊन तेथें गेले. नंतर चोरानें दाखविलेल्या जागीं खणून पाहिलें तों पिंप सांपडलें. त्याचें तें लंगर कुलूप पाहुन फौजदारानें विचारलें याची किल्ली कोठें आहे? चोरानें घरीं राहिली आहे असें सांगितलें. तेव्हां फौजदार ह्मणाले, बरें चला पलीकडे जाऊन उघडूं. असें बोलून फौजदार वगैरे मंडळी पहिल्या होडींत अलिकडल्या तीरास आली.

मारवाड्यास पिंप पाहिल्या बरोबर अतिशय आनं झाला होता. तो त्या द्रव्याच्या जड पिंपाजवळ बसल होता. होडी त्या मंडळीस पोंचवून आल्यावर सर्व सामा न, पिंप, मारवाडी व मजूरकर मिळून दुसरी होडी भ ली आणि आलीकडे येऊं लागले. तेव्हां संकेताप्रमा नावाड्यानें होडींत पाणी येऊं दिलें. त्यामुळें होडी बुड लागली. तेव्हां मजूरकर पटपटा उड्या मारून निघू गेले. मग नावाडी मारवाड्यास ह्मणाला, कांहीं सामान काढून टाकाल तर आपण जगतों नाहीं तर होडी बुडते. तेव्हां मारवाड्यानें पाहरया वगैरे बहुतेक सामान टाकून दिलें. तरीही होडी ऐकेना. शेवटीं पिंप टाकलें तर प्रा ण वांचतों. नाहींतर वेळ जवळ आली. तेव्हां "ना स्ति प्राणात् परं प्रियं" या न्यायाप्रमाणें अर्थातच पिंप टाकून देणें भाग पडलें. पुढें त्यानें व नावाड्यानें मिळून पिंप बाहेर टाकून दिलें, व आलीकडल्या तीरास आले.

नंतर फौजदार ह्मणाला, असो चला, जीव वांचला हेंच भाग्य! "शीर सलामत तर पगड्या पंचवीस!" तेव्हां लागलीच इतर मंडळी ह्मणूं लागली कीं, परमेश्व रानें हें एक मोठेंच विघ्न टाळलें. शाबास छाती मारवा ड्याची! हो जिवापेक्षां काय जास्ती आहे? जिवंत असला तर मिळेल. असें बोलून अंमळ त्याची स्तुति केली. ते व्हां त्यानेंही आनंद प्रदर्शित केला. व सर्व मंडळी आप आपल्या घरीं गेली. नंतर फौजदारानें त्या वैद्यास बोला वून आणून त्याची खूप तारीफ केली व त्यास पोषाक वगैरे दिला. आणि ही गोष्ट सरकारांत लिहून कळवून सरकारचा आश्रित करून ठेविला.

# गोष्ट १०.

थंडीच्या दिवसांत एक बगडा शेतकरी शेतांत काम करीत होता. व आसपास त्याची बायको व मुलें शेकोटी जवळ शेकत बसलीं होतीं. इतक्यांत त्याचा जोड्यासकट पाय एक्या सर्पावर पडला. पडतांच सापानें गच्च वळखा घातला. आणि पाय जास्ती आवळूं लागला. गडी भला दांडगा, ज्वान व सशक्त होता, परंतु त्याचें कांहीं चालेना. जोड्या खालीं सापाचें तोंड सांपडलें होतें, सबब ह्यास असा विचार पडलाकीं, पाय उचलावा तर सांप चावेल. न उचलावा तर ओढे सहन होतना. ह्मणून ना इलाजानें ओरडूं लागला.

त्याचें ओरडणें ऐकून तेथे कांहीं लोक धांवून आले व हा प्रकार पाहिला आणि शेपेस धरून वळखा काढूं लागले तों निघेना. ह्यांनीं वरचा वेढा काढलाच तर खालच्या वेढ्यास सांप नेटानें आवळूं लागे व यास ती वेदना सहन होईना. हा ह्मणे नुसत्या त्याच्या वेढ्यास मी जुमानीत नाहीं, पण तुम्ही सोडवूं लागलां ह्मणजे तो जोर करितो त्यामुळें त्या वेदना सोसत नाहींत. पायास फार रग लागते. इतक्यांत त्याच्या सासऱ्यास बातमी कळली कीं, जावयास सांप चावला. तेव्हां त्यानें आपल्या बरोबर लगबगीनें एक ठाकूर वैद्य आणला.

वैद्य येतांच लोक ह्मणूं लागले, हो हो! आतां ठीक झालें. वैद्यबोवा. यास आधीं पाय उचलावयास सांगा बचावला तर औषध द्या. त्यानें तें सर्व पाहिलें व ह्मणाला, मी दोन रुपये घेईन व यास बिलकूल इजा होऊं

देणार नाहीं. सर्वांनीं हें ठाकराचें ह्मणणें कबूल केलें.
नंतर त्या ठाकरानें प्रत्येकाच्या हातांत सोडगें देऊ त्यांस जवळ उभे केलें आणि आपण एके हातांत ए भक्कम सोटा व कोलती घेऊन त्याजवळ गेला व कोल सापास लावली. लावतांच सापानें तडफडतच वेढा क ढला. व लोकांनीं लागलाच त्यास मारला व शेतक ऱ्यास मोकळें केलें.

मोकळा होतांच त्यास घाम सुटला व भीतीनें अंमळ बेसावध पडला, परंतु सामान्य उपचारानें लौकरच तो शुद्धीवर आला. नंतर ठराव प्रमाणें ठाकरास दोन रुपे दिले व त्याची वाहवा केली.

---

## गोष्ट ११.

नागपूर येथें एक हिराचंद या नांवाचा सधन साव कार रहात असे. त्याचे मुलास शनवारीं अमावास्येच्या दिवशीं संध्याकाळीं एकाएकीं थंडी वाजून ताप आला तो पुढें कांहीं काळानें घाम येऊन निघाला. दुसरे दि वशीं पुन्हा आला व निघाला; असा नित्यक्रम सुमारें पं धरा दिवस चालला होता सामान्य औषधें वगैरें केलीं परंतु गूण नाहीं. तेव्हां घरांत बायकांनीं कल्पना काढ ली कीं, कांहीं बाहेर बाधेचें पहावें. यास अमावास्येला ताप आला आहे. न जाणो कांहीं झपेट असेल.

तेव्हां तेथें एक नवाच पंचाक्षरी आला होता व गा वांत त्याचें बरेंच प्रस्थ वाढलें होतें. त्यास बोलावून आ

णलें आणि रोग्यास दाखविलें. त्यानें पाहिल्याबरोबर सांगितलें कीं, ह्यास ताप आल्यास सुमारें पंधरा दिवस झाले असतील. तेव्हां एकजण बाई ह्मणाली, होय आजचाच पंधरावा दिवस. तेव्हां पुन्हा पंचाक्षरी ह्मणाला, यास अवसेला ताप आला असेल. हा अंगरोग नाहीं, ह्यास औषधें देऊन गूण येणार नाहीं. व ह्याचा अनुभव ही तुह्मांस असेल. बरें तें असो. एक नारळ, सवा रुपया, काळा दोरा, ऊद, कापूर, उडीद, लिंबू आणि थोडीशीं फुलें आणून ठेवा. मी स्नान करून येतों. आणि बीरांचा देव आंगांत आणून ह्याचा पक्का बंदोबस्त करतों. असें ह्मणून निघून गेला.

इकडे बायकांनीं सर्व तयारी करून ठेविली. इतक्यांत तो स्नान करून आला आणि शेंडी मोकळी सोडून कपाळीं शेंदराचा मळवट लावून घुमूं लागला. घुमतां घुमतां गुलाल, बुक्का, हळद, कुंकू वगैरे पदार्थ हातचलाखीनें काढून दाखविलें. तेव्हां बायकांस मोठें आश्चर्य वाटलें. पुढें पंचाक्षऱ्यानें विड्याचीं पानें पाण्यांतून काढून दिव्याच्या ज्योतीवर धरलीं व त्यांजवर ज्या काजळाच्या लहान मोठ्या तऱ्हेतऱ्हेच्या आकृति उठल्या होत्या त्या दाखवून ह्मणाला, हें झाड पहा, याजवर हा वीस आहे. यानें अमुक अमुक कारणाकरितां यास पछाडलें आहे. आतां मी आंगारा आणि तीर्थ देतों हें रोग्यास द्या. ह्मणजे सुमारें घटकेच्या आंत बहुतकरून तो पळून जाईल खैसास कांहीं एक दायतें द्यावयाचें नाहीं. कदाचित् जातेवेळेस कांहीं जास्ती गडबड करूं लागला व यास पछाडून गुम पाडलें तर मला कळ-

वा ह्मणजे त्यास जाळून टाकतों. असें ह्मणून आप
आंगठ्याचें तीर्थ काढून दिलें व आंगारा दिला आ
आपल्या घरीं गेला.

इकडे बायकांनीं तें तीर्थ रोग्यास पाजलें व आंग
कपाळीं लावला. सुमारें एक घटका झाली नाहीं तो
यास घेरी करावयास लागली, ग्लानि वाढली व ज
घालमेल घालूं लागला, चैन पडेनासें झालें. तेव्हां
यका ह्मणूं लागल्याकीं, पहा काय पंचाक्षऱ्याचा ठो
आहे तो! त्यानें सांगितल्याप्रमाणें घटका झाली ना
तोंच खैस जाण्याचीं लक्षणें होऊं लागलीं. असें
श्चर्य करीत आहेत तोंच लक्षणें वाढत चाललीं ते
त्यांतील एक बाई ह्मणाली. कोणी पंचाक्षऱ्यास
बोलावा. हा डोळे मिटून धरतो व मोठ्यानें हांक मा
वी तेव्हां किंचित् जागा होतो. हा गुंग पडत चाल
खैसानें पक्कें पछाडलें. अशी अवस्था झाली तेव्हां
जणी घाबरल्या, आणि पंचाक्षऱ्यास बोलावूं पाठविलें

त्यानें पुष्कळच खर्चाचें अवडंबर सांगितलें व ह्म
ला, तो खैस पक्का आहे. लहान सहान असता
अंगाऱ्या बरोबर पळून गेला असता; आतां तर
अशा अशा तजवीजीनें (पुष्कळ खर्चानें) घाल
पाहिजे.

नाइलाजामुळें त्याचें सर्व ह्मणणें कबूल करून
बोलावून आणलें. पुढें तो आल्यावर मोठमोठ्यानं
लूं लागला, पुष्कळ आवेश आणला, रोग्यास ऊठ
करवूं लागला, मंत्राच्या पाण्याचे आंगावर व तों
छिटकाव देऊं लागला, अशी एकच गर्दी उडाली

इतक्यांत त्याच्या घरीं त्याचा स्नेही एक वैद्य आला. तो हे सगळे गडबडींत आहेत असें पाहून विचारतो, काय धांदल चालली आहे? तेव्हां त्यांतील एके मनुष्यानें सांगितलें; पूर्वीपासून हें असें असें झालें; व हल्लीं पंचाक्षऱ्याच्या सांगण्याप्रमाणें रोग्यास खैसाने पछाडलें आहे. त्यामुळें तो बेसावध पडला आहे. हल्लीं तो पंचाक्षरी आला आहे व शेटजीनें त्यास पांचशें रुपये देण्याचें कबूल केलें आहे. आजच्या आज पंचाक्षरी आंगांतील पिशाच्यपीडा समूळ काढणार आहे.

हें ऐकून वैद्य ह्मणाला बरें आह्मीही चमत्कार पाहूं. आह्मास तेथें घेऊन चला. असें ह्मणतांच तो चाकर त्या वैद्यास रोग्याजवळ घेऊन गेला.

तेथें गेल्यावर त्यानें प्रथमतः प्रकृति पाहिली तों डोळे मिटलेले, रोगी गाढ झोंप लागल्याप्रमाणें स्तब्ध, श्वासोश्वास मंद, डोळे उघडले व मिटले असतां बाहुल्याचें आकुंचन व प्रसरण होत नाहीं, आंग किंचित् उष्ण व ओलसर इत्यादि लक्षणें पाहून त्यास संशय आला कीं, कांहीं तरी मादक औषधाचा हा प्रकार असावा. त्या नंतर पंचाक्षऱ्याची चिकित्साही या अनुमानास अनुकूल अशीच पाहिली. तेव्हां हा अगदीं भाविक मनुष्यासारखें सोंग आणून ह्मणाला पंचाक्षरी फार चांगला आहे, यानें पहिल्या खेपेस कसें काय केलें? तेव्हां तेथील मंडळीनें इत्थंभूत हकीकत तीर्थ दिल्यासुद्धां कळविली. इतक्यांत वैद्यानें पाहिलें तों रोग्याच्या डोळ्यांतील बाहुल्या फारच अकुंचित दिसल्या. नंतर मुद्दाम तीर्थाची वाटी पाहिली तों तीस अफूचा वास आला. मग काय? याची पूर्ण खात्रीच झाली.

अशा रीतीनें त्या पंचाक्षऱ्याचें कपट उमगल्याव
वैद्य एकदम त्याचे जवळ गेला, आणि शेंडी धरून ह
णाला, बेवकुफा, तुझें ढोंग उघडकीस आणलें खरें बो
आतां. तूं या रोग्यास अफू खावयास दिलीस कीं नाहीं
खरें सांग नाहींतर तुझी दशादशा करून टाकतों.
धमकीचे भयंकर शब्द ऐकतांच त्याचा नूर खरकन् उ
तरला आणि ह्मणाला. मायबाप तुह्मी आहां. हें पोट
करितां ढोंग केले आहे. मी अपराधी आहे क्षमा मागतो
पाया पडतों, मला अभय द्या. मी कबूल होतों; अ
दिली खरी.

कोठें रोग्याकडे जाणें झाल्यास मी पूर्वींच पायाच
अंगठ्यास अफू लावून जातों. व तीर्थ देते वेळेस
आंगठा धुऊन देतों. प्रवाही पदार्थांत अफूचा अंम
लौकर बसतो हें आपण जाणतच आहां. अशा रीती
त्यास गुंगी आली ह्मणजे घरच्या मनुष्यांस वाटतें कीं
पंचाक्षऱ्याच्या आंगाऱ्यामुळें व तीर्थामुळें पिशाच्य चवट
ळून त्यानें रोग्यास पछाडलें आहे.

या शिवाय माझें त्यास पूर्वींच सांगणें असतें कीं,
शाच एक घटकेच्या आंत निघून जाईल किंवा जा
पछाडील या बोलण्यावरून त्यास अगदीं ठोका आला
वाटतो, आणि आमच्यावर पूर्ण भक्ति बसते. पुढें ज
संधि सांपडेल तसें द्रव्य उपटतों. अस्तु, असे पुष्क
प्रकार आहेत सर्व आपल्या पायांपाशीं कबूल झालों.
या करा, महाराज! मी गरीब आपला गुलाम आहें.

हें त्याचें भाषण ऐकून त्यास एकीकडे बसवून ठे

व रोग्यास चुना व नवसागर हातावर चोळून हुंगावयास[१] दिला. राईची पूड पाण्यांत घालून पाजली तसेंच घशांत पिसें घालून घालून पुष्कळ वमन करविलें. थंड पाण्याचे छांटे आंगावर मारलें, त्याचे जवळ मोठ्यांनीं वाजवणें व बोलणें सुरू केलें, बळेंच धरून त्यास खुप हालविला व चालविला. मदप्रतिकारि विषघ्न औषधें दिलीं. इत्यादि शास्त्रोक्त चिकित्सा चालल्यावर तो रोगी पूर्ण शुद्धीवर आला.

इकडे त्या ढोंगी पंचाक्षऱ्यापासून अशा प्रकारचीं आणखी कांहीं ढोंगें व्यक्त करून घेऊन त्यास सरकारांत पाठवून दिलें. पुढें रोगी बरा झाला हें पाहून घरच्या सर्व मंडळीस आनंद झाला नंतर पंचाक्षऱ्यास कबूल केलेले पांचशें रुपये व शिवाय इनाम वैद्यास देऊन हिराचंदानें त्याचे फार आभार मानिले व गांवांतही त्याची फार वाहावा झाली.

हें कृत्य झाल्यापासून त्या गावांत अशा दुष्ट व ढोंगी पंचाक्षऱ्यावर विश्वास न ठेवण्याविषयीं पुष्कळांची खात्री झाली.

---

## गोष्ट १२.

एके राजानें कांहीं विकारावर पुष्कळ उपचार केले, परंतु गूण येईना. थकला! इतक्यांत त्यांनीं दिल्लीच्या

---

१ हल्लीं डाक्टर लोक हुंगावयास जी कुपी देत असतात तें औषध या दोन पदार्थांच्याच मिश्रणापासून केलेलें असतें त्यास "आमोनिआ" म्हणतात.

बादशहाच्या पदरीं नामांकित हिंदु वैद्य मोठा धूर्त व च
तुर आहे, तो आल्यास हटकून हा विकार बरा होईल
असें पुष्कळ लोक बोलतात, असें ऐकलें. परंतु सम
आपल्या जवळ न सांगण्याचें कारण असें कीं, बादशह
त्यास क्षणमात्र ही आपल्यापासून दूर करीत नाहीं. पु
त्यानें सभा करून सर्वांस विचारलें कीं, जो हरतऱ्हे
हरयुक्तीनें बादशहापासून एक वर्षाच्या मुदतीनें त्या
वैद्यास बुध्यां येथें आणील त्यास वंशपरंपरेनें अमुक गां
इनाम मिळेल. हें ऐकून एक्या मौलव्यानें त्यास आण
ण्याचें कबूल केलें.

त्या नंतर एके दिवशीं दिल्ली येथें बादशहाच्या द
बारांत तो हापसजी ( मौलवी ) आला. हा मौलवी फा
विद्वान असून धर्माभिमानी व धूर्त होता. याच्या आंगीं
कविता करण्याचा गूण अत्युत्तम होता. पाहिजे त्या वि
षयावर हा फारच लौकर सुरस कविता करी. यानें केले
ली कविता बादशहानें इतर विद्वानांस दाखविली. ते
पाहून त्यांनीं संकेताप्रमाणें[१] फारच वाखाणणी केली
आणि असें बोलून दाखविलें कीं, हें मोठें विलक्षण साम
आहे! परमेश्वरानें द्यावा तर असला एखादा गूण द्याव
नाहींतर काय?

अशी त्याची स्तुति ऐकून बादशहा फारच खुष झा
ला, आणि ह्मणाला, काय इच्छा आपण मनांत धर
आला ती सांगा. मी सिद्ध करण्यास तयार आहे. ते
मौलव्यानें सांगितलें आपण आपल्या इच्छेप्रमाणें द्या

१ मौलव्यानें दरबारच्या लोकांची पूर्वीं भेट घेऊन असी स्तुति क
ण्याचा संकेत ठरविला होता.

माझी इच्छा कसली पूर्ण होते? तेव्हां बादशहानें विचारलें, मी मनावर घेतलें तर होईल कीं नाहीं? मौलवी ह्मणाला, सहज होईल. परंतु तसें करण्यास आपणास अंमळ विचार पडेल. बाकी तें कृत्य कांहीं लोक दूषण देतील असें नाहीं.

हें ऐकून बादशहा ह्मणाला, अं:! बोला मी करतों. तेव्हां मौलवी ह्मणाला जर आपण खुष झाला आहां तर आपला वैद्य एक वर्षभर आम्हांस द्या.

असें चमत्कारिक मागणें मागितलें तेव्हां नाइलाज झाला. भरकचेरींत वचनास गुंतल्यामुळें देणें भाग पडलें. पुढें हा मौलवी त्या वैद्यास बरोबर घेऊन आपल्या गांवीं जात असतां वाटेंत प्रकृति थोडीशी बिघडल्याप्रमाणें झाली. त्या वेळेस ह्याच्या मनांत आलें कीं, इतक्या प्रयत्नानें आपण हा वैद्य मिळविला आहे. याजमध्यें करामत तरी काय आहे हें पाहिलें पाहिजे.

असा विचार मनांत आणून वैद्यास बोलावून आणलें आणि ह्मणाला, माझी तब्येत बिघडली आहे. थोडथोडी थंडी वाजत आहे, मस्तक जड झालें आहे, व डोळे रसरसत आहेत. यामुळें एका घटकेच्या आंत ताप भरेल असें वाटतें आहे. तर आपल्यापाशीं विनंति इतकीच कीं, आतांच्या आतां तब्येत दुरुस्त झाली पाहिजे. हे ऐकून वैद्य ह्मणाला ठीक आहे; तसें करितों.

इतक्यांत मौलवी ह्मणाला, पण वैद्य बोवा मी तुमचें औषध घेणार नाहीं, तुह्मी सांगाल त्याप्रमाणें वागणारही नाहीं. आणि ताप तर येतां कामास नये.

हें ऐकतांच वैद्य (एकदम रागावल्या सारखा आव

आणून) ह्मणाला. आह्मी बादशहाच्या पदरचे लोक. त्याची देखील इतकी मिजास संभाळीत नाहीं आणि हा जंगली ह्मणतो मी औषध घेणार नाहीं. यास तर डुकराच्या मुतांतलें औषध दिलें पाहिजे. तेव्हां मौलवी अतिशय संतापला आणि ह्मणाला बादशहाच्या पदरचे ह्मणवितां व कोणत्या जातीस कोणतें औषध द्यावें, हें कळत नाहीं? दुसरा कोणी डुकराचें नांव काढता तर ठार मारला असता, पण तुह्मास बादशहाकडे परत पाठविलें पाहिजे ह्मणून सोडलें. आह्मी डुकराला शिवत तरी असतों काय? कीं त्याच्या मुतांतलें औषध घेऊं! हें ऐकून वैद्य ह्मणतो, बेमर्याद भाषण बोलूं नका. ठाऊक आहे तुमचा धर्म. तुमच्या प्रकृतीला त्याचें मांस चांगलें. मी तुमच्या बबरजीस सांगून ठेविलें आहे व तो उद्यापासून तुह्मांस तेंच शिजवून खाऊं घालणार आहे. हें ऐकतांच मौलव्याचें आंगाचा तिळपापड झाला. आणि ह्मणाला, माझा बबरजी या गोष्टीस अनुकूळ झाला? त्यास बांधून आणा. व एक सारखा शिव्यांचा वर्षाव चालूं केला. (या वेळेस बबरजी बाहेर गेला होता.) वैद्यानें बेताचा संताप झाला असें पाहून मध्येंच ह्मटलें, आतां आपली तब्येत कशी आहे? थंडी राहिली कीं नाहीं? तेव्हां मौलवी वैद्यास ह्मणाला, बेवकुफा बोलूं नको. येथून निघून जा. तें ऐकून वैद्य ह्मणतो, औषध न घेतां प्रकृति नीट करावी ह्मणून तुह्मी मला बोलाविलें व मीही आपणांस औषध न देतां तबियत दुरुस्त केली. आतां हें जें कृत्य केलें तें मी मुद्दाम केलें. आपल्या शरिरांत किंचित् संताप वाढला असतां

आपली व्यथा शमेल असें जाणून चार खोटीं नाटीं भाषणें सांगून आपणांस राग आणला, याची माफी असावी. आतां आपणांस ताप येणार नाहीं, व मस्तकही हलकें झालें असेल. मला पक्कें माहीत आहे कीं, ती वस्तु आपल्या धर्मांत फार निंद्य आहे. मी ती आपणास कशी खाऊं घालीन? फक्त राग येण्याकरितां ही बतावणी केली.

हें ऐकून मौलवी शांत झाला, व त्याची पक्की खात्री झाली कीं, आपण ऐकत होतों त्याप्रमाणें यांत करामत आहे खरी. नंतर त्यांनीं ह्या वैद्याची स्तुति केली; व सांगितलें, महाराज मी आपराधी आहें. आपली करामत पाहण्याकरितां मी औषध घेत नाहीं. असें बोललों पण माझी बालंबाल खात्री झाली कीं, आपली जी दुनियाभर कीर्ति पसरली आहे ती आपल्या विद्येमुळें आहे. उगीच राजाश्रित वैद्य ह्मणून नाहीं. अस्तु.

पुढें ते इकडे जाऊन या राजाचा रोग बरा केला, व वर्ष पुरें होतांच बादशहाकडे परत आले.

---

## गोष्ट १३.

एक साधारण खाऊन पिऊन सुखी व वयोवृद्ध गृहस्थ कांहीं रोजगार संबंधानें गोमांतक प्रांतांत गेला. बरोबर त्याची बायको व एक अठरा वीस वर्षांचा मुलगा मात्र होता. तेथील हवा पाणी सर्वांस मानवलें व मुलासही एक चांगला रोजगार लागला. यामुळें ते सर्व तिकडेसच

राहिले. पुढें चार सहा महिने मुलाची प्रकृति नीट होती, रोजगार धंदा चांगला चालला होता. विद्वान् व कुलीन अशी स्नेही मंडळी जमली होती, त्यांच्या संगतीनें हा अक्षयीं आनंदांत असे. असें असतां एके दिवशीं (रामनवमीस) आपल्या स्नेह्या बरोबर रामाच्या देवळांत गेला. तेथें एके श्रीमंत गृहस्थाची पंधरा सोळा वर्षांची मुलगी अतिशय सुरूप अशी याच्या दृष्टीस पडली व तिला पाहून हा अगदीं मोहित होऊन गेला.

आजदिन पावेतों हा आपल्या स्नेह्यांजवळ मोठे संभावितपणानें वागत असे, व कधीं थट्टा मस्करी ही करीत नसे, परंतु आज त्याच्यानें राहवेना. यानें स्नेह्यांपाशीं, ती कोण? राहते कोठें? साध्य होईल कीं नाहीं? वगैरे चौकशी केली. तेव्हां त्यांनीं सांगितलें की, तिच्याशीं भाषण होणेंही दुर्घट! मग दुसरी तिसरी गोष्ट कशास पाहिजे? ती जहागीरदाराची मुलगी. सासर व माहेर दोन्हीही लक्षाधीश आणि कुलीन; त्यांतही नवरा रूपवान् विद्वान्, तेथली आशा काय उपयोगी? तेथें आपला प्रवेश होणें नाहीं.

हें ऐकून याचें मन अगदीं खट्टू होऊन गेलें, व कांहीं सुचेनासें झालें. तो ह्मणाला, माझें मन इतकें अनावर कधीं झालें नाहीं. माझी वर्तणूक तुह्मी पाहतांच आहां! परंतु काय करूं? आज मन आवरत नाहीं. वारंवार ती मूर्ति डोळ्यापुढें येते. तेव्हां स्नेही ह्मणाले, व्यर्थ तो नाद आहे! अगदीं सोडून दे. पटकन् वेड लागावयाचें. असें बोलून सर्व आपआपल्या घरीं गेले.

इकडे हाही आपल्या बिऱ्हाडीं आला. परंतु सर्व ल

क्ष तिजकडे लागलेलें. जेवण सुचलें नाहीं व रात्रीं झोंप आली नाहीं. वारंवार ती गोष्ट मनांत येई. दुसऱ्या दिवशीं हातांत एक पुस्तक घेऊन तिच्या घराकडे गेला व समोरच एके ओव्यावर तें पुस्तक पहात बसला. मनांत हेतु हाकीं, एकादे वेळेस तरी खिडकींतून दृष्टीस पडेल. परंतु तसें घडलें नाहीं. दोनप्रहर भरले. शेवटीं निराश होऊन घरीं येऊन जेवला. तों जेवणाची स्थिति पूर्ववत्! आई बापांनीं विचारलें, बब्या आज कां रे जेवण नीट झालें नाहीं? तेव्हां ह्यांनीं स्नेह्याकडे फराळ झाला होता, वगैरे बतावणी केली; व पुन्हा भोजनोत्तर सकाळच्या ठिकाणीं येऊन बसला. आणि नौकरीवर न जातां यजमानास रजा पाहिजे आहे, अशा मजकुराचें पत्र पाठविलें.

पुढें सुमारें तिसऱ्या प्रहरच्या वेळेस ती कांहीं वेळ खिडकींत उभी राहिली. ही नजरेस पडतांच हे एकसारखें चोरून तिजकडे पाहात होते. इतक्यांत ती पटकन् आंत गेली. दिवे लागत तोंपर्यंत वाट पाहिली, परंतु ती पुन्हा खिडकींत आलीच नाहीं.

इकडे हे घरीं आले, पण लक्ष तिकडे! संध्या, जेवण वगैरें कांहींच सुचेना. घरांत सांगितलें कीं, तळ्यावर संध्येस गेलों होतों तेथें मंडळीनें पेढे बरफी आणली होती ती खाल्ली ह्मणून मला अगदीं भूक नाहीं. अशी संपादणी करून खोलींत जाऊन निजला. झोंप नाहीं, चित्त भ्रमिष्टासारखें झालेलें, असा पडला आहे; तों स्वाभाविक स्नेही मंडळी, आज ही स्वारी भेटली नाहीं ह्मणून आली व पाहतात तों याचें आंग तप्त झालेलें व चित्तवृत्ति अग-

दीं बदललेली; असें दृष्टीस पडलें. तेव्हां त्यांतील एक-जण थट्टेनें ह्मणाला, आमच्या शेजारीं एक सुंदर स्त्री आहे व तिची माझी आलिकडे महिनाभर ओळख पडली आहे. तुह्मी मज बरोबर चला, मी तें जमवून देतों. शेंकडो रुपये खर्च केले तरी साध्य होणारी नाहीं, अशी आहे.

हें ऐकून हा ह्मणतो, "छे छे !! ती माझी बहीणच समजा! तुह्मी मला कालच्या गोष्टी वरून दुर्व्यसनी सम-जतां काय? मी अझून सांगतों कीं, मला कोणी शंभर रुपये देऊं केले तरी मी असल्या छंदांत पडणार नाहीं. मी इतका मूर्ख नाहीं. मला समजतें कीं, हें दुष्कर्म आहे. पण काय करूं? काल माझें मन कसें बहकलें तें माझें मला कळत नाहीं. मला जेवण सुचत नाहीं, नि-द्रा येत नाहीं. केव्हां एकदां ती आलिंगन देईल असें झालें आहे. बाकीच्या स्त्रिया मला आईबहिणीसमान आहेत.

हें स्पष्ट भाषण ऐकून तो अगदीं चिप्प बसला. नंतर इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलून स्नेही मंडळी बाहेर आली; व सर्व हकीकत त्याच्या बापास कळविली. तेव्हां बाप मोठ्या विचारांत पडला कीं, यास उपाय काय करावा. जा उपायानें हा विकार शमणारा आहे तो तर फार दुर्घट आहे.

त्या दिवशीं सारी रात्र मुलास झोंप आली नाहीं व तप्तता फारच वाढली. दुसरे दिवशीं बापानें एक्या वैद्या स बोलावून आणलें व सर्व हकीकत सांगून मुलाची प्रकृति दाखविली. वैद्यानें प्रकृति पाहून कांहीं औ

ठाणे.

तुटत चाललें, अहोरात्र झोंप नाहीं, सर्वांग तप्त, मल-शुद्धि साफ नाहीं, आंगास कंडू व खरूज, कोठेंही क्षणमात्र चित्तरंजन होईना, येणेंकरून प्रकृति फार क्षीण झाली व चित्त अगदीं उदास होऊन गेलें. फक्त तिसऱ्या प्रहरीं त्या ओऱ्यावर ती स्त्री दृष्टीस पडेल या आशेनें जाऊन बसावें, व ज्या दिवशीं नजरेस पडे त्या दिवशीं काय क्षणमात्र आनंद होई तितकाच.

असें चाललें असतां, आईबापांनीं पुष्कळ औषधें दिलीं, बोध केला, स्नेह्यांकडून दुसऱ्या सुंदर स्त्रिया दाखविल्या. असे पुष्कळ प्रयत्न केले परंतु व्यर्थ! याच्या मनांतलें जाईना. हा ह्मणे, हें वाईट कर्म आहे. कदाचित् यापासून प्राणहानिही होईल. हें मी समजतों व इतक्याकरितांच मी या दुर्व्यसनाच्या सपाट्यांत सांपडलों नाहीं. व अझूनही मला त्या व्यसनांत पडण्याची किंवा अन्य स्त्रीची इच्छा नाहीं. काय असेल तें असो. हें मात्र माझ्या मनांतून बिलकूल जात नाहीं. मी अगदीं वेडा होऊन गेलों आहे. मन आवरण्याचा पुष्कळ यत्न करितों. पण व्यर्थ! माझा कांहीं इलाज चालत नाहीं. मी पक्कें समजतोंकीं, याचा परिणाम भयंकर होईल. पण काय करूं? नशीव!!

अशा प्रकारचीं मुलाचीं भाषणें ऐकून आईबापांस फार वाईट वाटे. पण करतात काय? नाइलाज. याच्या आईनें त्या स्त्रीकडे जाण्या येण्याचें वळण पाडून बारकाईनें चौकशी केली. परंतु ती स्त्री महा पतिव्रता आहे असें समजलें. मग तर हिचा अगदींच धीर खचला व दोघांसही मुलगा कसा वग होईल याविषयीं मोठा ह-

द्रोग लागला. शेवटीं असा विचार ठरलाकीं, यात्रेकरि-
तां मुलास घेऊन पराठिकाणीं जावें. ह्मणजे तितकें अं-
मळ दूर झाल्यामुळें तिजकडे दुर्लक्ष्य होऊन कदाचित्
विसर पडेल.

हा विचार मुलास कळतांच तो ह्मणाला, मी येथें
आहें तों सर्वकाळ तिकडे लक्ष्य लागलेलें असतें, व ए-
खादे वेळेस दृष्टीस पडली ह्मणजे समाधान होतें, मुळींच
वियोग केला तर काय परिणाम होईल, कोण जाणें.
पहा बोवा तुह्मी; मी तर वेडा बनलों आहें. त्यांत हल्लीं
अशक्तता किती झाली आहे. जेथें मी सहज जावें त्या
ओस्यावर जाण्यास मला आतां टेक पडते. अन्न चालत
नाहीं, झोंप नाहीं, चित्त उदास! त्या एका गोष्टी वांचून
मनास दुसरें कांहींच सुचत नाहीं, आणि त्याचाही वि-
योग झाला तर चित्तरंजन होण्या सारखें दुनयेंत कां-
हींच उरलें नाहीं. इतकें समजुतीनें व पडद्यानें सांगि-
तलें. आतां स्पष्ट सांगतों कीं, मला तुह्मी येथून पराठि-
काणीं नेलेंतच तर मी येथें पळून येईन अगर आत्महत्या
करीन.

हीं मुलाच्या तोंडचीं भाषणें ऐकून आईबापांची चि-
त्तवृति अगदीं गुंग झाली. मुलास कोणत्या रीतीनें ता-
ळ्यावर आणावा, याविषयीं कांहींच कल्पना मनांत ये-
ईना; शेवटीं निराश झाले. आधींच वृद्धपण; त्यांत या
निरंतर चिंताग्नीनें शरीरें दग्ध होत चाललीं; दृष्टि
मांद्य होत चालली. अशा स्थितींत ते असतां, एके दिव-
शीं तिसऱ्या प्रहरीं मुलाची मावशी (ही मोठ्या राजाश्रित
वैद्याची बायको होती.) शोध करीत करीत यांचे घरीं आ-

ली. या दोघी बहिणींची भेट सुमारें पंचवीस तीस वर्षांत झाली नव्हती, सबब लौकर एकमेकींस ओळख पडली नाहीं. पुढें ओळख पटल्यावर फार दिवसांनीं भेटी झाल्या ह्मणून परस्परांस मोठा आनंद झाला. मग काय ? तें बहिणी बहिणींचें प्रेम! कुशल प्रश्न विचारल्यावर मावशीनें सहज मुलगा कोठें आहे ? खुशाल आहेना ? (ह्या वेळेस मुलगा संकेत स्थलीं गेला होता) असें विचारतांच त्याची आई एकदम रडायला लागली. आणि ह्मणाली, चांगला, शहाणा, लिहिणारा व गरीब असा निघाला होता हो ! पण आमच्या नशीबीं सुख भोगायचें कोठें आहे ? त्यास वेड लागून सुमारें दोन महिने झाले. अन्न जात नाहीं, शक्ति, झोंप मुळींच नाहीं नुसतीं हाडें व चर्म मात्र शिलक राहिलें आहे. पण मनांतलें वेड कांहीं जात नाहीं. आतां तो तिकडेच त्या मोहिनीकडे गेला असेल. असें बोलून रडूं लागली.

हें पाहून मावशी ह्मणाली, ताई तूं रडूं नको. मला सांग तर खरें; वेड कशाचें ? मोहिनी कोण ? बाहेर ख्यालीका निघाला आहे ? तेव्हां आई ह्मणाली, हरा शिवा केशवा !! अझून व्यसन कसें तें ठाऊक देखील नाहीं. हें (कानांत) असें असें आहे. तूं तरी कांहीं बोध कर. व तुझ्या घरचे वैद्य होते, कांहीं औषध ठाऊक असलें तर कर. अगदीं हो वाळत चालला आहे. पहा मुलगा जर नीट चांगला ताळ्यावर आला तर तूं बहीण नाहींस कोणी देवी मला भेटलीस असें मी समजेन.

तेव्हां मावशी ह्मणते, ताई, तूं मला परकी कां सम-

जतेस ? तुझा मुलगा तो माझा मुलगा. तूं अगदीं काळजी करूं नको. मी त्यास साफ बरा करीन तेव्हां जाईन बरें ! आमच्या सरकारच्या दिवाणाच्या मुलास एकदां असेंच झालें होतें. तेव्हां आमच्या घरच्यांनीं काय काय उपचार केले ते मला माहीत आहेत. मी उपचार चालू करतें. आतां पंधरा दिवसांत मुलाची प्रकृति वेतावर येऊं लागेल. पण मी आल्याची खबर त्यास कळवूं नको. मी ओल्या नजीकच्या देवळांत उतरतें. मग मी सुचवीन तसें तसें कर. मुलाविषयीं तिळमात्र काळजी करूं नको व वारंवार दुःखी होऊन रडूं नको.

असें बोलणें झाल्यावर ती देवळांत उतरावयास गेली व ही आपल्या काम धंद्यास लागली.

या बाईनें देवळांत उतरून असा क्रम चालविला कीं, मोठ्या पाहटेस उठून सुंदर भूपाळ्या ह्मणाव्या, उजेडावयाचे अगोदर स्नान करावें व एक प्रहर दिवस आला नाहीं तोंच श्री बाळकृष्णाची पूजा आटपून औषधाची पेटी पुढें घेऊन चार घटका कांहीं स्तुतीपर कवनें ओव्या वगैरे म्हणत बसावें. असा क्रम चालू असतां ती मुलगी शेजारच्या शेजारीं व आपलेंच देऊळ म्हणून दर्शनास येऊं लागली, व ती कृष्णाचीं मंजूळ मंजूळ गाणीं ऐकूं लागली. याप्रमाणें सतत दोन तीन दिवस झाले. ही खबर याच्या आईनें मुलास सांगितली. ती ह्मणाली या वेळेस आतांशीं रोज देवळांत जाणें होत असतें त्या वेळेस येत जा म्हणजे निवांत दर्शन होईल. नंतर हा वेडा मुलगा जसा कोणी पाळतीवर बसतो तसा बसून ती देवळांत गेली म्हणजे आंत जाई व एक्या कोपऱ्यांत

ढून बसे. आणि हळूच चोरून चोरून हिजकडे पहात असे. त्यामुळें यास रोज रोज त्या मोहिनीचें दर्शन होऊं लागलें. अस्तु. पांच च्यार दिवसांतच या बाईनें त्या मुलीची मर्जी संपादन करून घेतली. ती रोज ह्या बाईस फराळाचें आणून देई, व फराळ झाल्यावर एखादे दिवशीं आपल्या घरीं गाणीं म्हणावयास तिसऱ्या प्रहरीं नेई. परंतु ही फार करून घरीं जाणें करीत नसे. विशेष आग्रह झाल्यास भलत्याच वेळीं देवळांत गाणीं म्हणे. शिवाय ती सांगत असे मी वैद्य क्रिया जाणतें. माझ्या घरचे वैद्य होते. मजजवळ उत्तम उत्तम रसायणें आहेत. हा प्रकार कळतांच लहान मोठ्या बायका कोणी कांहीं, कोणी कांहीं, विचारण्याकरितां व औषधें घेण्याकरितां येऊं लागल्या. ही मौज व नित्यदर्शन या योगानें या राजेश्रीचें चित्तरंजन होऊन कंटाळवाणा वेळ बराच गमतींत जाऊं लागला.

असें चाललें असतां एके दिवशीं मावशी या वेडावलेल्या गृहस्थास म्हणाली, तुम्हास कांहीं रोग नसतां तुम्ही इतके कृश कशानें झाला? कांहीं मानसिक विकारानें तुमची अशी दशा झाली असावी असें मला वाटतें; (या गृहस्थाच्या मनांत तिजपाशीं आपलें दुःख सांगून कांहीं उपाय झाल्यास करून पहावें असें होतेंच.) तो हिचे हे शब्द ऐकतांच पोटांतून उकाळे आणून रडूं लागला आणि म्हणाला, बाई तुम्ही बरोबर परिक्षा केली. मला शारीर व्याधि कांहीं एक नाहीं. फक्त मानसिक दुःख आहे. पण काय? व्यर्थ! ते दूर होण्याचा मला कांहीं उपाय सुचत नाहीं. मी याच दुःखानें मरणार.

असें म्हणून जास्त रडूं आगला. तेव्हां ही बाई ह्मणते, अरे उगा रहा, रडूं नको. अपायास उपाय आहेच; तुझें काय दु:ख आहे, सांग पाहूं? माझ्या मुला सारखा तूं. मला कांहीं उपाय सुचल्यास सांगेन व करीन. तुजकडे पाहून मला फार दया येते.

याच्या मनांत होतेंच कीं, हिचें व तिचें मित्रत्व आहे व त्यांत प्रस्तुत मजविषयींची तिच्या मनांत दया उपजली आहे. कदाचित् ही तिचें मन वळवील. आतां असेंच युक्तीनें बोलले पाहिजे. असा विचार करून हळूंच ह्मणाला, काय सांगू बाई? मला बोलायलाही लाज व भय वाटतें. परंतु मान तुमच्या हातीं देतों व अभय द्याल तर बोलतों. तुमच्या वांचून हें दु:ख दूर करील असें कोणीच मला दिसत नाहीं. मी तुमच्या मुलाप्रमाणें आहें. असें ह्मणून रडत रडत जमीनीवर डोकें टेकलें, तेव्हां हिनें ही आपला कंठ सद्गदित करून ह्मटलें. मुला ऊठ आणि निष्कपट सांग. माझ्याच्यानें होईल तितकें करीन. असें तिचें अभिवचन मिळाल्यावर त्यानें आपली सर्व हकीकत सांगितली, आणि ह्मणाला, असें असें दु:ख मला आहे व याजमुळें मी सर्व सुखास मुकलों आहें. घरीं आईबापें वृद्ध आहेत तीं माझ्या दु:खानें अगदीं मरणोन्मुख होत चाललीं आहेत. पहा आतां मान तुमच्या हातीं दिली आहे. काय कराल तें करा.

हें ऐकून ती बाई ह्मणाली, काम कठीण तर खरेंच, परंतु प्रयत्न करून पाहतें. मी पुष्कळ रोग्यांना आजपर्यंत औषधें दिलीं; परंतु ह्या रोगाचा रोगी पहिल्यानें तूंच मजकडे आलास. तुझा रोग असा आहे कीं,

श्लोक.

नगम्योमंत्राणांनचभवतिभैषज्यविषयो,
नचापिप्रध्वंसंव्रजतिविविधैःशांतिकशतैः ॥
भ्रमावेशादंगेकिमपिविदधद्भव्यमसमं,
स्मरोपस्मारोयंभ्रमयतिदृशंघूर्णयतिच. ॥ १ ॥

(भर्तृहरीकृत.)

अर्थ, हा कामरूपी अपस्मार रोग आहे. हा ह्मणजे अपस्मार निवारण करणारे मंत्र व औषधें ईहीं करून दूर होणारा नाहीं. हा अनेक प्रकारच्या शांतीनें शमत नाहीं. व मोहाच्या आवेशानें शरीरांत कांहीं अनिर्वाच्य दुःख करून दृष्टीला भ्रम करून मूर्च्छित करितो. असा हा भयंकर व्याधि आहे. यास उपाय.

आर्या-कामापस्मार गदा, औषध तें एक होय हित करसें॥
इच्छितसें तन्मन जें, त्याविण दुसरा प्रयत्न व्यर्थ दिसे॥ १॥

तात्पर्य, ह्या परस्परांस इच्छिताचीच प्राप्ती झाली पाहिजे. त्यावांचून अन्य उपाय व्यर्थ! हे मी पूर्णपणें समजतें, सत्वर उद्योग करून पाहतें. तिलाही माझा वराच लळा लागला आहे. तूं कांहीं काळजी करूं नको. असें बोलून बाळकृष्णास व देवीस नमस्कार करून प्रश्न पाहिल्या सारखें केलें आणि ह्मणाली, परमेश्वर मला यश देईल. मी आजपासून या उद्योगास लागतें. तूं आतां घरीं जा आणि रोज चांगला पोषाक करून येथें येत जा. व मजजवळ कांहींतरी कामाच्या बहाण्यानें बसत जा. पुढें मला जें करणें तें मी करीन.

इकडे हा घरीं गेला आणि आनंदानें जेवून खाऊन सर्व हकीकत आईस कळविली. आणि ह्मणाला, वा-

यक्षोची जात असून कितीहो विद्वान्! कितीहो धूर्त! तिनें लागलेंच रोगाचें निदान ठरवून प्रमाणार्थ एक दोन श्लोकही ह्मणून दाखविले. आतां जातों मी, मला तिनें लौकर बोलाविलें आहे. असें बोलून चांगला पोषाक करून तिकडे लगबगीनें निघून गेला.

याची ही लटपट व थोडीशी आनंदित मुद्रा पाहून आईस वाटलें कीं, ताईच्या औषधानें कदाचित् फायदा होईल.

इकडे हा आल्यावर त्या मावशीनें अशी बतावणी केली कीं, ती आतांच इकडून गेली; येवढा वेळ बसली होती. हळूंच युक्तीनें गोष्ट काढून पुष्कळ प्रकारानें तिला सांगितलें, पण ती ऐकेना. शेवटीं अंमळ रागावून ह्मणालें. कोणाच्या जिवासच धोका होत असेल तर एकदां हें काम खुशाल करावें याला शास्त्राचीही आज्ञा आहे. आणि हा तुझा हेकट स्वभाव कोठला? तेव्हां ती ह्मणाली, इतका मजकरितां कोणाचा जीव जातो आहे? तेव्हां मी तुमचें नांव सांगितलें व खुणेनें दर्शवूं लागलें. परंतु ती ह्मणाली कोण तो माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. नंतर मी आज दाखविण्याचें तिजपाशीं कबूल केलें आहे व तीही इतक्यांत येतें असें कबूल करून गेली आहे. लौकरच येईल; बस अंमळसा. पाहू बरें पुढें काय होतें तें. असें बोलत आहेत इतक्यांत ती सहज रोजच्या प्रमाणें आली. तसा हा पटकन् दूर झाला व ही रोजच्या क्रमान्वयें गाणीं ह्मणूं लागली. नंतर कांहीं वेळानें ती निघून गेल्यावर हा विचारूं लागला कीं, कांहीं बोलणें झालें काय? तेव्हां हिनें सांगि-

तलें मला आज रात्रीं तिनें घरीं बोलाविलें आहे. पण एकंदरींत मला वाटतें कीं, सफळ होईल. असो, पाहूं. रात्रीं कृष्ण परमात्मा काय घडवील ते! तूं उद्यां सकाळींच मला येऊन भेट.

इतकें बोलणें झाल्यावर हा उठून गेला, व रात्रीं ही तिकडे जाते कीं नाहीं याची पाळत ठेविली. त्याजवरून हें खरें आहे अशी त्याची खात्री झाली; कारण, ही तेथें गेली होती. व बराच वेळ तेथें राहून परत आली. हा सकाळीं उजेडतांच स्नान वगैरे उरकून तेथें गेला आणि विचारूं लागला कीं, कालची हकीकत काय आहे? तेव्हां ती सांगावयास लागली, मी काल रात्रीं गेल्यावर तिला हळूंच विचारलें परंतु तिनें तें थट्टेवर नेलें व मला ह्मणाली, तुह्मी माझें मन पाहतां. अशी गोष्ट माझ्या हातून कधीं होणार नाहीं. तेव्हां मी तीस ह्मणालें, न घडावी हेंच चांगलें; परंतु वृद्ध आईबापांचा तो एकुलता एक मुलगा आहे. प्रस्तुत तुजकरितां जिवावर उदार झाला आहे हें पाहून माझ्या मनांत दया आली.

एकतर हा चांगला तरणाताठा जिवानिशीं जाणार. नंतर वृद्ध मातापितर शोकानें मरणार त्यापेक्षां तूं आणखी कांहीं दिवस दम धर. मी हें काम करतें. जीव देऊन वडिलांस दुःख देऊं नको, असें त्यास सांगितलें आहे. आतां तुला सांगतेंकीं, तुझ्यामुळें ही तीन मनुष्यें दुर्लभ मनुष्य देह टाकून जातील व त्या दुःखानें मी चौथी मरेन. इतक्याकरितां, तूं माझें वचन ऐक. एक वेळ त्याचा मनोरथ पूर्ण कर, व चौघांस जीवदान दि-

ल्याचें पुण्य घे. असें पुष्कळ प्रकारें तिला सांगितल्यावर ती अंमळ स्तब्ध बसली व कांहीं वेळानें लाजत लाजत म्हणाली, बरें, तुमच्या करितां म्हणून एकदां ** करीन.

हें ऐकतांच हा म्हणतो एकूण कबूल तर आहेना? ही म्हणाली, कबूल आहे. पण माझें एक तुला ऐकलें पाहिजे. तें असेंकीं, एकदां ही गोष्ट घडली ह्मणजे पुन्हां नांवही घेतां कामास नये, व हा छंद सोडला पाहिजे. वारंवार हें औषध मिळणार नाहीं व प्राणांशीं गाठ पडेल. तेव्हां हा म्हणाला, मी असा कांहीं वेडा नाहीं. पुन्हां तिजकडे पहाणाराहि नाहीं मग या गोष्टीची ओळख कोण देतो? याच वेळेस मी पुष्कळ मन आवरीत होतों व औषधें घेत होतों; पण कांहींच लागूं पडेना. तुम्ही म्हणाला तेंच खरें. या रोगावर हेंच औषध.

हें ऐकून ती बाई म्हणाली, बरें! असो, तिनें सांगितलें आहेकीं, माझ्या पोथीचे अझून अकरा अध्याय उरले आहेत. ते पुरे झाले म्हणजे मग हें तोंपर्यंत मी तुम्हास म्हणून आटविलेलें मसालेदार दूध आणून देत जाईन; हें त्यास देत जा म्हणजे त्याजवर अंमळ कळा येईल व सशक्त होईल. आणि त्यास सांग कीं इतके दिवस दम धरला तसा आणखी आकरा दिवस धर. मी तिचें हें म्हणणें कबूल केलें. हो! तुला तरी अंमळ शक्ति आलीच पाहिजे. झाली आतां दूध येण्याची वेळ. अंमळ थांब. (हिनें पूर्वींच संकेत करून ठेविला होता त्याप्रमाणें) इतक्यांत एक बाई दूध घेऊन आली त्यांत हिनें कांहीं औषध घालून ह्याला प्यावयास दिलें. हा दूध प्यायला आणि आनंदानें घरीं जाऊन स्नान संध्या जेव-

ण वगैरे केलें. याप्रमाणें नित्य क्रम चालला. रोज रोज पौष्टिक पदार्थ मिळत. शिवाय कोठें डाळिंबें अनानसें, नारिंगें, वगैरे पदार्थ तिसऱ्या प्रहरच्या वेळेस ही बाई देई व तिनें गुपचुप तुम्हांस देण्याकरितां मजजवळ देऊन ठेविलें आहे, अशीं बतावणी करी. ही मावशी बाई बोलणारी चतुर होती. प्रत्यहीं याचें प्रेम वाढेल व हुषारी येईल अशी नवी बतावणी करीत असे. यामुळें दिवसानुदिवस आनंद व हुषारी वाढत चालली.

ही येथें घडणारी हकीकत याच्या आईस मावशीकडून कळत असेच, व हाही मोठ्या आनंदानें सांगे. याचा हा प्रकार पाहून आईबापांस आनंद होऊं लागला.

सुमारें आठ नऊ दिवस गेल्यावर कांहीं साशंक मनानें हा त्या बाईस म्हणाला. अझून तिचें व माझें समक्ष भाषणहि होत नाहीं. हें काय? तुम्ही सांगता व तिजकडून प्रिय वस्तु येतात एवढ्या वरूनच काय तें समजावयाचें पोथी सुरू असली म्हणून बोलण्यास तर कांहीं हरकत नाहीं ना? तेव्हां ही म्हणाली येथें मनुष्यें असतात म्हणून ती लाजते; तुजकडे पहात देखील नाहीं. परंतु वचन कांहीं खोटें होणार नाहीं. त्यांत काल मी तिचा हातावर हात घेऊन ठेविला आहे. पाहिजे तर तिजकडून खूण करून आज तुला दाखवीन. ह्या गोष्टीस हा राजी झाला. नंतर एक सांकेतिक खूण ठरविली व तिसरे प्रहरीं ती आल्यावर कांहीं गोष्टी हळूहळू एक मेकी बोलत असतां स्वाभाविक ती खूण करण्याचा ओघ आणून तिजकडून हा तेथें असतां तशी खूण करविली; व ती गेल्यावर यास म्हणाली, कां आतां तर खात्री झाली-

ना? हा म्हणाला खात्री नव्हती कधीं? पण आपलें संशयीं मन उगीच संशय घेत होतें. असो, आतां हा योग येणार कोठें? तेव्हां ती ह्मणाली येथेंच. पर्वा रात्रीं मी तीला गुपचिप अंधेरांत घेऊन येईन. तूं येथें दडून बस. अस्तु, असा संकेत ठरल्यावर तो घरीं गेला, आनंदानें सर्व वर्त्तमान आईस सांगितलें. आई म्हणाली ती बाई कोणी मला देवीच मिळाली. तिनें जसा कांहं नवाच पुत्र दिला.

तेव्हां हा म्हणाला, कसें औषध आहे? आतां माझ्या चेहऱ्यावर किती तजेला व हुषारी दिसते? नाहीं तर इतके दिवस थोडी कां औषधें घेतलीं; पण कांहीं तरी गुण? आई म्हणाली, तें सर्व खरें. पण हा योग एकदांच जमणार आहे, आणि पुन्हां तूं छंद घेतलास तर! तेव्हां मुलगा म्हणतो, आई मी वेडा कां आहे? माझी हौस इतक्यानेंच पूर्ण होईल. मी त्या बाईपाशीं देखील कबूल केलें आहे कीं, पुन्हां ही गोष्ट मनांतही आणणार नाहीं; एकदां अनुभवलें म्हणजे मग त्यांत काय आहे?

वाचकहो! ह्याप्रमाणें ह्याच्या मनाची स्थिति झाली असतां या दोघी बहिणींनीं संकेताच्या दिवशीं सुमारें दोन प्रहर रात्रीं आंगावर खोटे डागिणे पुष्कळ घातलेले व वयानें आणि बांध्यानें तेवढीच अशी एक स्त्री त्या ठिकाणीं नेली. तेथें काळोख होताच. काळोखांतच हिनें त्यास तऱ्हे तऱ्हेची मिठाई दिली. इकडे यास अनुपमेय आनंद झाला होता. त्या वहरांत यानें आपली इच्छा पूर्ण करून घेतली. शेवटीं पाहटेच्या सुमारास ही त्यास हळूच म्हणाली. हा योग या बाईमुळें आला; अतःपर

येणार नाहीं. मी तशांतली नाहीं. इतक्याकरितां मन आवरून असावें. नाहींतर पटकून भयंकर परिणाम व्हावयाचा, इत्यादि थोडक्यांत बोध करून याची इच्छा पूर्ण करून गुपचिप रीतीनें ती निघून गेली.

दुसरे दिवशीं यानें त्या बाईचे फार फार आभार मानले व तिनेंही पुन्हा असें अनावर मन न राहूं देण्याविषयीं पुष्कळ बोध केला. तेव्हां पासून यानें तसा दृढ निश्चय करून आनंदानें दिवस घालविले. नंतर कांहीं दिवसांनीं ती बाई पुढें यात्रेस निघून गेली, व वर्ष सहा महिन्यांनीं पुन्हा भेटावयास आली. तों हा चांगल्या स्थितींत दृष्टीस पडला. बहिणीनें तिचें चांगलें आगत स्वागत केलें व सर्वांस फार आनंद झाला.

ह्या मुलास त्या बाईविषयीं संशय येई कीं बहुतकरून ही तीच असावी, परंतु ही मावशी फार दिवस बहिणी बहिणींची भेट नाहीं, वगैरेची बतावणी करी याजमुळें त्यानें तिकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं.

याचे आईबापही घरीं नसतां वारंवार तिचे आभार दर्शवून तिच्या अकलेची पुष्कळ वहावा करीत; तेव्हां ती ह्मणे, ही सर्व स्तुति माझी नव्हे, माझ्या घरच्यांची आहे, कारण मी त्यांचे वेळेस जसें पाहिलें तसें केलें.

---

## गोष्ट १४.

एक नामांकित वयोवृद्ध वैद्य आपल्या मुलास बरोबर घेऊन इंदूर येथें येऊन राहिला. त्याचा मुलगाही वैद्य-

क्रियेंत चांगला निपुण होता. बहुतेक काम तोच स्वतः पहात असे. बाप आपला स्नानसंध्या करून अक्षयी देव भजनांत काळ घालवी. एके दिवशीं त्या वैद्यास एके अतिशय श्रीमंत ठिकाणचें बोलावणें आलें.

या रोग्यास रोज तिसरे प्रहरीं थंडी वाजून ताप येत असे; तो सारी रात्र आंगांत राहून पाहटेस घाम येऊन निघे. असें सुमारें तीन महिने चाललें होतें. गांवांतील वैद्य द्रव्याच्या इच्छेनें मन लावून औषध देत नसत कारण कीं, हा लौकर बरा झाल्यास आपली प्राप्ती बुडेल अशी त्यांची समजूत असे. अस्तु.

या वैद्यानें तेथें जाऊन प्रकृति पाहिली व यांत काय आहे? हा एक्या तीन दिवसांत बरा होईल असें ह्मणून प्रतिज्ञा करून औषध दिलें.

ही बातमी गांवांतील वैद्यांस लागलीच समजली. कारण रोजच्या प्रमाणें त्या दिवशीं त्यास बोलावणें गेलें नाहीं. तेव्हां ते सर्व वैद्य एकत्र होऊन ह्मणूं लागले कीं, हा गांव राजधानीचा. येथें परस्थ वैद्य येऊन आपली पोटगीचीं मोठालीं कुळें घेऊं लागले, तर आपली अप्रतिष्ठा होऊन स्वार्थही बुडेल. इतक्याकरितां आपण सगळे एकत्र जमून युक्तीनें त्याचीच बचेरी उडवून देऊं, ह्मणजे सहजच तो येथून पळून जाईल. आतां तो विद्वान् आहे खरा. परंतु आपण सर्व एकत्र झाल्यावर त्याचें काय चालणार आहे? असें ह्मणून अमक्या रीतीनें फजीती करावयाची असा संकेत ठरवून सर्वजण आपआपल्या घरीं गेले.

पुढें भोजनोत्तर संकेताप्रमाणें एक वैद्य कांहीं निमित्त

काढून त्या रोग्याच्या घरीं गेला. नंतर येण्याच्या कारणाची कांहीं बतावणी करून रोग्यास म्हणाला, आतां प्रकृति बरी आहेना? तेव्हां रोगी म्हणतो, बरी कसली! आज तीन महिने झाले; त्रासलों! आतां चार घटकेनें ताप भरेल. तुमचें मात्र खेरीज करून पुष्कळांचीं औषधें घेतलीं पण गूण नाहीं. पहा आपण, हात पहा.—नंतर यांनीं संभावीतपणें पुढें होऊन हात पाहिला आणि तोंड वाईट करून म्हणाला, अरेरे! आज कांहीं सोमली मात्रा कोणी आपणांस दिली असावी. आतां ती जास्ती तलखी करील.—हीं औषधें आपणांसारख्यास काय उपयोगी? आपण राजविलासी लोक. आणि ही जंगली लोकांचीं औषधें. असो, पण इतका मूर्ख कोण कीं, त्यानें आपणांस असलें विषारीं औषध दिलें.

रोगी हें ऐकून घेऊन म्हणाला, असें काय हो ह्मणतां? चांगला विद्वान् वैद्य आहे व त्यानें प्रतिज्ञेनें तीन दिवसांत बरें करितों असें बोलून औषध दिलें आहे. विषारी भलतेंच कसें देईल?

तेव्हां हा ह्मणतो, आतां असें नको. हें मोठें शहर आहे. आणखी पांच च्यार वैद्य बोलावा. आणि मग मी याची पक्की व्याख्या करितों असें बोलतांच तेथें काय कमती आहे? लागलेंच वैद्य बोलावून नेले. प्रत्येक वैद्य आल्या बरोबर कोणाशीं बोलूं न देतां त्यास प्रथमतः यांनीं आपला हात दाखववावा, व त्यानें ही प्रकृति पाहिल्या बरोबर सांगावें कीं, कांहीं जहालीम विषारीं औषध पोटांत गेलें आहे. व त्याचा पूर्ण अंमल बसत चालला आहे. आतां तलखी होऊं लागेल, शोष वाढेल; आणि

वरतीं योग्य उपचार न झाल्यास आंगाची आग आग होऊन कदाचित् मरणही येईल. बरें झालें, लौकर समजलें.

हें ऐकतांच रोगी भ्याला, आणि ह्मणाला, असें असें औषध मी त्या नव्या वैद्यापासून घेतलें आहे. तो वैद्य ह्मणाला कीं, हटकून तीन दिवसांत बरा करितों. सबब लौकर बरा होण्याच्या आशेनें मी औषध घेतलें. फार त्रासलों हो! काय करूं?

तेव्हां सर्व वैद्य रागावून ह्मणाले, आह्मी का हजाम आहों? आज तीन महिने एकमेकांच्या संमतानें औषधें देतों तरी गूण येत नाहीं आणि हा मात्र मोठा धन्वंतरीचा नातू आला कीं, हटकून तीन दिवसांत बरें करणार! प्रकृतीचो घाण करून टाकली सारी. त्याला आमच्या समोर तर आणा, ह्मणजे विचारतों कीं, असल्या राजविलासी पुरूषांस अशीं जहालीम विषारीं औषधें देण्यास कोणत्या शास्त्राचा आधार आहे? गांवढळ कोठला! यानें गोरगरीबांस फसवावें. आपल्यांत वकूब नाहीं तर अशा ठिकाणीं हात घालूं नये.

इतक्यांत दुसरा एक वैद्य म्हणाला, तें असो, पण त्या वैद्यास एकदां बोलावून आणा. म्हणजे काय औषध दिलें हेंही कळेल व तेणेंकरून उतारे करण्यास ठीक पडेल. नंतर त्याची बचेरी उडवून देऊं कीं, पुन्हा कोणास औषध देईल कीं नाहीं. याचें बोलणें संपतें आहे तों तिसरा वैद्य म्हणतो, पण यांनीं हें घेतलें कसें हो! "विनाश काले विपरीत बुद्धिः" वचन आहे तें खोटें नाहीं.

अशा प्रकारचा संवाद ऐकून रोग्यास फारच दहशत बसली. आणि मनांत म्हणाला, आपण फार मूर्खपणा

केला; आतां लौकर यांच्या सांगण्याप्रमाणें उतारा घेत-ला पाहिजे. असा विचार करून वैद्यांस म्हणाला, द्या आतां, उतारा द्या व जो लागेल तो खर्च करा. तुम्हांस राग येऊं देऊं नका.—मी आतां तुमच्या वांचून दुसरें कोणाचें औषध घेणार नाहीं.

तेव्हां वैद्य मनांत म्हणाले, केलेली मसलत सिद्धीस गेली. ही स्वारीतर रकमेवर आली; पण एकदां त्या वैद्याची फजीती उडविली पाहिजे. मग उघडपणें म्हणतात, अहो त्यांत राग कशाचा? आम्ही औषधें देऊं, तुम्ही बरें व्हाल; सर्व गोष्टी होतील. काळजी करूं नका. पण त्या वैद्यास एकदां येथें बोलावून आणा म्हणजे काय औषध दिलें याचा खुलासा काढून घेऊं; तेणेंकरून उताऱ्याची योजना करण्यास ठीक पडेल. असें म्हणतांच ताबडतोब वैद्यास बोलावणें पाठविलें, व इकडे यास ताप भरत चालला.

तेव्हां त्यांतून एक वैद्य ह्मणाला, कां महाराज रोजतापांत आजच्या सारखी तलखी होत असे काय? रोग्याच्या मनावर विषारी मात्रा पोटांत गेल्याचा पूर्ण ग्रह बसलाच होता. सबब त्यामुळें त्यास कांहीं आजचा प्रकार जास्ती आहे, असें वाटूं लागलें. तो ह्मणाला, आज आंगाची आग जास्ती होत आहे, आणि शोषहि फार करतो, व तोंडास कोरड पडत चालली आहे. लौकर उतारा देण्याची तजवीज करा. वैद्य म्हणाला, "आतांशी त्या औषधाचा प्रभाव दिसूं लागला आहे. हा प्रकार याहून जास्ती वाढेल. बरें झालें, नाहींतर मोठा अनर्थ झाला असता.मी आतां उपाय करतों."

असें बोलत आहेत तों इतक्यांत नवा वैद्य आला. तो आल्या बरोबर सर्व वैद्य मंडळी त्याजवर घसरून पडली. एकदम कोणी कांहीं, कोणी कांहीं विचारूं लागले. दरम्यान याचें बोलणें कोणीही ऐकेना. मध्येंच कोणी इतर लोक ह्मणत, यांनीं ही एक गंमतच केली. शाबास वैद्य बोवा! असें विषारी औषध देऊन भला गोंधळ घातलात.

असा त्याच्या भोंवतीं एकच गहजब उडवून दिला. तेव्हां त्यानें मोठ्या नम्रतेनें सांगितलें, अहो माझें थोडेसें भाषण ऐका. मी विषारीं औषध दिलें नाहीं. जर तुह्मांस संशय असेल तर वमनाचें औषध देतों व पोटांतलें सर्व पाडतों, मग तर त्याची परीक्षा करितां येईल ना?

हें ऐकतांच सर्वजण एकदम ह्मणाले, वहावा वहावा! मोठा अकलेचा खंदक! आधींच तलखीनें तबियत हैराण आणि त्यांत हा वांतीचें औषध देणार; ह्मणजे पुरीच मौज! एकूण धन्य छाती! दुसऱ्याच्या जिवाचें कांहीं कां होईना. वैद्यबोवा, आपण फार विद्वान आहां. आतां येथून बऱ्या अब्रुनें चालते व्हा. तेव्हां हा कांहीं बोलूं लागला. इतक्यांत एक हातारा लापट वैद्य ह्मणाला. कायहो या वेड्याच्या नादीं लागला? त्यास हकलून द्या. आणि उपचार करा; मग पाहूं त्याचा विचार. असें ह्मणतांच संकेताप्रमाणें दोघे चौघेजण उठले आणि धक्या बुक्या देत देत दरवाजा बाहेर त्यास घालवून दिलें. वैद्य बिचारा करितो काय? नाइलाज होऊन घरीं आला आणि सर्व हकीकत बापास कळविली.

बापानें ती ऐकून घेऊन ह्मटलें. मला काळजी क-

रूं नको. पहा मी याचा कसा बंदोबस्त करितों तो. ह्मण आहेना? "जशासीं तसा भेटे, आणि मनांचा संशय फिटे." येथें तसेंच केलें पाहिजे. तूं अजून पोर आहेस.

असें बोलून बैराग्याचें सोंग घेतलें, आणि कागदाचें कातरलेलें एक झाड हातांत घेऊन या रोग्याच्या घरीं आला. व ह्मणाला, "आज कल मेरेको मरनेका है. मुझे थोडा गंगाजल कोई देवे तो मैंभी कुच एहसान भुलनेका नहीं." हें त्याचें भाषण ऐकून तेथील एके वैद्यानें सांगितलें कीं, द्या त्यास गंगोदक, पुण्यकर्म आहे. तेव्हां एकानें आणून दिलें. तें घेऊन या बैराग्यानें त्या वैद्यास सांगितलें कीं, "महाराज, आप बहुत अच्छे अदमी हो. मुझे गंगाजल दिया इसखातर मेरा दिल बहुत खुष हो गया है. ये लेव हमारा परसाद." असें ह्मणून त्यानें तें कागदाचें झाड त्यास दिलें. तेव्हां वैद्यानें विचारलें. याचा काय उपयोग! त्याजवर बैराग्यानें एक बेअर[1] ह्मणून दाखविला, तो असा–

(मुसलमानी कविता.)

अगर सुंगे कोई रस झाडके तईं ॥
गमावे तल्खिको और तापके तैं ॥ १ ॥
तबिअत खुष हो और आराम दिलको ॥
हकीमोंका है कहना याद रख तूं ॥ २ ॥

भावार्थ. जर कोणी या झाडाचा वास घेईल तर त्याची तलखी आणि ताप जाईल. व तबियत मजेदार होऊन मनास फार आनंद व सुख वाटेल. हें ऐकून वैद्य

---

१ मुसलमानी कवितेचा प्रकार आहे.

त्यास आणखी कांहीं पैसे देऊं लागला, परंतु तो घेईना. पुढें ही हकीकत त्यानें इतर वैद्यांस कळविली. तेव्हां सर्वांनीं एक विचारानें ठरविलें कीं, औषध करण्याच्या निमित्यानें पैसे काढूं, आणि लागलेंच हें झाड वासास देऊन पोटांत कांहीं तरी औषध देऊं ह्मणजे याचाही गूण कळेल. असा विचार ठरवून "सर्वविषविध्वंसनरस" दिला पाहिजे. कारण कोणतें विष पोटांत गेलें आहे याचा निर्णय ठरत नाहीं. अशी बंतावणी करून त्या मात्रेकरितां सुमारें सातशें रूपये घेतले व तें झाड अर्ध घटका हुंगण्यास सांगितलें, आणि पोटांत देण्याचें औषध तयार करूं लागले. सुमारें अर्ध घटका झाली नाहीं तोंच रोग्यास मोठी सपाटी वांति झाली व सर्व लोक घाबरून गेले. वांति झाल्या बरोबर हा छपून बसलेला बैरागी एकदम पुढें होऊन ह्मणाला, खबरदार रहा. कोणी या वांतीस हात लावूं नका. व घाबरूं नका. मघाशीं ज्या वैद्यास तुह्मी येथून घालवून दिलें, तो माझा मुलगा. त्याजवर तुह्मीं विषारीं औषध दिल्याचा आरोप आणला सबब मी हें कपटरूप घेऊन आलों, व पोटांत औषध न देतां वासानें वांति व्हावी ह्मणून या कागदी झाडाची योजना केली. त्याजवर जें औषध पेरलें आहे त्याच्या वासानें वांती झाली. आतां कोण खरा वैद्य असेल त्यानें या वांतीची परिक्षा करावी; व विष घातल्याचा पुरावा करावा. आह्मी त्याचे चाकर होऊन राहतों. उगीच रोग्याच्या मनांत खोटी दहशत भरवून देऊन दुसऱ्या वैद्याची नाचक्की करावयाची, आणि यःकश्चित् ज्वर तीन महिने ठेऊन द्रव्य खावयाचें. असलीं कामें करितां काय?

हें आमचें शील नाहीं. मी अझून सांगतों कीं, हा ज्वरी तीन दिवसांत बरा होईल.

असें खडखडीत भाषण ऐकतांच सर्व वैद्यांची तोंडें एकदम उतरून गेलीं; व पुढें काय बोलावें हें कोणास ही सुचेना. अगदीं खजील होऊन स्तब्ध बसले.

इकडे रोग्यास या बोलण्यानें हुषारी वाटली, व त्याची पक्की खात्री झाली कीं, हा वैद्य खरा कसबी आहे. आपल्याच ग्रामस्थांनीं भलतेंच माझ्या मनांत भरविलें, आणि त्या बिचाऱ्याचा अपमान केला. अस्तु, पुढें त्या रोग्यांनीं वैद्यांस दिलेले सातशें रूपये हिसकून घेऊन त्यांची पुष्कळ फजीती करून घालवून दिले. आणि या पूर्वीच्या वैद्यास बोलावून आणून त्याजपाशीं क्षमा मागितली व उपचार चालू केला. या उपचारानें तिसरे दिवशीं ताप बंद झाला. तेव्हां रोगी फार खुष झाला व सभा करून सगळी हकीकत सभेंत बोलून दाखविली, आणि स्तुति करून याची चांगली बिदागी केली. पुढें त्या रोग्याच्या वशिल्यानें या वैद्यास राजाश्रय मिळाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

---

## गोष्ट १५.

एक देशस्थ ब्राह्मण भाद्रपद मासीं कोंकणांत आपल्या एका मित्राच्या घरीं सायंकाळीं पाहुणा गेला. मित्रानें त्याचें आदरातिथ्य चांगलें केलें. भोजनोत्तर सोप्यांत बिछाना घालून दिला. हा दमलेला असल्यामुळें यास लौकरच झोंप लागली. नंतर सुमारें दहा घटका

रात्रीस मित्रानें एक स्वच्छ तांब्या पंचपात्री भरून तेथें ज्ञोत्याच्या कडेस ठेविली व आपण जाऊन निजला.

इकडे सुमारें आणखी दोन घटकेंनीं पाहुणा जागा झाला व तें ठेवलेलें पाणी प्यायला. तें पिते वेळेस घशांत कांहीं आडकल्या सारखा भास झाला, पण असेल कांहीं केरवीर! शिवाय तें पोटांत ही गेलें असें ह्मणून तिकडे दुर्लक्ष्य करून तसाच निजला.

सकाळीं उठला तों समोरच तो तांब्या होता त्याकडे नजर गेली. पाहतो तों सर्व तांब्यावर घुलीं चढून अगदीं काळा होऊन गेला आहे. हें पाहतांच त्याच्या छातींत एकदम धस्स झालें, व रात्रीस घशांत अडकलीं तीं घुलींच असतील. असें पूर्णपणें त्याच्या मनानें घेतलें.

घरधन्यानें सांगितलें कीं, मुलांनीं पाण्यांत बकुळीचीं फुलें घालून ठेविलीं होतीं. त्यांतलें एखादें फूल चुकून तुमच्या तांब्यांत आलें असेल. पाहिजे तर पाण्याचा वास घेऊन पहा. असें बोलत आहेत तोंच त्या गृहस्थाच्या पोटांत उमदळून येऊन मोठी उलटी झाली. चूळ बीळ भरून स्वस्थ होत आहेत तों दुसरी, तिसरी, चौथी अशा एका मागून एक उलट्या होऊं लागल्या. तेव्हां घरधन्यानें वैद्य बोलावून आणला, आणि वांती बंद होण्याचे पुष्कळ उपचार केले. परंतु गूण येईना. पोटांत तिळमात्र अन्न व पाणी ठरेना; अक्षयी उह्लासा, घेरी, श्रमामुळें आंगास घाम आणि हह्लाखी अशी अवस्था झाली

याप्रमाणें दोन दिवस झाले. अहो-रात्र औषधें व जायणें चाललीं होतीं, इतके उपाय करूनही गूण नाहीं. हें पाहून रोग्याचा धीर अगदीं खचला. त्यास वाट

लागलें कीं, मी आतां येथेंच मरणार. इकडे घरधन्यास फार दुःख झाले कीं, बहुतादिवशीं मित्र आपल्या घरीं आला याजवर असा संकट समय आला हें पाहून म्लानमुख करून स्तब्ध बसला.

इतक्यांत एक जण स्वाभाविक समाचारास आलेला गृहस्थ ह्मणाला. असे स्तब्ध कां! अझून उलटी बंद होत नाहीं, तेव्हां हा कदाचित् विषाचा प्रकार असेल. कांहीं विषें अशीं असतात. तुह्मी त्या सातारकर वैद्यास आणा याची तो चांगली भिनारवी करील. विषविद्या तो फार चांगली जाणतो. असें बोलतांच घरधन्यासही आठवण झाली कीं, हा राजाश्रित वैद्य होता; हल्लीं वयोवृद्धत्वामुळें घरीं आला आहे खरा. नंतर त्यास बोलावूं पाठविलें.

वैद्यानें बोलावणाऱ्या मनुष्याबरोबर पुष्कळ संभाषण करून, सगळी विचारपूस करून घेतली. आणि सांगितलें कीं, तूं मला ही हकीकत सांगितलीस असें तेथें बोलूं नको. तो बरें ह्मणाल्यावर वैद्य तेथें गेला आणि प्रकृति पाहतांच सांगूं लागला कीं, यास अमुक दिवस उलटी होत असेल. यानें तें कबूल केलें. तेव्हां हा ह्मणतो, ही उलटी लौकर बंद होणार नाहीं. जेव्हां ओकून ओकून याचे पोटांतलें विष बाहेर पडेल तेव्हां बंद होईल किंवा दरम्यान अशक्ततेमुळें मृत्युही येईल इतक्याकरितां प्रस्तुत आणखी जोरानें उलटी होईरु व एकदम विष बाहेर पडेल असें औषध दिलें पाहिजे. हें विष प्राणिज आहे; शरिरांतून निःशेष निघाल्यावांचून कधीं चैन पडूं देणार नाहीं. हे ऐकून रोग्यास वाटलें कीं, यांनीं प-

रिक्षा तर बरोबर केली. आतां काय होईल तें होवो! या-
चें औषध घ्यायचें.

असें ठरवून ह्मणाला, वैद्यबोवा परदेशांत मजवर ह
प्रसंग गुदरला आहे. आतां मायबाप तुह्मी अहां जें द्या
ल तें द्या. प्रयत्न तुमचा, आयुष्य माझें. जगलों वांचलों
तर होईल ती चाकरी करीन. आतां आपण रेचाचें औ-
षध द्या किंवा वांतीचें औषध द्या.

त्याचें हें बोलणें ऐकून वैद्यानें दूध आणविलें, आणि
त्यांत कांहीं औषध टाकल्या सारखें करून तें दूध प्या-
वयास दिलें. या औषधानें विष पडे तों वांती होईल,
वांती निराळ्या भांड्यांत करा असें सांगितलें. इकडे रो-
ग्यानें ती औषधाची वाटी तोंडास लावली आणि देवा-
चें नांव घेऊन नेटासरसें अर्धें दूध प्यायला तों तें लाग-
लेंच उलटून पडलें. वैद्यानें ती उलटी पाहिली. आणि
सांगितलें यांत कांहीं पडलें नाहीं. बाकीचें औषध प्या.
तेव्हां पुन्हा ज़ोर करून तें औषध सगळें प्यायला. व
वाटी एकीकडे करितो आहे तोंच वांति झाली. वैद्यानें
हात चलाखीनें त्या गडबडींत दोन तीन मेलेले घुले वां-
तीच्या भांड्यांत टाकून दिलें, आणि ह्मणाला, पहाहो
या खेपेस तरी कांहीं पडलें कां? नाहींतर पुन्हा औष-
ध करून दिलें पाहिजे. रोग्यास तें पाहण्याची पुष्कळ
उतावळी झाली होती, पण हल्लाखी झाल्यामुळें हे पाह-
णारे काय ह्मणतात इकडे लक्ष देऊन तसाच बिछान्या-
वर पडून राहिला. इकडे यांनीं पाहिलें तों आंत कांहीं
केंस, कांहीं घुल्याचे तुकडे व एक दोन सगळालीं घुलीं
दृष्टीस पडलीं. तेव्हां एकदम सगळे ह्मणूं लागले, पह-

लें हो पडलें!! वकुळीचीं फुलें कसलीं? धुळीच तीं! हीं पहा एक दोन सगळालीं आहेत व हे पहा कांहीं केंस! हे शद्ब ऐकतांच रोगी उठून बसला आणि पहातो तों खरींच! तेंव्हां वैद्य पुन्हा प्रकृति पाहून ह्मणाला, आतां हा बरा झाला. तुह्मी कांहीं काळजी करूं नका. यास आतां थोडेसें डाळिंब खावयास द्या, संध्याकाळीं अगदीं अल्प भोजन द्या. नंतर उद्यापासून पोटभर जेवल्यास हरकत नाहीं. असें सांगून उठून गेला.

इकडे याची वांति बंद झाली व दोन चार दिवसांनीं बरीच हुषारी वाटली. तेंव्हां तो घरधन्यासुद्धां आणखी कांहीं मंडळी बरोबर घेऊन वैद्याच्या घरीं आला, व चांगली परिक्षा व उपचार केले अशा बद्दल फार स्तुति करूं लागला. ती ऐकून वैद्य म्हणतो, बाबा, ही सगळी अशी अशी हकीकत आहे. पाहिजे असेल तर त्या बोलावणारास विचार. हा फक्त तुझ्या मनाचा विकार. आह्मी धोरणानें हें जाणलें व असें असें कपट करून तुझी समजूत पालटली. तेणेंकरून तूं लौकर बरा झालास. याशिवाय शेंकडों औषधें करतास तरी गूण न येता.

हें ऐकून सर्वत्रांस या कल्पनेचें मोठें आश्चर्य वाटलें व हा वैद्य गांवांत होता म्हणून आज हा ब्राम्हण वांचला, नाहींतर मोठी अपयशाची पाळी आली होती. परमेश्वरानें हें एक ब्राह्मणावरचें व घरधन्यावरचें विघ्नच टाळलें, असें ह्मणून सर्व मंडळी रोग्याचे घरीं गेली. आणि आनंदानें पेढे आणून कांहीं वैद्याकडे पाठवून बाकीचे सर्वांस वाटले. अशा प्रकारें आनंद प्रदर्शित के-

ला. व आपलें काम झाल्यावर रोगी आपल्या गांवीं पर जात असतां गांवोगांव त्या वैद्याची कीर्ति पेरीत चालल

---

## गोष्ट १६.

एके तरूण बाईचा पाय निसटून ती विहिरींत पडली ती विहीर अगदीं कोरडी होती. तेथें जवळच कांहीं मनुष्यें काम करीत होतीं, त्यांनीं तिला बाहेर काढली; तो ती अगदीं बेसावध असून श्वासोच्छ्वास अगदीं बंद आहेत असें वाटलें. ही बाई शरीरानें सशक्त, लठ्ठ अशी होती. कोणी हिच्या डोळ्यास पाणीं लाविलें, ताळूवर व आंगावर शिंपडिलें, परंतु ही सावध होईना. भोंवतालीं पुष्कळ गर्दी जमली होती, त्यांच्या मनास वाटलें कीं, ही एकदम आपटल्यामुळें हिची अशी अवस्था झाली आहे. ह्या वेळेस नाडीविषयीं काय पण श्वासोश्वास चालू आहे कीं नाहीं, याविषयीं संशयच होता.

इतक्यांत एक मुसलमान हकीम तेथें आला. त्यानें हा रस्त्यावर मंडळीचा जमाव पाहिला तों आंत ही अशी अवस्था. त्यानें तिला पाहिलें व ह्मणाला, ही पडल्यामुळें बेसावध झाली नाहीं. घेरी येऊन वेहोष झाल्यानें पडली आहे. व ही एक प्रकारची मूर्छा आहे. तुमची सगळ्यांची आशा तुटली असली व परवानगी देत असलां तर मी इलाज करितों.

तेव्हां सगळ्यांनीं सांगितलें कीं, आतां इलाज कशाचा करितां? येथें काय बाकी आहे? पहा बोवा उपाय करून, नाहीं कां ह्मणावें?

असें ह्मणतांच हकीमानें पटकन एक शस्त्र काढलें व हाताच्या आणि पायाच्या मिळून चार शिरा तोडल्या. तोडतांच रक्त प्रवाह सुरू झाला. व चटकन् चलनवलन शक्ति होऊन शुद्धीवर आली. नंतर कांहीं उपाय करून शिरांचीं तोंडें वगैरे युक्तीनें बांधलीं. सर्व लोकांस हें कृत्य पाहून मोठें आश्चर्य वाटलें; व ते ह्मणाले, हकीमसाहेब! हें काय झालें होतें? व आपण उपचार काय समजून केला?

नंतर हकिमानें सांगितलें, या रोग्याची जशी स्थिती होती अशी स्थिती पाहून वैद्यही फसतात. मग तुमचें नवल काय? अशा स्थितींत लौकर योग्य उपचार न झाल्यास मृत्युच यावयाचा. लोकांस वाटतें कीं हा रोगी पडल्यामुळें लागून आघातानें बेसावध झाला असेल; परंतु तसें नाहीं. हा रोगच निराळा. याचें तुमच्यांत रक्तजमूर्च्छा हें नांव आहे.

पाहिजे असल्यास त्या बाईला विचारा, तिला याच्या पूर्वीं थोडें डोकें दुखणें, आंगावर मुंगी चढल्याचा भास, भोंवळ, थोडीशी विस्मृति, किंचित् बहिरेपण, कानांत कांहीं आवाज होतो आहे असें वाटणें, इत्यादि लक्षणांपैकीं बहुतेक लक्षणें होत असलीं पाहिजेत. व तिला हे विचारा कीं, तुला घेरी आल्यामुळें तूं पडलीस किंवा पाय निसटून पडलीस? ह्मणजे तुमची खात्री होईल, ती घेरी येऊन पडली असावी. मंडळींनीं तिला विचारलें, तों खरेंच. पूर्वलक्षणेंही बहुतेक होत असत. व घेरी ही आली होती.

हकीम ह्मणाला, हें ओळखून अशा रीतीनें रक्तमोक्ष

करणें आवश्य आहे कीं नाहीं हें ठरविणें अकलेचें चातुर्याचें काम आहे. नाहींतर हा उपचारच मार व्हावयाचा.

इतक्यांत तिच्या घरच्या माणसांस खबर कळून त रडत ओरडत धांवतच आलीं. व येथें हें असें कृत्य पा हिलें. तेणेंकरून त्यांस अत्यानंद झाला.

नंतर हकिमानें पुढें काय उपचार करावयाचे व खा ण्या पिण्याची व्यवस्था कशी ठेवावयाची हें सांगितलें सर्व मंडळींनीं हकिमाची फार स्तुति केली. व त्या बाईच्य माणसांनीं त्यास घरीं नेऊन यथाशक्ति द्रव्य देऊन त्याचे फार आभार मानले.

---

## गोष्ट १७.

अर्बस्थानांतील एके बादशहाचा अंगठा लढाईंत तु टला. त्याच्या पदरीं मोठमोठे हकीम होते त्यांनीं मांस-वृद्धीचीं वगैरे औषधें लावून आंगठ्याचा भाग बराच वा-ढविला व जखम बरी केली. परंतु त्या आंगठ्याच्या थों-टुकास नख येईना. तेव्हां त्यांनीं आपल्या पदरचे सर्व हकीम कैदेंत घातले आणि ह्मणाला, "जब इस अंग-लीपर नख आयगा तब तुह्मारी छुटका होयगी. नहीं तो कभ्भी नहीं होनेकी तेव्हां बिचारे काय करितात! आप-ल्या नशिबावर दोष देऊन मुकाट्यानें कैदेंत राहिले.

इकडे बादशहानें असा क्रम चालविला कीं, जो को-णी वैद्यकाचा धंदा करणारा असेल त्यास बोलावून आणून

असा सवाल करावयाचा. यह अंगली तेरेसे अच्छी होयगी? वैद्यानें नाहीं ह्मटल्यास लागलेंच कैदेंत घातलेंच. व होय ह्मणून ह्मणाल्यास कांहीं उपचार करून पाहावे, गूण नाहीं येतसा झाला ह्मणजे कैदेंत टाकावें, असा क्रम चालविला तेव्हां त्याच्या राज्यांतील सर्व वैद्यांस मोठी दहशत पडली, कित्येकांनीं हा धंदा सोडून दिला, व कित्येक पिढीजादे वैद्य हा मोठा कहर आहे असें ह्मणून छपून बसले. गांवांत व राज्यांत मोठा अनर्थ उडून गेला कीं, काय करावें? कोणी वैद्य नाहीं.

इतक्यांत इराणांत एके प्रसिद्ध हकीमाचा मुलगा नवीनच वैद्यक कर्म शिकून तयार झाला होता. त्यानें असा विचार केला कीं, परदेशांत जाऊन धंदा कारावा ह्मणजे देशही पाहण्यांत येतील व कीर्ति वाढेल. व द्रव्य संपादन करावयाचें तेंहीं होईल. असा विचार करून तो फिरत फिरत या राजधानींत आला. तेव्हां तेथील कित्येक सद्गृहस्थांनीं याचें अल्पवय व विद्वत्ता पाहून परोपकार बुद्धीनें त्यास सांगितलें कीं, येथून आपण जावें. येथें बादशहाच्या भीतीनें कोणी वैद्य येत नाहींत, व भीतीचें हें कारण असें असें आहे. तेथें दुसरा कांहीं इलाज चालत नाहीं. तरी हा तेथें राहून वैद्यक चालवूं लागला.

त्या वेळेस गांवांत कोणी वैद्य नसल्यामुळें ह्याची मोठी जारी लौकरच चालू झाली, व कीर्ति वाढली. जों जों कीर्ति वाढूं लागली, तों तों तेथील सद्गृहस्थ ह्याविषयीं फार हळहळत व सांगत कीं एखादे दिवशीं बादशहाच्या कानावर गेलें ह्मणजे नाहक पंचाईत होईल. अजून तरी येथून पळून जा, असें त्यास सांगितलें तरी ही हा

जाईना. असें होतां होतां एके दिवशीं बादशहास नवा इराणी हकीम गांवांत आल्याची खबर कळली. नंतर ताबडतोब मेणा पाठवून यास बोलावून नेलें आणि ह्मणाला, "हकीमसाहेब आप इस अंगलीको नाखून[1] आनेकी दवा देएंगे तो हम तुह्मारा एहसान[2] कभीं नहीं रखने के."

हें ऐकून हा ह्मणतो, "अच्छा जहांपना[3] इसकी दवा तो मुझे ऐसी मालुम हैके, एक पांच रोजमे अंगलीपर नाखुन आवेगा. मेरे उस्तादकी कहनाही ऐसा हैके, यह कभीं झूटा होनेका नहीं. मैं आपको तर्तीबसे दवा बनाकर दूंगा. लेकिन् उसमेका सबचीजों पैदा करके मुझे देना चाहिये. फिर जो मेरेसे आपका काम नहीं हुवा तो कैद क्या. मेरा शिर हाझर है. आप मुखत्यार हो." तेव्हां बादशहा ह्मणतो, "ऐसा खात्रीका जबाब देनेवालाभी मुझे कोई हकीम आजतक नहीं मिला. आच्छा! मैं सबचीजों[4] पैदा करके हाजिर कर देताहूं. आप दवा बनाइये, और इन् सब हाकीमोंपर नक्षा करो."

तेव्हां हाकीम म्हणतो, इन्शा आल्ला[5] होता आल्ला! फिर क्या रहा? मैं हाजिर हूं. और आल्ला करे तो तीन दोनमे आच्छाभी हो जावे. लेकिन चीजों पैदा करना बडा मुष्कील काम है. हें ऐकून बादशहा ह्मणाला, 'क्यों! मैं बादशहा होकर मेरेसे पैदा नहीं हो सकेंगी? एह कुच बडी बात नहीं. क्या चीजों हैं सो अभ्भी बयान करो; मैं पैदा करताहूं. तेव्हां हा ह्मणतो, खुदाके कुदरतसे[6] क्या नहीं हो सकता? वोह चाहे तो मुर्देकोभी जिंदाकर

१ नख. २ उपकार. ३ अदबीचा एक दर्शक शब्द आहे. ४ गुळचे. ५ ईश्वराचें स्मरण उद्धारलें. ६ नख.

सकताहै. आपसे बिलकुल पैदा नहीं हो सकेंगे ऐसा मेरा कहना नहीं. लेकिन् पहिले आप मेरेसे इतना इकरार करो और लिख दो, के, जो मैंने एक महिनेके अंदर चीजों पैदा करके नहीं दियों, तो तुमारेपर मेरा कुछ दावा नहीं, और सब हकीम कैदमेसे छोड दूंगा. फेरभी जब आप चीजों पैदा करके देएंगे उस वख्त मैं हाजिर होंके दवा बनादूंगा. मैं आपका गुलाम है." हें ऐकून बादशहास वाटलें कीं, ह्या इराणच्या हकीमास माझा दरारा आणि पैसे खर्चण्याची तऱ्हा यास ठाऊक नाहीं. ह्मणून हा ह्मणत असेल. अशीं काय हा औषधें सांगणार आहे कीं, याची किंमत माझ्यानें देववणार नाहीं. वेडी समजूत आहे याची! असें मानून त्याच्या सांगण्याप्रमाणें जिनसा एक महिन्याच्या आंत मिळवून दिल्या नाहींत, तर हकीमांस सोडून देईन. असा (विचार न करतां) ठराव लिहून दिला. आणि ह्मणाले, कहदे अभी क्या क्या चीजों वो हैं.

हकीमानें आपल्या मनाजोगा भर सभेंत लेख झाला असें पाहून हा पेअर (पद्यविशेष) ह्मणून दाखविला.

**क्या अजब आना है इस नाखून का॥**
**फूल गर गूलरका हो पेषाब मच्छीका॥**

भावार्थ, जर उंबराचें फूल आणि माशाचें मूत मिळेल तर नख येण्याची काय अजब गोष्ट आहे! बादशहानें आपल्या वजीरास सांगून ह्या दोन जिनसांचा पुष्कळ तपास केला, परंतु यांतली एकही जिन्नस मिळेना. शेवटीं मुदत भरतांच मनांत खजील होऊन बादशहानें सर्व हाकिमांस सोडून दिलें. तेव्हां (यांतील कित्येकांस

या नव्या हाकिमानें आधींच गुप्तरूपें हा बेअर शिकवून ठेविला होता. तुह्मी सुटल्यावर बादशाहाजवळ ह्मणा-कीं, आह्मांस आठवण नव्हती पण हें औषध याजवर मुजरत गूण करणारें आहे. ह्या सूचनेंप्रमाणें ) कैदेंतून सुटतांच पांच पंचविसांनीं हा बेअर ह्मणून दाखविला. तेव्हां बादशहास वाटलें कीं, हकीम खरा आहे, व औ-षधेंही खरीं आहेत; परंतु कशी मिळवावी हें कोणास ठाऊक नाहीं. असें वाटून त्याजवरही राग न करितां त्यास व ज्यांनीं ज्यांनीं हें औषध सांगितलें त्यांस इनामें दिलीं. याप्रमाणें सर्व हकीम मुक्त झाल्यावर त्यांनीं सभा करून या हकीमाच्या अकलेची पुष्कळ स्तुति करून सर्वांनीं वर्गणी केली व संतोषानें त्यास एक लक्ष रुपये बक्षीस दिले. पुढें तो लौकरच स्वदेशास निघून गेला.

---

## गोष्ट १८.

एके संभावित स्त्रीचा उजवा हात आळस देतां देतां वरच्या वरतीच अडकून राहिला. पुष्कळ तेलें लावलीं, शेकले, पेंड बांधले, नाना उपाय केले, तरी गूण नाहीं. हात खालीं येईना. तेव्हां सर्वांची अक्कल अगदीं गुंग होऊन गेली. सर्व व्यवहार डाव्या हातानेंच होऊं लागले. तेव्हां तेथें एक नामांकित मुसलमान हकीम त्या गांवांत आला होता. त्यास बोलावून आणलें. त्यानें पाहून सांगितलें कीं, ही माझ्या बहिणी समान आहे. हिला एक ऊर्णावस्त्र उभें नेसावयास देऊन एकया खो

ांत नेऊन उभी करा व तिचा दुसरा हात वर करून हिसका मारला असतांही न तुटे अशा दोरीनें बांधून वा. आणि तेथें मला घेऊन चला. मी आंत आल्यावर तुह्मी सर्वजण एकेक कांहीं निमित्तानें सुमारें दहा ळें खोली बाहेर या ह्मणजे मी उपचार करतों असें ह्मणून सर्व तयारी करविली आणि आपण आंत गेला.

संकेताप्रमाणें सर्व खोलीबाहेर गेल्यावर हकीमानें ।टकन् उठून दरवाजास कडी घातली, आणि पुढें सरसावून एकदम निरी सोडण्याचा इरादा बोलून हातांत निरी धरली. इतक्यांत त्या स्त्रीनें एकदम परपुरुष आंगावर आला हें पाहून ती मोठ्यानें ओरडली, आणि चटकन् लज्जेनें हात खालीं आणला. असें झाल्यावर हकीम कडी उघडून बाहेर आला आणि ह्मणाला, झालें तुमचें काम? तेव्हां सर्वांनीं त्याच्या अकलेची वहावा केली, आणि त्यास खूष करून रवाना केलें.

---

## गोष्ट १९.

एके राजास सुमारें पन्नाशीच्या जवळ जवळ एक मुलगा झाला तो मुलगा जसजसा मोठा होत गेला तसतशी रूप, गुण, विद्वत्ता, व बल याविषयीं त्याची कीर्तिही वाढत गेली. आपणांस वृद्ध दशेंत असा सुपुत्र देवानें दिला ह्मणून तो स्त्रीसहवर्तमान आनंदानें ईश्वराचे फार आभार मानी. व प्रजाही आपणास धनी चांगला मिळाला ह्मणून आनंदांत असे.

या राजकुळांत अशी चाल होती कीं, वीस वर्षांचा मुलगा झाल्यावांचून त्याचें लग्न करावयाचें नाहीं. तेथपर्यंत मुलास तऱ्हेतऱ्हेच्या विद्या व कला शिकवावयाच्या, नाच, तमाशे वगैरे इतर प्रकारचे जे अप्रयोजक खेळ ते त्याच्या दृष्टीस पडूं द्यावयाचे नाहींत. तसेंच शृंगार, बीभत्स रस ज्यांत फारच आहेत अशीं नाटकाचीं अगर कादंबऱ्याचीं पुस्तकेंही त्याच्या हातीं लागूं द्यावयाचीं नाहींत. फार काय सांगावें! विषयी लोकांच्या विलासाच्या गोष्टीही त्याजजवळ न बोलण्याविषयीं त्याच्या मित्रांस ताकीद असे. बहुतकरून तसा योगच येत नसे. कारण, चोवीस तासांत नेमलेले गुरू अक्षयी पाळीप्रमाणें त्याचे जवळ असतच. याजवरून तो विशेष कांचांत होता असें वाटेल तर तसें नाहीं. कित्येक गुरू चमत्कारिक कल्पनेचे खेळ दाखवून चित्त रंजवीत, कित्येक फिरावयास नेऊन वनशोभा दाखवीत, कित्येक त्याजबरोबर मौजेनें शिकार करीत, व तत्संबंधी माहिती करून देत. यामुळें त्याचे त्यासही मी प्रतिबंधांत आहे असें वाटत नसे. या गुरूंचें मुख्य काम त्याचें चित्त बिघडूं देऊं नये इतकेंच असे. व त्यांचा तो हेतु सफळ असे. कारण चित्त बिघडण्याजोगे विषय अगर तसल्या मनुष्यांची संगतीच होऊं देत नसत.

अशा प्रकारें दिवस जात असतां त्यास एकुणिसावें वर्ष लागलें. हें वर्ष नाच, रंग, तमाशे, नाटकें, कथा, पुराणें, वगैरे दुनियेंतील सर्व चमत्कार पाहण्याकडे व थोडीशी स्वेच्छाचारी वर्तणूक करण्याकडे योजिलेलें होतें.

राजपुत्रास एकुणिसावें वर्ष लागतांच त्यास एक वर्ष

पर्यंत स्वेच्छेनें वागण्याची परवानगी मिळाली व चालीप्रमाणें त्यास सांगितलें कीं, या वर्षांत अमुक पर्यंत द्रव्य खर्चण्याची तुला मुखत्यारी आहे. याचा तूं पाहिजे तसा व्यय कर; परंतु या वर्षाच्या अंतीं राजकुलास योग्य किंवा अयोग्य तुझी वर्तणूक घडली याचा निर्णय ठरेल. नंतर योग्य ठरल्यास तुझें लग्न करूंन तूं राज्याचा मालक होशील हें मात्र लक्षांत असूं दे.

अशा प्रकारें राजपुत्र मोकळा झाल्यावर त्याचे समवयी मित्र आपल्यावर विशेष मेहेरबानी व्हावी ह्मणून त्यास मेजवान्या करूं लागले व नाच, तमाशे, नाटकें करून चित्तही रंजवूं लागले. राजपुत्र ही कार्याकार्य विचार करून राजकुलास योग्य अशीच वर्तणूक करीत असे. ज्याची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें त्याच्या घरीं जाऊन वागत असे. कोठें नुसतें पानसुपारी घेऊनच उठावें, कोठें घटकाभर बसावें, तसेंच कोणाच्या घरीं जावें न जावें याचाही विचार करीत असे. व गरिबाची कींव मनांत आणून त्यांच्या उपयोगीं पडणें, गुणी लोकांस उत्तेजन देणें, अनीतीनें वागणारांस बोध करणें व त्याजवर रागावणें आणि नीतीनें वागणारांशीं प्रेम ठेवणें नियमित द्रव्यांत होण्याजोगीं परोपकाराचीं कामें करणें इत्यादि त्याचे सद्गुणही लौकरच दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. हें पाहून राजा, गुरू व प्रजा यास अपरिमित आनंद होऊं लागला.

पुढें एके दिवशीं राजवाड्यांत एक्या प्रसिद्ध वक्त्या हरदासाचें कीर्त्तन झालें (आजदिन पर्यंत राजपुत्रानें कीर्तन ऐकलें नव्हतें) त्या दिवशीं हरदासानें प्रारंभीं एक

पद ह्मटलें व त्याच्या आधारानें असें प्रतिपादन करून दाखविलें कीं, संसार हा मृत्युलोकीं मोठा पाश आहे. सुज्ञलोक या पाशांत न सांपडतां ईश्वर भजनांत वगैरे काळ घालवून दोन्ही कुळांचा उद्धार करितात व सत्कीर्ति मिळवून स्वर्गींची अनुपम सुखें भोगतात. लग्नांत अंतरपट धरल्यावर ब्राह्मण सावधान सावधान असें मोठ मोठ्यानें ओरडून ह्मणतात याचें कारण हेंच कीं, ही स्त्रीरूपी बिडी पायांत पडते आहे अझून तरी सावध हो, परंतु अज्ञ जनाच्या मनांत तत्संबंधीं कांहींच विचार न येतां या स्त्रियास भुलून वुध्या, संसार समुद्रांत पडतात. मग अनेक दु:खांच्या एकावर एक लाटा येऊं लागल्या ह्मणजे त्रासून बाहेर निघण्याविषयीं प्रयत्न करितात. परंतु ही जबरदस्त बिडी पायांत असल्यामुळें निघतां येत नाहीं शेवटीं त्यांतच मरतात. अमोलिक मानवदेह प्राप्त झाला असून घडावें तें सार्थक घडत नाहीं. मोठमोठे विद्वान साधु होऊन गेले त्यांनीं केलेले असेच शेकडों बोध जागोजाग आढळतात कीं, श्लोक.

आयु:कल्लोललोलंकतिपयदिवसस्थायिनीयौवनश्री,
र्था:संकल्पकल्पाघनसमयतडिद्विभ्रमाभोगपूरा: ॥
कंठश्लेषोपगूढंतदपिचनचिरंयत्प्रियाभि:प्रणीतं,
ब्रह्मण्यासक्तचित्ताभवतभवभयांभोधिपारंतरंत: ॥ १ ॥

(भर्तृहरीकृत).

भावार्थ, आयुष्य पाण्याच्या लहरीप्रमाणें चंचल आहे; तसेंच तारुण्यही अक्षयी नाहीं, व विषय, जे मनांतील संकल्प, क्षणभंगुर भोगांचे समुदाय आहेत ते पर्जन्यकाळच्या विजेच्या लकेरीप्रमाणें आहेत; तसेंच स्त्रियांनीं

कंठाशीं घट्ट धरलेलें मंगळसूत्र किंवा आलिंगन, तेंही अक्षयी नाहीं. यास्तव परब्रह्माच्या ठायीं आसक्त चित्त व्हा; आणि संसार-रूपी जो भयाचा समुद्र त्यातें तरून पार जा. अशा प्रकारचे जागोजाग सत्पुरूषाचे बोध आढळतात. व त्यांनीं सर्व संग परित्याग केला व तेणेंकरून अमर कीर्ति हीच कोणी स्त्री मिळाली हें आपण पाहतों. परंतु काय आश्चर्य आहे कीं, पुन्हा ह्याच स्त्रियांना आपण भुलतों व संसारांत पडतों. एक्या कवीनें ह्मटलें आहे.

व्याघ्रीवतिष्ठतिजरापरितर्जयंती ॥
रोगाश्चशत्रवइवप्रहरंतिदेहं ॥
आयुःपरिस्त्रवतिभिनघटादिवांभो ॥
लोकस्तथाप्यहितमाचरतीविचित्रं ॥

(भर्तृहरीकृत.)

भावार्थ, जरा ही, वाघिणी सारखी उभी राहून भेडावते; रोग शत्रुप्रमाणें देहावर प्रहार करीत आहेत; फुटक्या घड्यांतील उदकाप्रमाणें आयुष्य स्त्रवून जात आहे, तरीही लोक अहितच आचरतात हें मोठें विचित्र आहे! पहा, जा कृत्याला ज्ञाते लोक इतकें विचित्र समजतात त्याविषयीं तारूण्यमदानें अंध झालेल्याच्या मनांत कांहीं तरी येतें काय? कांहीं नाहीं. हर हर!! हें तारूण्यच मोठें भयंकर आहे. स्त्रीविषयीं मोह उत्पन्न करून मुख्य कर्तव्यकर्माचा विसर पाडतें आणि दुर्लभ व अमोलिक असा हा मानवदेह प्राप्त झाला असून याचें सार्थक्य घडत नाहीं; जशी अमृतवल्ली दैवानें हातीं लागली असूनही अज्ञानी रोगी विषवल्ली ह्मणून टाकतो, तसेंच हें ह्मणून या वेळेस बिडी पायांत न पडूं देण्याविषयीं जपलें पाहिजे.

व इतक्याकरितां, हे जनहो, अझून तरी सावध व्हा अमोल काळ व देह व्यर्थ जातो याचा विचार करा आणि त्या दुष्ट तारूण्याच्या अगर विषयाच्या नादानें मदांध होऊं नका. देहाचें सार्थक करा व उभय कुळांचा उद्धार करून दिगंत कीर्ति मिळवा. असा बोध करून शेवटीं दृष्टांतार्थ एक गोष्ट सांगितली. तींतील भावार्थ असा कीं, एके राजाच्या मनांत हा विचार फार दिवस घोळत होता. तो वारंवार ह्मणे कीं, ह्या संसारांत कांहीं फळ नाहीं. मला राज्यपद आहे तरी यांत सुख आढळत नाहीं, मग गरिबांस काय असेल? माझ्या हातून शेंकडों खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे न्याय होतात. व अक्षयी ते मनाला डाचतात. आणि लोक ह्यांतच सुख आहे असें समजून तें मिळविण्याविषयीं झटतात. काय आश्चर्य हें? अस्तु, शेवटीं ह्याच विचारानें मनाचा दृढ निश्चय करून त्यानें सर्वसंगपरित्याग शेंकडों अडथळे मोडून केला, व दिगंत कीर्ति मिळविली. अशी गोष्ट सांगून कथा पुरी केली. नंतर सर्व आपआपल्या घरीं गेले.

इकडे राजपुत्रास असें वाटलें कीं, ह्या स्पष्टवक्त्या हरदासानें जो बोध केला तो अगदीं यथार्थ आहे. तो मनांत ह्मणाला, भवजलनीधींत न बुडण्याची वाट हीच खरी. बरें झालें, मला ईश्वरदयेनें लग्न होण्याच्या आधीं ही वाट कळली. नाहींतर मोठा पस्तावा झाला असता. आतां मी लग्न न केल्यामुळें आईबापास अंमळ वाईट वाटेल परंतु मी अशा सन्मार्गानें चालल्यामुळें दोन्ही कुळांचा उद्धार होऊन शेवटीं अक्षय्य सुख मिळेल व दिगंत कीर्ति होईल तेव्हां तर त्यास अतिशय आनंद होईल,

व पुत्र असावा तर असाच असावा असें ह्मणतील. असा विचार करून अंमळसा स्तब्ध बिछान्यावर पडला. इतक्यांत त्याच्या मनांत दुसरा विचार आला कीं, आपला लग्न न करण्याचा निश्चय सिद्धीस कसा जाईल? आईबाप तर अशा विषयीं कधीं संमत देणार नाहींत. ते बळेंच लग्न करतील. बरें पळून जावें तर तशी संधी सांपडणें दुर्घट! अक्षयी बरोबर मंडळी असतेच. ह्यांतून कसें पार पडावें हें सुचेना. तेणेंकरून ह्याचा अगदीं हिरमोड झाला. इतक्यांत ह्या संकटांतून पार पडण्याची त्यास विलक्षण युक्ति सुचली कीं, आपण पुरतें वेड्याचें सोंग घ्यावें. ह्मणजे अर्थातच माझें लग्न करण्याच्या भानगडींत कोणी पडणार नाहींत, व मुलगीही कोणी देणार नाहींत. ही युक्ति सुचतांच राजपुत्रास फार आनंद झाला व चित्त स्वस्थ झाल्यामुळें चांगली झोंप आली.

दुसरे दिवशीं सकाळीं उठल्यावर यानें वेडे वेडे चाळे करण्यास प्रारंभ केला. कोणास भ्यावें व पळून जावें, कोणाशीं चांगलें शुद्धींत बोलावें, मध्येंच एखादे वेळेस दचकून मोठ्यानें ओरडावें; विनाकारण हसतच सुटावें, किंवा स्तब्ध गुंगल्याप्रमाणें बसावें, मग तुह्मी कितीही हांका मारा. फक्त तोंडाकडे टकमका पहावयाचें मात्र. मग हूं ना चूं!!

अशा प्रकारचीं लक्षणें दृष्टीस पडतांच राजवाड्यांत एकच गर्दी होऊन गेली. मंत्री, पंचाक्षरी, वैद्य, जोशी, इ० सगळ्यांचे उपचार चालू झाले. कोणी पिशाच्चपीडा समजून आंगारे देतात, कोणी मंत्रें, औषधें, दानें वगैरे करवितात. तसेच साधु ह्मणविणारे आशिर्वाद देतात.

असे शेंकडों प्रयत्न चालले आहेत व इकडे त्याचे आईबाप दीनमुख होऊन रडत आहेत व जो कोणी येई त्यास मुलगा लौकर बरा करण्याविषयीं प्रार्थीत आहेत हें पाहून राजपुत्रास अतिशय आश्चर्य व दुःख वाटलें. व मनांत विचार घोळूं लागला कीं, काय लोक वेडे आहेत हे! आतां आपलें हें सोंग आहे असें व्यक्त करावें ह्मणजे ह्या सगळ्या ढोंगी लोकांची फजिती होईल. व आईबापास अप्रतिम आनंद होईल. नंतर आईबापास आपण सांगूं कीं, असल्या ढोंगी लोकांची खोड मोडण्याकरितां मी हें सोंग आणलें. हे लोक आपल्या राज्यांत फार माजले आहेत, व बहुत लोकांस ठकवितात. ह्यांजवर कोणी विश्वास ठेवूं नये. असें मनांत आणून आतां ढोंग व्यक्त करणार. इतक्यांत एक दुसरा विचार मनांत आला कीं, काल जो दृढ निश्चय केला तो इतक्याश्या स्वल्प सुखाकरितां मी मोहून सोडतों; हें बरोबर नाहीं. हेच मधील अडथळे खरे! यामुळें मी त्या महासुखास मात्र मुकेन. मी कधींही हा निश्चय सोडणार नाहीं. जग सर्व मिथ्या आहे. असें हरदासानें सांगितलें आहे व मला एवढें खोटेंपण आढळल्यानें मी जास्ती दृढ निश्चय करावा तों उलटा मोहांत पडतों!! छे! असें नाहीं करावयाचें. आतां आईबाप प्रस्तुत मी दुःखांत पाहतों. पण तें अक्षय्य सुख मिळाल्यावर यांस सुखांत पाहीन. खर्चेना द्रव्य! मला कशास हवें तें? एकंदरीला शेवटीं त्यांस अत्यानंद देईन. या मनोवृत्तीनें त्यानें आपला दृढ निश्चय केला, व आपला क्रम तसाच चालविला.

लांबून लांबून पुष्कळ द्रव्य खर्चून मोठमोठे इलमी

आणले, परंतु येथें कोणाचा इलाज चालेना. ह्मण आहे ना! “निजल्यास जागें करील पण जागल्यास जागें कोण करील?” त्याप्रमाणेंच हा प्रकार झाला. वैद्य लोक पाहतांच उन्मादवायु ह्मणून सांगत, पंचाक्षरी झपेट ह्मणत. जादुगीर करणी ह्मणत, या प्रत्येकाच्या सांगण्याप्रमाणें औषधें, बळी, अंगारे, सगळे उपचार चालू होते. शिवाय देवतार्चनें वगैरे चाललींच होतीं पण तिळमात्रही फायदा नाहीं. असें सतत तीन महिने झाले. तेव्हां आईबापही निराश झाले. व अक्षयी पुत्रशोकांत निमग्न असत. मंत्री वगैरे मंडळी नित्य समाधान करी कीं, थोडेका प्रयत्न चालविले आहेत? कधीं तरी कोणी खरा इलमी भेटेल व हा बरा होईल; काळजी करूं नका. मी जागोजाग चांगले वैद्य पाहण्याकरितां लोक पाठविले आहेत.

असें (समाधानाचें) बोलणें चाललें आहे, तों एकजण एक कर्नाटकी वैद्य घेऊन गांवांत आला व वर्दी पोंहोचविली कीं, सकल गदचिकित्सक सदानंदाचार्य धन्वंतरी यांची स्वारी आली आहे. हें ऐकतांच मंत्र्यानें त्यास राजवाड्यांत बोलावून आणलें व प्रकृति दाखविली.

या वैद्यानें प्रकृति पाहिल्यावर असें सांगितलें कीं, अशीच सतत तीन दिवस प्रकृति पाहीन नंतर उपचार चालू करण्याची गोष्ट. मंत्र्यानें सर्व ह्मणणें कबूल केलें व वैद्याच्या इच्छेप्रमाणें राजपुत्राच्या नजीकच्या दिवाणखान्यांत वैद्यबोवांच्या उतरण्याची तजवीज केली. वैद्यानें मननपूर्वक पाहिलें तों राजपुत्रास झोंप व भूक चांगली लागते, अन्न जातें, शक्ति क्षीण नाहीं, डोळे इतर वेड्या

सारखे चपळ नाहींत. परंतु असंबद्ध भाषण व चाळे हे मात्र वेड्यासारखे दिसत.

अशा प्रकारचें हें वेड पाहून वैद्य संशयानें गोंधळल्या सारखा झाला, व त्या रोग्याबरोबर कांहीं संभाषण करूं लागला; तों याचें विचारणें एक व त्याचें उत्तर एक अशी मजा होऊं लागली. तेव्हां वैद्य त्यास ह्मणाला, तूं असे वेडे वेडे चाळे करतोस, भलतेंच बोलतोस, तुला कोणी मारीत नाहींत? या प्रश्नाचें उत्तर त्यानें दिलें मी वेडा आहें, माझें कोण काय करणार आहे? मी कां चळे करतों? हें उत्तर ऐकतांच वैद्यास जास्ती संशय आला. कारण खरे वेडे जे असतात ते मी वेडा असें कधीं कबूल करीत नाहींत. उलटें त्यास कोणी वेडा असें ह्मटल्यास ते अतिशय रागावतात, आणि हा तर स्वतःच "मी वेडा आहें" "मी वेडा आहें" असें बोलण्यांत दर्शवितो हें आश्चर्य नव्हे काय? पुढें त्यास आणखी एक दोन प्रश्न विचारले. ते असे—तूं बरा कधीं होणार? उत्तर—"मेल्यावर" दुसरा प्रश्न. तुझें लग्न अजून कां झालें नाहीं? उत्तर—(हसत हसत) लग्न! लग्न! बायको माझी आई! मला वेड्याला कोण मुलगी देतो? याप्रमाणें प्रकार झाल्यावर वैद्य बाहेर आला, व त्याची पूर्ण खात्री झाली कीं, हें वेड्याचें सोंग आहे. नंतर ही गोष्ट न फोडतां राजास जाऊन सांगितलें कीं, तुमचा मुलगा खरोखर वेडा नाहीं; त्यानें हें ढोंग केलें आहे. हें ऐकतांच बापास फार आश्चर्य वाटलें, व आनंदही झाला. आणि आपल्या प्रधानास धांदलीनें हें वर्तमान कळविलें. तेव्हां प्रधान वैद्याजवळ येऊन ह्मणतो, याला असें ढोंग कर-

ण्याचें कारण काय? वेड घेऊन काय साधावयाचें होतें? तो मुखत्यार आहे, हें सर्व राज्य त्याचेच जिवाकरितां आहे. आज तीन महिने नऊ दिवस झाले. सतत त्याचे जवळ उपचार करीत आहों, परंतु त्याच्या प्रकृतींत तिळमात्रही बदल नाहीं. ढोंग असतें तर कांहींच बदल नजरेस येताना? व कधींच का तें ओळखूं आलें नसतें? वैद्यबोवा हाच तो राजपुत्र. आम्ही तुमची परिक्षा पाहण्याकरितां पहिल्यानें खोटा ढोंगी तुम्हास दाखविला असें तुमच्या मनांत आलें असेल. परंतु तसें कांहीं नाहीं.

हें ऐकून वैद्य म्हणतो, मी पूर्ण परिक्षा केली आहे, व हें खचित ढोंग आहे. पाहिजे आसल्यास तुम्हास प्रचीती दाखवितों, नंतर प्रधान चिप्प बसला व प्रचीत पाहाण्याचें ठरलें. वैद्यानें संकेत ठरविला कीं, मी तेथें उद्या सकाळीं पहिल्यानें जाऊन बसतों, नंतर आपण यावें, व मला मोठ्या लीनतेनें विचारावें कीं, हें काय आहे व कधीं जाईल? नंतर मी सांगेन कीं, बहुतकरून हा रोग मी जाणला. पण त्याची एक खूण तुम्हांस विचारतों कीं, हा या रोगानें पीडित झाल्यापासून तीन महिने व दहाव्या दिवशीं दुपारीं यानें सतत चार घटका हसावें असें आहे, त्याप्रमाणें हा जर हसला असला तर रोग खरा आहे व मोठा भयंकर आहे. यास मुजरत गुण करणारें औषध नाहीं. व उपचारही तीव्र करूं नये. कोठें सरबतें, मोरांवळा, पाक, अवलेह वगैरे देत असावें. शमला तर शमला. आणि जर त्या दिवशीं हसला नसला तर हें ढोंग आहे. नंतर तुम्ही आपली स्मरणवही काढून पहा. व मोठें दुःखी झाल्या सारखे होऊन म्ह-

णा कीं, अझून तितके दिवस भरले नाहींत. आजचा द-हावा दिवस आहे. नंतर मी बोलेन ठीक आहे. आज दुपारीं याचा निर्णय ठरेल. मग तुम्ही विशेष चिंतेंत पडल्या सारखा आव आणा आणि म्हणा कीं, ठरावयाचें तें काय? ढोंग असतें तर कधींच ओळखूं आलें असतें. तें असो पण याला ढोंग करून करावयाचें तें काय? वैद्यराज आपण म्हणतां तोच भयंकर दुःसाध्य व्याधि यास झाला यांत संशय नाहीं. मग मी म्हणेन तोच व्याधि असला तर ही परिक्षा कधीं खोटी होणार नाहीं. इतके दिवस गेले तसा आणखी आजचा दिवस. चला उठा, माझी स्नानाची वेळ झाली आतां दुपारीं पाहूं.

असें मी बोलल्यावर सर्वजण उठून बाहेर येऊं. जर ढोंग असलें तर लोकांनी हें ढोंग नाहीं असें म्हणावें म्हणून आज दुपारीं हा मुद्दाम हसेल. ह्मणजे तर तुमची खात्री होईल कीं नाहीं?

प्रधानानें ही चांगली युक्ती आहे असें बोलून दाखविलें, व तसें करण्याचें ठरवून दुसरे दिवशीं संकेताप्रमाणे केलें, व राजपुत्रही सोंगाच्या दृढीकरणार्थ दुपारीं पुष्कळच हसला. तेणेंकरून आईबापाची व प्रधानाची पक्की खात्री झाली कीं, हें ढोंग आहे.

त्या दिवशीं राजपुत्रास लौकरच झोंप लागली. तेव्हां वैद्य म्हणतो खरे वेडे जे असतात त्यांनीं कितीही वेडे चाळे केले तरी ते दमत नाहींत. ढोंगी दमतो. राजपुत्रास आपलें वेड खरें भासविणें होतें. म्हणून त्यानें आपली दुपारची झोंप मोडून हे चाळे करून दाखविले, व आतां त्या श्रमामुळें त्यास रोजच्यापेक्षां लौकरच झोंप स्वस्थ ला-

गली आहे. कां झाली खात्री ? खरें ना आम्ही सांगितलें तें ? प्रधान म्हणाला, खरें बोवा ! वैद्यराज ! आतां हें ढोंग हा कोणत्या उपायानें सोडील याची माझ्या मनांत बिलकूल कल्पना येत नाहीं. वैद्य म्हणाला, त्याविषयीं तुम्ही निःकाळजी असा. मला एक महिन्याची मुदत द्या म्हणजे मी बरा करतों. युक्तीनें त्याचें ढोंग करण्याचें कारण व्यक्त करवून तें कारण दूर केलें पाहिजे म्हणजे रोग नाहींसा झाला.

प्रधान व आईबाप एकदम आश्चर्य होऊन ह्मणतात, याजवर काय असा प्रसंग आला होता कीं, तो या सोंगावाचून जाणार नाहीं; विनाकारण आज तीन चार महिने घोळांत घातलें. चमत्कार आहे बोवा एकेक ! ! वैद्यबोवा आजपासून आपण यत्न करा व इतकें यश द्या ह्मणजे आह्मांस नवा पुत्र दिल्या सारखा होईल. वैद्य ह्मणाला ठीक आहे. काळजी करूं नका, मी यास ताब्यावर आणतों परंतु तुह्मी हें खोटें वेड आहे असें बाहेर फोडूं नका. व त्याचे समक्ष मला लौकर नीट करण्याविषयीं विनवीत जा असें सांगून ठेविलें व वैद्य उद्योगास लागला.

प्रथमतः दुसरे दिवशीं सकाळीं सोन्याच्या वाटींत एक उत्कृष्ट सरबत घालून एकटाच राजपुत्राजवळ आला, आणि तें औषध ह्मणून दिलें राजपुत्रानें वेड्याप्रमाणें तें पोटास लावलें व डोक्यावर ओतून घेतलें आणि मोठ्यानें "हर हर गंगाबाई ! भागिरथी" असें ओरडला. तेव्हां वैद्यानें जवळ कोणी दुसरें नाहीं असें पाहून त्याची स्तुति केली व ह्मणाला, शाबास! राजपुत्रा शाबास! तुझ्या

अकलेची व धूर्तपणाची शिकस्त आहे. तूं हें असें सोंग केलेंस ह्मणूनच तसल्या संकटांतून पार पडलास. प्रसंगीं अशी युक्ती सुचणें कठीण! तूं महा दैववान् ह्मणूनच तुला सुचली. येणेंकरून मला फार आनंद झाला. मी या तुझ्या कामास होईल तितकी मदत करीन. हें तुझें स्वरूप मी केव्हांच समजलों, परंतु विचार करून पाहतां तूं हें फार चांगलें केलेंस अशी माझी खात्री झाली. आलीकडे तुझें हें वेडेपण खोटें आहे असें पुष्कळांस वाटूं लागलें होतें, व ह्मणूनच मी काल तसें करविलें. जेव्हां तूं काल पुष्कळ हसलास तेव्हां त्यांची खात्री झाली कीं, वेड खरें आहे. मी त्यास सांगून ठेविलें आहे कीं, हा रोग अमुकच दिवसांत नीट होईल असें सांगवत नाहीं. तरीही त्यांनीं मला उपचार करण्याविषयीं परवानगी दिली. आतां तूं मात्र मजपाशीं पडदा राखूं नको. मला ईश्वरानें तुझ्या साह्यार्थ पाठविलें, असें समज व मी सांगेन तसें करीत जा ह्मणजे हें खोटें वेड असें कोणास समजणार नाहीं व मनांतील हेतु सिद्धीस जाईल.

राजपुत्रास असा वैद्य आज पर्यंत भेटला नव्हता. तो हें ढोंग आहे असें ऐकतांच चपापला, परंतु असला काल्पनिक मनुष्य राजाच्या देणगीस व लौकिकास न भुलून आपणांस साह्य करितो. जर हा आपलें ढोंग उघड करता, तर आज केवढी फजिती झाली असती!! वगैरे गोष्टी मनांत आल्यावर त्यास असें वाटलें कीं, ईश्वरानें माझा दृढ निश्चय पाहूनच वैद्यास अशी बुद्धि दिली. आतां तो पहाऱ्यावर असला म्हणजे मला विशेष सांवधगिरीनें वागावयास नको. असा विचार करून त्याच्या

मताप्रमाणें वागूं लागला. पुढें वैद्यानें युक्तिनें त्याच्या ढों-गाचें कारण काढून घेतलें, व बोलूं लागला, राजा, हा ईश्वरी अंश आहे. महत्पुण्या वाचून राजपद मिळावयाचें नाहीं. त्याच्या आंगीं दुष्टांचें पारिपत्य व सज्जनांचा उत्क-र्ष करण्याचें सामर्थ्य ईश्वरानें ठेविलें आहे. हजारों लो-कांस दुःखांतून काढून सुखांत घालण्याचें राजाचें स्वा-धीन असतें. शेंकडों लोक तें पद प्राप्त करून घेण्यावि-षयीं उद्योग करितात. पहा बरें, आमच्या सारख्यांनीं मनांत आणलें कीं, अमुक ठिकाणीं यात्रेकऱ्यास चोर लु-टतात तें बंद करावें, किंवा त्यांचें पारिपत्य करावें, तर कांहीं उपयोग आहे? तुम्ही सहज कराल. मग हें यात्रे-कऱ्यांची वाट मोकळी केली व त्यामुळें हजारों लोकांस यात्रा घडली हें महत्पुण्य कोणास मिळणार? अशीं शेंकडों कामें सहज तुमच्या हातून होणारीं आहेत. अ-नाथ, दीन प्रजेचें पुत्राप्रमाणें पालन करणें व त्यांजवर आलेले दुःखाचे प्रसंग टाळणें हें काय थोडें पुण्य आ-हे? येणेंकरून तुमचें कल्याण इच्छिणारे हजारो लोक देवापाशीं प्रार्थना करतील, व त्या योगानें तुमचे मनो-रथ पूर्ण होतील. प्रस्तुत तुझी वृद्ध मातापितरें किती अ-निवार दुःखांत आहेत. प्रजा किती संकटांत आहे? अरेरे!! रोमांच उभे राहतात. पहा तुझ्या ह्या अल्प समजुतीनें अगणित लोक दुःखसमुद्रांत बुडत आहेत त्यांस तार. हा दुष्ट दुःखद निश्चय सोड, व राजपद स्वीकारून प्रजेस व आईबापास आनंद दे; आतां हें ढोंग केलें होतें असें व्यक्त करूं नये. बरा झाल्याची बातमी पुकारावी म्हणजे झालें. ह्या बंदींतून मोकळा होशील.

सर्वांस आनंद होईल व तुझें कल्याण होईल. राजपुत्रासही हें बोलणें खरें वाटलें व त्यानें आपला निश्चय सोडून राजपद स्वीकारलें, सर्वांस आनंद झाला. लग्न केलें, व आनंदानें प्रजापालनादि यथान्याय कर्मे करूं लागला तेणेंकरून याची दिगंत कीर्ति झाली. तो वारंवार वैद्याचे आभार मानी कीं, तुम्ही आलां म्हणून हा दिवस आला. नाहींतर मी त्या वेड्या समजुतीनें तसल्या बंदींतच हाल हाल होऊन मेलों असतों, किंवा कोणी ढोंग ओळखलें असतें तर फजिती झाली असती.

इकडे राजपुत्राच्या आईबापांसही अतिशय आनंद झाला. ते वारंवार वैद्यास ह्मणत, पुत्रदान केल्याचें पुण्य तुह्मांस असो. अशा प्रकारें सर्वांस आनंद देणारा जो हा वैद्य यासही राजपुत्र, त्याची माता व पिता तसाच प्रधान यांनीं स्तुति, मान, द्रव्य अधिकार वगैरे देऊन आनंद दिला. याप्रमाणें केवळ युक्तीनें जिकडे तिकडे आनंदच आनंद झाला.

---

## गोष्ट २०.

पुणें एथें एके अतिशय श्रीमंत गृहस्थाच्या बायकोनें संध्याकाळीं डागिण्यांचा डबा सर्व डागिणे आंत घालून आपल्या पेटींत ठेविला. दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं डागिणे काढण्याकरितां पेटी उघडून पाहते तों आंत डबा नाहीं. तेव्हां लागलींच चपापली, आणि आपल्या नवऱ्यास हें वर्तमान कळविलें. नवऱ्यानें चौकशी करून

पाहिलें तों बाहेरच्या चोरास आंत येण्यास वाट नाहीं, रात्रीं कोणी बाहेर गेलें नाहीं, व दारावरील पाहरेकरी अहोरात्र जागे होते. असें कळलें तेव्हां पूर्ण निश्चय ठरला कीं, ही चोरी घरांतल्या घरांत झाली. नंतर निजल्या ठिकाणाहून रात्रीं कोण कोण उठले होते वगैरे चौकशी केली तों, बारकाईच्या शोधाअंतीं पक्कें असें ठरलें कीं, हें काम सदाशिव शास्त्री यानेंच केलें असावें. ते रात्रीस उठले होते. व ह्या पेटीच्या खोलींतून बाहेर पडतांना एकानें पाहिलें होतें. शास्त्री यांस विचारतां "स्वाभाविक झोंपेंत गेलों असेन" असें ह्मणत (हा ब्राह्मण झोंपेंत उठून जात असे) त्यामुळें त्यास कांहीं बोलतां येईना. शिवाय हा विद्वान्, उतारवयाचा, पोक्त असा होता. तेव्हां उघडपणें त्याचा वहीम आहे, असें ह्मणण्यासही पंचाईत पडूं लागली. मग घरधन्यानें सर्व घरांतील मंडळी एकत्र जमवून सांगितलें कीं, ही चोरी कोणी बाहेरच्या मनुष्यानें केली नाहीं हें उघड आहे. आपल्यांतच कोणी केली. आतां उगीच हाल अप्रतिष्ठा झाल्यावर कबूल व्हावें त्यापेक्षां आजच्या दिवसाची मुदत देतों. रात्रींच्या रात्रींत घरांत आणून टाकावी, नाहींतर उद्या सरकार दरबार केल्यावर पंचाईत पडेल. असें बोलून आज डागिणे आणून टाकिले नाहींत तर त्यास जरीमरी येवो, त्याचा नाश उद्याच्या दिवसांत होवो असें चेडोबा, काळकाई वगैरे देवांस नवस केले. परंतु मुदतीप्रमाणें डागिणे आले नाहींत. व पुढें काय करावें हेंही सुचेना. दुसऱ्या दोन चार कारणांवरून त्याचा वहीम पक्का ठरला. पण उघड रीतीनें त्याचें नांव घेववेना पं-

चाक्षरी पाहिले, सरकारांत कळवून चौकशी करविली, परंतु पत्ता लागेना. शेवटीं निराश झाले. इतक्यांत त्याचाच आश्रित एक वैद्य आपल्या गांवीं गेला होता, तो परत आला. त्यास ही सर्व हकीकत कळविल्यावर तो ह्मणाला, मला एक चोरी पकडण्याची युक्ति सुचली आहे. आज्ञा होईल तर सांगतों. यजमान लागलेंच सांग असें ह्मणाले. तेव्हां यानें सांगितलें कीं, मजबरोबर तो कपाळीं शेंदूर लावलेला वाणकोटी आहे त्यास मी शिकवितों. व खोटेंच वारें त्याज जवळून आंगांत आणवून असें बोलवितों कीं जर चोरी आजच्या आज घरांत येऊन नपडली तर माझा देव हगवण लावून त्यास ठार मारील. इतक्यांत यजमान ह्मणतो, अशी भीती घातली होती, पण तो थेरडा शास्त्री या भीतीस कोठें जुमानतो, हें ऐकून वैद्य ह्मणाला, तुमचा वहीम तर पक्का आहेना? तेव्हां यजमानानें सांगितलें, वहीम तर काय? पण खात्रीनें सांगतों कीं, ही गोष्ट त्याजवांचून झाली नाहीं. वैद्य ह्मणतो तर मग इतक्यानेंच स्तब्ध बसावयाचें नाहीं. हें रेचाचें औषध जेवतांना नकळत त्यास घालावयाचें व रेच होऊं लागले ह्मणजे एक दोन ढाळ होई तों स्वाभाविक आहे असें समजेल व जास्तीच होऊं लागले ह्मणजे ही सकाळची भीती आहेच. आपोआप या शंकेनें घाबरेल. गाळण झाली ह्मणजे पटकन् तो वाणकोटी त्याचा हात धरून ह्मणेल. बाह्मना बोल नाहींतर फुका मरशील. ह्मणजे मग लेंडी करते काय? घेतलेंच असेल तर झटकन् त्याचे पाय धरून गुपचुप कबूल होईल. व त्यास सांगेल कीं, बोभाटा करू नको; मी डागिणे आणून देतों. मला जीवदान

दे. हो! जिवापेक्षां दुसरी काय प्यारी वस्तु आहे? आपण वाणकोल्यास सांगून ठेऊं कीं, तो कबूल होण्याचा रंग दिसला तर बोभाटा करणार नाहीं असें त्यास वचन दे. कां? कशी युक्ती आहे? मुकाम्यानें याचेच मार्फत डागिणे आले, ह्मणजे उतारे करूं. हें ऐकतांच यजमानासही वाटू लागलें कीं युक्ति खरी आहे. पूर्वींच केली असती ह्मणजे बरें झालें असतें. बरें असो; उद्यां करूं. असा संकेत ठरविला व दुसरे दिवशीं तशी युक्ती केली; करतांच डागिणे आले. तेव्हां सर्वांस आनंद झाला. नंतर वैद्याच्या अकलेची तारीफ केली; व त्यास देणगी देऊन संतुष्ट केलें आणि सदाशिव शास्त्री यास घरांतून घालवून दिलें.

---

## गोष्ट २१.

निजामपूर येथें एके सावकारास वृद्धपणीं एक मुलगा झाला, तेव्हां त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें द्रव्य खर्चून बराच उत्साह प्रदर्शित केला. हा मुलगा सर्वांचा लाडका असे. यास खेळवण्याकरितां मुद्दाम माणसें ठेविलीं होतीं. हा मुलगा सात आठ वर्षांचा झाला तरी बोलत नसे. आपण कांहीं बोललों तर तो हंसे, व त्याचें उत्तर तो खुणेनें किंवा मुखानें चमत्कारिक ध्वनि काढून देई. यास दुसऱ्याचें बोलणें चांगलें समजत असे. आपल्या मुलाच्या आंगीं ही गोम आहे हें पाहून आईबापास फार दुःख होई. त्यांस वाटे कीं, ह्मातारपणीं एकुलता एक मुलगा देवानें दिला. तो कां बोलका नसावा?

तसा असता ह्मणजे त्याचे ते अल्प समजुतीचे प्रश्न व लडिवाळपणाचें भाषण हें ऐकून आह्मास किती आनंद झाला असता!! परंतु येथें कांहींच इलाज नाहीं. कारण ही उपजत खोड. असें समजून बाप निरंतर दुःखी असे.

हें गरिबशा एके परस्थ वैद्यानें पाहिलें, व पूर्ण मनन करून विचार ठरविला कीं, हा बोलेल. कारण बोलण्यास जीं जीं साधनें आवश्य असावीं तीं तीं सर्व अनुकूल आहेत, स्पष्ट ऐकूं येतें, जीभ असावी तशी आहे, पडजीभ ही वावगी नाहीं, व दुसऱ्याच्या भाषणाचें चांगलें परिज्ञानही आहे. असें असून हा बोलत नाहीं तर यास बोलण्याचें विशेष आगत्य पाडलें पाहिजे ह्मणजे हा बोलेल. अशी कल्पना मनांत येऊन त्यानें एक युक्ति योजिली, परंतु या बडे ठिकाणीं याची दाद कशी लागते? आपली दाद लागणार नाहीं असा विचार करून परत गेला आणि भाड्यानें शालजोडी वगैरे उंचा पोषाक करून श्रीमंती थाटानें तेथें आला. त्याचा मान, सन्मान, कोण कोठील वगैरे कुशल प्रश्न झाल्यावर तेथें जवळच तो मुलगा बसला होता. त्याकडे पाहून विचारलें, हा बोलत नाहीं याचें कारण काय? तेव्हां बापानें इत्थंभूत हकीकत कळविली. वैद्य ह्मणाला, यास कांहीं उपचार केले होते काय? सावकारानें सांगितलें. उपजत खोडीस औषध करणारा मला कोणी भेटला नाहीं. आपण करीत असाल तर करा. मी आपले उपकार जन्मभर विसरणार नाहीं. वैद्य ह्मणाला, ठीक आहे. असें बोलणें झाल्यावर तेथें मुक्काम करण्याचा निश्चय ठरवून कांहीं औषध सुरू केलें. पुढें एके दिवशीं त्याच्या बापास बरोबर घेऊन एके बागेत

फिरावयास गेले. मुलगा बरोबर होताच; त्यास एका कामाच्या नादीं लावून त्याच्या बापास सुचविलें कीं, मी आतां अमुक तऱ्हेचा उपचार करणार. तुह्मी लांब त्या झाडाखालीं जाऊन बसा, भिऊं नका. असें सांगितलें नंतर बाप बराच लांब गेला, असें पाहून एकदम त्या मुलास उचललें व विहिरीच्या कांठावर नेऊन आंत ढकलण्याचा आव आणला. तेव्हां बापास हाक मारल्या वांचून दुसरा इलाज नाहीं. असें समजून भयचकित मुद्रेनें तो मुलगा "बाबा, धांवाहो धांवा; मला लोटलें" असें ओरडला. इतक्यांत वैद्य त्यास तसाच कांठावर ठेवून पळाला. व एक्या झाडा आड उभा राहिला. नंतर संकेताप्रमाणें बाप धांवत आला, व विचारलें, अरे ओरडलास कां? वैद्य कोठें आहे? तेव्हां त्या आवेशांत मुलानें कांहीं तुटक तुटक शब्द बोलून व खुणा करून सगळी हकीकत कळविली. तेव्हां पासून त्यास बोलण्याचें नेट सांधलें; व तो थोड-

---

१ माझा सोळा सत्रा वर्षांचा भाऊ परशुराम तापांत अतिशय घाम सुटल्यामुळें गार पडून बेसावध झाला; पुढें उपचारानें सावध झाल्यावर त्यास बोलतां मात्र येईना. तो नेट करून जें बोलें तें बिलकूल समजेना. वेखंड, अकळकरा इत्यादि औषधांचीं चाटणें केलीं, दोन तीन दिवस झाले तरी फरक मिळून पडेना. तेव्हां आह्मी त्याच्या स्नेह्यास बोलावून आणून अशी बनावणी करविली कीं, तुझी परिक्षा पास झाली. आतां पेढे दिले पाहिजेत (ता० माहे च्या अरुणोदयांत कांहीं परीक्षेस जाणाऱ्या कल्याणकर विद्यार्थ्यांचीं नांवें घालून कांहीं मजकूर छापला होता त्याजवरून व कांहीं दुसऱ्या कारणावरून हा परीक्षा उतरण्याविषयीं निराश होता) असें असून ही आनंददायक बातमी ऐकताच त्यास हर्ष अतिशय झाला, व त्या भरांत मोठ्या आवेशानें "पेढे ह्मणजे बिशाद काय? देईन" असें स्पष्ट बोलला. तेव्हां पासून त्यास बोलण्याचें नेट साधलें. व आठ चार दिवसांनीं तो पूर्ववत् बोलूं लागला तात्पर्य बोलण्यास अवश्य जीं साधनें तो अनुकूल असून ज्या क्षुल्लक

थोडें बोलूं लागला. असेंच बोलतां बोलतां कांहीं दिवसांनीं स्पष्ट बोलूं लागला. तेव्हां सावकारानें वैद्याचे आभार मानून त्यास उत्तम देणगी देऊन संतुष्ट केलें.

---

## गोष्ट २२.

वाई येथें कृष्णा शास्त्री पाध्ये ह्मणून एक कर्मठ ब्राह्मण राहात असे. त्यास एके दिवशीं दुपारीं उचकी लागली; दोन तीन दिवस झाले पुष्कळ प्रकारचीं चाटणें वगैरे केलीं, परंतु उचकीचा वेग राहीना. इतक्यांत एक त्यांचा विद्यार्थी बडोद्यास गेला होता तो परत आला; व पाहतो तों संध्याकाळची वेळ, घरांत मंडळीची एकच गर्दी होऊन गेली आहे. गुरुजीस उचकीमुळें एक शब्द ही बोलवत नाहीं, असें दृष्टीस पडलें. तेव्हां कोणाशीं न बोलतां तिसऱ्या मजल्यावर ( माळ्यावर ) जाऊन तेथें शेगडींत थोडासा साल्पा पेटवून ठेविला. आणि एकदम खालीं दडदड धांवत येऊन घाबरल्या सारख्या स्वरानें मोठ्यानें ओरडला कीं, अहो पहातां काय? धांवा धांवा माडीवर आग लागली! हें ऐकतांच सगळी मंडळी व गुरुजी मोठ्या लगबगीनें उठून माडीवर गेले; व पाहतात तों आग नाहीं. शिष्यानें सांगितलें, अहो वर माळ्यावर! तेव्हां मंडळी वर गेली व पाहतात तों खराच साल्पा पेटलेला

---

कारणानें बोलण्यास प्रतिबंध असतो, तीं कारणें असलेल्या उपायानें दूर होतात.

बाळकृष्ण दिनकर वैद्य.
ग्रंथकर्ता.

आहे. पुढें ती विझवली व घरांत चौकशी करूं लागले कीं, हा उद्योग केला कोणी? माळ्यावर शेगडी गेली कशी? याचा कांहींच पत्ता लागेना! सर्वजण आश्चर्यांत पडले. अस्तु. बरें चला, लौकर समजलें ह्मणून बरें झालें! नाहींतर मोठा अनर्थ झाला असता! वगैरे भाषणें मंडळी बोलूं लागलीं. हा गोंधळ सुमारें घटकाभर चालला होता. शिष्यानें पाहिलें कीं, उचकीचा वेग पुरता शमला. नंतर पुढें होऊन सांगितलें कीं, हा उद्योग मी केला. बडोद्यास एके राजवैद्यानें अशाच प्रकारचें विस्मयाचें दुसरें एक कृत्य करून एके श्रीमंत गृहस्थाची उचकी बसविली होती, व त्यावेळेस त्यानें असें करण्यास आधारभूत अशीं निरनिराळ्या ग्रंथांतील अनेक वचनें ह्मणून दाखविलीं होतीं त्यापैकीं हें एक माझ्या ध्यानांत आहे.

( गीती. निघंट रत्नाकर ग्रंथांतली. )

**प्राणावरोधतर्जन, विस्मापनशतिवारिपरिषेकैः।**
**चित्रैःकथाप्रसंगैः, शमयेद्धिक्कांमतोभिघातैश्च॥**

( प्राचीन कविकृत. )

भावार्थ,—श्वास कोंडणें, भिवविणें किंवा आश्चर्यकारक कृत्य करणें, थंड पाणी आंगावर शिंपणें, किंवा चमत्कारिक गोष्टी सांगणें, अथवा मन खट्टू करणें इत्यादि उपचारानें उचकी शमेल.

हें भाषण ऐकल्यावर सर्व मंडळीस या उपचाराचें आश्चर्य

---

१ कल्याण येथें भाऊ बापट वैद्य होते. ते असेच या विकारानें बेजार झाले असतां मंडळीनें पोलिसाकडून भेवडावलें व त्यामुळें त्यांची उचकी शमली.

वाटलें, व चांगली समय सूचकता शिष्यानें केली ह्मणून त्याची फार वाहवा केली. व सर्वांस आनंद झाला.

---

## गोष्ट २३.

एके गृहस्थास संताप अतिशय झाल्यामुळें तो भ्रमिष्टा सारखा झाला. त्यास वैद्यानें उपचार सांगितला की, याचे मस्तकास तेल किंवा तूप रोज माखीत जा ह्मणजे आराम पडेल. तेव्हां घरच्या मनुष्यांनीं दोन चार दिवस तूप लावण्याचा उपचार केला, परंतु तो विकार कमी न होता उलटा जास्ती वाढूं लागला. कारण, ह्यास तूप लावूं लागलें ह्मणजे मोठ मोठ्यानें ओरडें, लावणारास मारी, व त्यांस लावण्याचा प्रतिबंध करी; परंतु गुण येण्याच्या आशेनें हे त्यास दोघे चौघे मिळून धरून बळेंच तूप लावीत, त्यामुळें तो त्रासे व त्याचा संताप जास्ती वाढे. याप्रमाणें ज्या दिवशीं मस्तकास तूप लावावें त्या दिवशीं यास झोंप येऊं नये व मस्तक अधीकच भणभणूं लागावें. असें होऊं लागलें तेव्हां त्याच्या आईनें वैद्याच्या घरीं येऊन सांगितलें कीं, आपल्या उपचारानें मस्तक जास्ती भणभणतें व निद्रा तर मुळींच येत नाहीं.

तेव्हां वैद्याच्या घरीं पुष्कळ मंडळी बसली होती, त्यांस तो ह्मणाला, बरें झालें! त्या तुपांत किंवा तेलांत कांहीं औषध मिश्र करावयास सांगितलें नव्हतें. नाहींतर हा विकार अधिक वाढल्याचें अपयश त्याजवर आलें असतें. काय हो? तूप मस्तकास लावल्यानें हा विकार वा-

ढेल काय? मंडळी ह्मणाली, छे भलतेंच!! असें उलटें कसें होईल? तेव्हां वैद्य ह्मणतो, बाई या उपचारानें कधीं जास्ती होणार नाहीं. अजून त्या विकाराचा जोर आहे, सबब तोच स्वतः वाढत आहे; तूप लावणें चालू आहे ह्मणून फार वाढला नाहीं, नाहींतर कधींच बेफाम तब्बेत होऊन गेली असती तुह्मी बिनधास्त हा उपचार करा. हें ऐकून बिचारी बाई घरीं आली व तोच उपचार चालू ठेविला पण तिळमात्रही फायदा झाला नाहीं.

नंतर एके दिवशी एक वैद्य पाहुणा आला त्यानें हा उपचार करतांना संध्याकाळीं पाहिलें तों रोगी मोठ्यानें ओरडतो आहे व मला औषधी उपचार करूं नका असें ह्मणतो आहे. आणि लोकांनीं तर त्यास बळेंच धरून मर्दनाचा सपाटा चालविला आहे व तेणेंकरून ह्याचा संताप अतिशय वाढत आहे. असें नजरेस आलें. कांहीं वेळ असा उपचार झाल्यावर हा संतापानें लाल होऊन बिछान्यावर फांफूं करीत पडला, व मनुष्यें आपआपल्या उद्योगास लागलीं.

वैद्यानें हें सर्व पाहून त्याच्या आईस विचारलें. ह्या उपचारापासून कांहीं हित आहे कां? तेव्हां ती ह्मणाली, कांहीं नाहीं; पण वैद्यानें हाच उपचार चालू ठेवण्यास सांगितलें आहे. नंतर ह्यानें सांगितलें, आठचार दिवस मी सांगेन तसें औषध चालवा ह्मणजे पहा गुण येतो कीं नाहीं!! हा साफ बरा होईल याची बिलकूल काळजी करावयास नको.

आईनें त्याचें ह्मणणें कबूल केलें. व दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहुण्यानें त्या बाईस सांगितलें, त्या वैद्याचा उप-

चार बरोबर आहे, परंतु तो बळजबरीनें करावा लागतो व त्यामुळें संताप वाढतो. आणि गुण येत नाहीं. इतक्याकरितां आज दुपारीं मी आंगांत देव आल्याचें सोंग करून सांगेन त्याप्रमाणें करा. असें सुचविलें. व रोग्यास सांगितलें कीं, तुह्मी इतके दिवस उपचार करतां पण गुण येत नाहीं याचें कारण काय? पिशाचबाधा नाहींना? असली तर उलटा जास्ती विकार व्हावयाचा. रोगी ह्मणाला, हो तोच. नुसतें औषधास्तव तूप लावतात पण तितक्यानेंच त्या दिवशीं माथें अधिक कलकलून झोंप येत नाहींशी होते. वैद्य ह्मणाला, बरें आज दुपारीं पाहूं काय आहे तें!

इतकें परस्परांचें भाषण झाल्यावर दुपारीं भोजनोत्तर स्नान करून शेंडी मोकळी सोडून कपाळीं शेंदराचा मळवट भरून देव आंगांत आणल्याचा पुरा आव आणला. आणि ह्मणाला, हें अमुक पिशाच आहे. आमक्या दिवशीं यास पछाडलें. त्यास पिशाचाची समजुत करणें टाकून तुह्मी औषधी उपचार करतां? खबरदार रहा जर कोणी अतःपर त्यास औषध करील तर करणारा सुद्धां त्यांस भयंकर रोग होऊन हालहाल होऊन मरेल. हें दराऱ्याचें भाषण ऐकतांच संकेताप्रमाणें सर्वांनीं भ्यायल्या सारखें दर्शवून त्याची स्तुति केली आणि ह्मणालें, आह्मी तुझीं अज्ञान बालकें आहों. आमचे अपराध पोटांत घाल. व या संकटांतून पार पडण्याचा उपाय सांग. आह्मी तुला शरण आहों.

अशा प्रकारचें भाषण देवानें ऐकिल्यावर सांगितलें, गांवा बाहेर जो लांब मारुती आहे, त्यास एकविस दिवस पावेतों रोज [illegible]-याकाळीं रोग्यानें अर्धा शेर तूप किंवा तेल उघड्या माथ्यावर नेऊन घातलें पाहिजे, तेथें त्याचा

निराळा दिवा लावून ठेवावा, तो जळे पर्यंत यास आंघोळ घालूं नये. असा क्रम चालवा ह्मणजे हा निःसंशय बरा होईल.

हें ऐकून सर्वांनीं देवाचे फार आभार मानले व तसें करण्याचें कबूल केलें. हा वेडा[१] रोगीही या गोष्टीस राजी झाला, नंतर संध्याकाळची वेळ झाल्यावर उघड्या माथ्यावर तेल तूप राहवें ह्मणून उडदाच्या पिठाचा बांद डोक्या भोंवतीं घालून त्यांत एक चांवडें उभ्या टोपी सारखें बसविलें; व त्यांत तूप घालून त्यास मारुतीस नेलें. नंतर तें तूप काढून त्याचा दिवा लावला व सर्व संपल्यावर घरीं येऊन स्नान वगैरे घातलें, जेवण झालें, आणि चांगली शांतपणें झोंप लागली.

असेंच दुसरे दिवशीं केलें. तेव्हां त्यास पहिल्यापेक्षां जास्ती सुख वाटलें, मस्तक भणभणणें राहिलें, डोळ्याची आग राहून गारवा आला व पुष्कळ शांतता झाली तेव्हां तो त्या वैद्यास ह्मणाला, पंचाक्षरी बावा, आपण हा उपचार सांगितला ह्मणून बरें झालें नाहींतर मला यांनीं औषधी उपचार करून मारलें असतें. हें ऐकून वैद्य ह्मणतो, बाबा पिशाचबाधा झाली हें ह्मणणें खोटें आहे. तूं तूप लावते वेळेस संतापत असस. ह्मणून तुला गुण येत नव्हता. तोच उपचार मी दुसऱ्या एका *प्रकारानें केला. यांतील व त्यांतील मुद्दा एकच. व त्यानेंच तुला गुण आला. दोन दिवस उपचार झाल्यामुळें तुझ्या प्रकृतीं-

---

१ वेड्याचे मर्मांत एखादा नाद भरवून दिला ह्मणजे तो बराच वेळ त्या नादांत असतो, हें प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच हें झालें.

* हा प्रकार वैद्यशास्त्रांतीळ शिरोबस्ति या ऐवजीं आहे.

त बरीच शांतता झाली आहे. आतां मारुतीस जावयास नको. असेंच तितका वेळ घरीं केल्यानें तूं बरा होशील ह्याप्रमाणें सांगून वैद्य आपल्या गांवीं गेला.

इकडे यांनीं हा उपचार रोज घरीं चालविला. पुढे आठ पंधरा दिवसांनीं पुन्हा वैद्य कांहीं कामाकरितां तेथे आला व पाहतो तों याची प्रकृति साफ बरी झाली. तेव्हा त्यानें तो उपचार पुरे करण्यास सांगितला.

घरच्या मनुष्यांनीं वैद्याचे फार आभार मानले व ही गोष्ट त्याच्या कीर्तीस कारण झाली.

---

## गोष्ट २४.

हैद्राबाद येथें एके मुसलमानाची मुलगी पहिल्यानेंच प्रसूत होण्यास फार आडली. ही मुलगी फार मोठ्या श्रीमंत घराण्यांतील असून स्वभावानें नम्र, सलज्य व भित्री होती. सकाळ पासून तिसऱ्या प्रहरची वेळ होई तोंपर्यंत एक सारखीं औषधें चाललीं होतीं; व सुइणी हिला नेटानें वेणा देण्यास सांगत होत्या. ही फार लाजे सबब अंत फार बायकाही नव्हत्या. सुइणी बाहेर येऊन सांगत; अंमळ जोरानें नेट देऊन वेण देईल तर आतां सुटका होईल. परंतु आम्ही शिकस्त केली तिच्यापुढें आमचा इलाज चालत नाहीं. बाकी सुरळित आहे. कांहीं काळजी करावयास नको. असें करतां करतां संध्याकाळचा वेळ होण्याचा समय आला, परंतु कांहीं उलगडा होईना. शेवटीं त्रासले, आणि आतां हाकिमास आणल्यावांचून दु-

सरा इलाज नाहीं. असें ठरवून एक्या उत्कृष्ट व वयोवृद्ध हाकिमास बोलावून आणलें.

इकडे हाकीम आणला ही खबर मुलीस कळतांच ती ह्मणूं लागली, माझा जीव गेला तरी पतकरला, परंतु मी परपुरूषाच्या हातून हें काम कधीं करून घेणार नाहीं. तिच्या आईबापांनीं पुष्कळ प्रकारांनीं तिची समजूत केली पण ही आपला हेका सोडीना. तिचें बोलणें हें कीं, तसा प्रसंग आणल्यास मी प्राण देईन.

शेवटीं नाइलाज होऊन *इलाई काय करील तें खरें! असें ह्मणून सर्व हकीकत हाकिमास येऊन कळविली. त्यानें ती ऐकून घेऊन कांहीं गोष्टी सुइणीस विचारल्या आणि ह्मणाला, तुह्मी कांहीं काळजी करूं नका. मी सांगतों त्याप्रमाणें करा. पहिल्यानें एक उतारवयाचा तिचा नातलग मनुष्य ही माझी शस्त्राची पेटी घेऊन तिच्या खोलीच्या दरवाज्याबाहेर उभा करा. व एकजण भला धटिंगण मनुष्य पाहून त्यास सांगा कीं, हा माडीचा दरवाजा खाडकन उघडून खोली जवळच्या दादरावरून पायांतल्या खडावा मोठ्यानें वाजवीत दडदड उतरत ये. हा दडदड उतरत येतो आहे. इतक्यांत त्या दरवाज्या जवळच्या मनुष्यानें तो दरवाजा खाडकन उघडून आंत जावें; व शस्त्राची पेटी तेथें ठेवून धांदलीनें हाकीम साहेब आले ह्मणून बायकामाणसांस एकीकडे व्हावयास सांगावें. असें केलें ह्मणजे ती तत्काल प्रसूत होईल.

ह्याप्रमाणें त्या वैद्याचें भाषण ऐकून तसें केलें. आधींच ती मुसलमानाची बायको, अक्षयी पडद्यांत राहणा-

---

* ईश्वर

री, त्यांत ही गर्दी पाहतांच कसचें काय! पटकन् त्य दहशतीनें प्रसूत झाली. व सर्वांस आनंद झाला. नंत मंडळीनें त्याच्या *अकलेची पुष्कळ तारीफ करून त्यास इनाम दिलें.

---

## गोष्ट २५.

एक गोविंदराव या नांवाचा गृहस्थ कांहीं रोजगार संबंधानें सहकुटुंब एके मोठ्या शहरांत एक बैठें घर भाड्यानें घेऊन येऊन राहिला. सुमारें एक महिना झाल्यावर त्याच्या मुलाची प्रकृति बिघडली. अन्न अगदी चालेनासें झालें, शरीर रोड होत चाललें, चित्त अक्षयी उदास, कोणतेंही काम सुचू नये. अशी तब्बेत झाली. तेव्हां यानें आपल्या शक्तीप्रमाणें द्रव्य खर्चून वैद्याच्या मार्फत उपचार चालू केले. वैद्यानें त्याची प्रकृति पाहून अग्नि प्रदिप्त व्हावा म्हणून कांहीं क्षारयुक्त चूर्ण करून दिलें व शक्तिवृध्यर्थ कांहीं पौष्टिक पाक करून दिला.

या औषधांपासून त्यास गुण येणें एकीकडे राहिलें. आणि चूर्णापासून पोटांत आग व्हावी, उम्हासा करूं ला-

---

*कल्याण येथें सुमारें ७।८ वर्षा पूर्वी शेखसुलतान या नांवाचा डाक्तर होता. त्यानें गुलाम नबी फरीद याची बायको सुमारें १७ १८ वर्षांची ही आडली असता ह्याच युक्तीनें तिची सुटका केली. ह्यावेळेसही असाच पुष्कळ वेळ गोंधळ पडला होता. तेथें माहमुदमिया आतसखान व चौधरी वगैरे पुष्कळ मंडळी होती. ही गोष्ट खुद आतसखान यांनीं कळविली व शोधा अंती तिची सर्व हकीकत खरी आहे असें कळलें.

बा० दि० वै० प० कर्ता.

गावा आणि पाकापासून पोटांत दुखूं लागावें व आमांश व्हावा, असें होऊं लागलें. नंतर वैद्यानें तऱ्हेतऱ्हेचीं औषधें देऊन पाहिलीं, परंतु गुण आला नाहीं. शेवटीं घरचीं मनुष्यें त्रासलीं व मोठ्या काळजींत पडलीं कीं, घर सोडून रोजगाराकरितां येथें आलों; परंतु मुलाच्या जिवास चैन नाहीं तर रोजगार काय करावयाचा आहे? ओली कोरडी जशी भाकरी मिळेल तशी घरच्या घरींच खावी. कुटुंबाचीं माणसें सुखी तर सर्व सुखें. नाहींतर काय ? सारीं व्यर्थ ! !

अशा विचारांत तीं पडलीं आहेत तों त्या गांवांत त्या मुलाची मावशी राहत असे; तिला, हे येथें राहवयास आल्याची खबर समजून ती शोध करीत करीत यांच्या भेटीस आली व आपल्या वहिणीस म्हणाली, आज तीन महिने झाले तुम्ही येथें आल्याला. आणि मला मुळींच खबर नाहीं ! काल सहज त्या शेजारच्या रंगनाथ वैद्याच्या बायकोनें तुला तळ्यावर पाहिलें म्हणून मला कळलें. बरें, असो ! आतां येथेंच राहवयाचें आहेना ? येत जा तिकडे.

तेव्हां ही म्हणते, कसचें राहणें आणि कसचें काय ? मुलाची ही पहा काय अवस्था झाली आहे ती ? रोजगार धंदा चांगला आहे पण करावयाचें काय ? आम्ही आपल्या गांवीं जाण्याचा बेत केला आहे.

हें ऐकून मावशी म्हणाली, आतां असें करूं नका. आल्या सारखें वर्ष दोन वर्षें तर शहरांत रहा. ह्या मुलास मी आपल्या घरीं नेतें व रंगनाथ वैद्याचें औषध चालू करतें. तो चांगला नामांकित वैद्य आहे.

ही गोष्ट ह्या दोघांस मानवली. नंतर ती मावशी त्या

मुलास घेऊन आपल्या बिऱ्हाडीं गेली. ( तिचें बिऱ्हाड यांच्या बिऱ्हाडापासून फार लांब एके मोठ्या वाड्यांतील सातव्या मजल्यावर होतें. ) तेथें गेल्यावर तिनें त्या वैद्यास मुलाची प्रकृति दाखवून औषध सुरू केलें. तेव्हां लौकरच तो चांगला जेऊं लागला, मनास हुषारी वाटूं लागली व सुमारें एक महिन्यांत प्रकृति चांगली सुधारली.

तेव्हां वैद्यानें सांगितलें, आतां तो आपल्या घरीं गेला तरी हरकत नाहीं. व त्यास औषधाची ही गरज नाहीं. परंतु कदाचित् कांहीं कमजास्ती वाटल्यास हें औषध सुमारें महिनाभर पुरेल इतकें देऊन ठेवितों. असें ह्मणून त्यानें औषध दिलें नंतर तें बरोबर देऊन मावशीनें त्यास त्याच्या बिऱ्हाडीं नेऊन पोंचविला.

तेव्हां आईबापांनीं तिचे फार आभार मानिले. हें पाहून मावशी ह्मणाली, आभार कसचे त्यांत; परंतु तुह्मी येथून गेलां असतां ह्मणजे कसें झालें असतें? ह्मण आहे ना? "हिंमत मर्दा तो मदत खुदा."

अस्तु, पुढें दोन दिवस मावशी तेथेंच राहिली व मुलगाही जेवून खाऊन आनंदांत असे. पुढें मावशी आपल्या घरीं गेली. नंतर सुमारें आठ दिवस झाले नाहींत तोंच प्रकृति बिघडत चालली. ह्यांनीं तें औषध चालू केलें, तसेंच पथ्य केलें, परंतु गुण नाहीं; पुन्हा जशीच्या तशीच पूर्ववत् झाली. हें वर्तमान ह्यांनीं मावशीस कळविलें. तेव्हां ती ह्मणाली, तुम्ही त्यास भलतें सलतें खावयास देत असाल? माझ्या घरीं कसे परीपरीचे पदार्थ मी करून त्यास खाऊं घालीत असे. पण कधीं

हिरवी ढेंकर ही आली नाहीं. व त्यासही हें ह्मणजे पथ्या-
चें आहे ह्मणून कधीं अंगढणें आलें नाहीं. तुमचा पथ्या-
चा नेम राहत नसेल. ह्यांनीं पुष्कळ सांगितलें कीं, आ-
ह्मी पथ्य चांगलें ठेवितों; पण तिनें तें न ऐकतां यांसच
दूषण देऊन मुलास घेऊन आपल्या घरीं गेली, व पुन्हा
तेंच औषध व तसेंच पथ्य केलें. तशी प्रकृति नीट
झाली तेव्हां पुन्हा मुलगा आणून पोंचता केला व ह्म-
णाली, पहा आतां. झाला कां नाहीं नीट? याची तज-
वीज चांगली ठेविली पाहिजे ह्मणजे झालें. या नंतर
ही आणखी दोन दिवस त्यांच्या येथें राहून पथ्याची
वगैरे सर्व व्यवस्था त्यांस दाखवून आपल्या घरीं गेली.

इकडे सर्व तिच्या सांगण्याप्रमाणें बंदोबस्त असूंनही
पुन्हा प्रकृति बिघडत जाऊन आठ पंधरा दिवसांत पहि-
ल्या स्थितीवर आली. तेव्हां त्रासले. व आतां काय इ-
लाज करावा हें सुचेना. वारंवार मावशीस तरी किती
त्रास द्यावा? आपलें नशिब! असें ह्मणून आईबाप चिं-
ताक्रांत होऊन स्तब्ध बसले. इतक्यांत त्यांच्या गांवचा
एक वैद्य त्यांच्या घरीं पाहुणा आला. त्यास ह्यांनीं सर्व
हकीकत कळविली आणि ह्मणाले, तेथें असला ह्मणजे
प्रकृति नीट असते व येथें आणला कीं हळू हळू बिघडत
जाऊन पुन्हा पूर्ववत् होते. यास करावें तरी काय?

हा वैद्य मोठा काल्पनिक होता. पहिल्यानें हें भाषण
ऐकतांच तो अंमळ गोंधळांत पडला, परंतु लागलेंच
विचार करून ह्मणाला, मला एकदां मावशीच्या घरीं
घेऊन चला. ह्मणजे मी तुह्मास याचें कारण सांगतों.
नंतर गोविंदराव या वैद्यास घेऊन मावशीकडे गेले. तेथें

कांहीं वेळ इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलून पाणीबिर्ण प्यायलें व विश्रांति घेऊन आपल्या बिऱ्हाडीं आले.

वाटेंत वैद्यानें विचार केला कीं, या बाईकडे सातव्या मजल्यावर हवा मोकळी आहे. व ही इतकी ऊंच राहत असल्यामुळें वर नेलेल्या नळाचें पाणी स्वच्छ व हालकें आहे. आणि येथें ह्या दोन्ही गोष्टी नाहात. एकतर ह वाही वैद्या घरची, कोंदट; व पाणी बावडीचें! हेंच कारण प्रकृति बिघडण्याचें असावें. दुसरें कांहीं दिसत नाहीं. असें मनांत आणून घरीं आल्यावर गोविंदरावास सांगितलें. त्यानें लागलेंच शेजारच्या गल्लींतील एक्या ऊंच इमारतींत वरच्या मजल्यावर जागा भाड्यानें घेतली. व नळांतील हौदाचें पाणी पिण्याचें सुरू केलें. तशीं याची प्रकृति सुधरत जाऊन चांगली बेतावर आली.

नंतर त्यानें वैद्याचे फार आभार मानले व ह्मणाला, आह्मी या त्रासानें हा गांव सोडणार होतों. परंतु तुह्मी आलां व ही युक्ति सांगितलीत ह्मणून मी सुखानें रोजगार करून आतां आनंदानें येथें आहे. तात्पर्य ही युक्ति न सुचती तर त्या बिचाऱ्यास पुन्हा आपल्या गांवीं जाऊन हालांत राहावें लागतें. इतकें सौख्य सगळ्या कुटुंबाच्या माणसांस देण्यास फक्त वैद्याची सुयुक्तिक कल्पना कारण झाली. याजवरून पहा तिचें किती महत्व आहे तें!

---

समाप्त.

शुभंभवतु.